
म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय : बा.वा.
दा.क्र.: २९७५

# निबंध-रत्नाकर

सौ. अनुराधा कुलकर्णी



BVBK-0402971

# प्रस्तावना

मराठी मा[illegible]तून शिकणाऱ्या विद्यार्थ्याला 'मराठी'चा अभ्यास उच्च पातळीवर करावा लागतो. साहजिकच या मराठीच्या प्रश्नपत्रिकेतील 'निबंध' हा प्रश्न विद्यार्थ्याला जितका जिव्हाळ्याचा वाटतो तितकाच कठीणही वाटत असतो.

पण खखे सांगायचे तर निबंध लिहिणे हे काही आपणाला वाटते तितके खूप कठीण काम नाही. निबंध म्हणजे 'नि+ बंध' म्हणजे 'नीट बांधलेला'. ह्या निबंधात विद्यार्थ्यांचे विचार, कल्पना नीट मुद्देसूदपणे मांडलेले असणे आवश्यक असते. पण आजकाल आपण पाहातो की, विद्यार्थी ह्या 'निबंध' विषयात अरसिक बनत चालला आहे. त्याच्या अवांतर वाचनाच्या व विचारांच्या अभावी दिवसेंदिवस हुशार विद्यार्थ्यालाही 'निबंध' 'कठीण' वाटू लागला आहे.

वास्तविक 'निबंध' हा मराठीच्या प्रश्नपत्रिकेतील अग्रगण्य स्थान प्राप्त केलेला व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खुली ओळख करून देणारा असा प्रश्न आहे. १०० गुणांपैकी १५ गुणांच्या या प्रश्नाला म्हणूनच विद्यार्थ्यांनी योग्य न्याय दिला पाहिजे. निबंधाची निवड, आकर्षक व आटोपशीर सुरुवात - चटणी लोणच्याचे जे चटकदार स्थान जेवणात असते तेच निबंधाच्या प्रारंभाला आहे. आशयानुसार व मुद्यानुसार परिच्छेद, ज्या विषयावर निबंध लिहायचे त्याचे योग्य ते ज्ञान, आपला अनुभव व कल्पना यांचा समन्वय, साधी, सोपी भाषा, तसेच विषयाशी संबंधित असे काही वाक्प्रचार, म्हणी किंवा सुभाषिते यांचा निबंधात उपयोग आणि शेवटी चार - पाच ओळींचा आकर्षक शेवट इ. सर्व पथ्ये पाळून विद्यार्थ्यांनी निबंध लिहिला पाहिजे. तरच तो निबंधाच्या विषयाशी किंवा परीक्षकांशीसुद्धा खऱ्या अर्थाने सुसंवाद साधू शकेल.

दुर्दैवाने बहुतांश विद्यार्थ्यांमध्ये निबंध लिहिताना वरील सर्व गोष्टींचा अभाव आढळतो. त्याकरिता शाळांशाळांतून निबंधावर फार उद्बोधन झाले पाहिजे. पण शाळेच्या कृत्रिम अभ्यासक्रमात, वेळापत्रकात मराठी या विषयाला योग्य तो वेळ मिळत नाही. अशा वेळी जेव्हा काही व्यक्ती विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी धावून येतात, तेव्हा त्यांना खरोखरच श्रेष्ठ मानावे लागते. त्या दृष्टीने श्रीमती अनुराधा कुलकर्णी यांनी ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांकरिता काही निबंध लिहून हे जे पुस्तक प्रकाशित केले आहे, हा उपक्रम अत्यंत स्तुत्य म्हणावा लागेल. विशेषतः त्या स्वतः 'वाणिज्य' शाखेच्या पदवीधर असून, पदव्युत्तर शिक्षणानंतर विले - पार्ले येथील 'एम. एल. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स' मध्ये वाणिज्य विषयांचे अध्यापन करतात. तरीही त्यांनी हे जे परिश्रम घेतले आहेत, ते अत्यंत मोलाचे आहेत.

मुळात सर्व प्रकारच्या निबंध प्रकाराचा समावेश हे त्यांच्या लेखनाचे पहिले वैशिष्ट्य मानावे लागेल. शिवाय प्रत्येक निबंध प्रकाराच्या विशिष्ट वेगळेपणाची नेमकी जाण त्यांच्याकडे नक्कीच आहे. कारण वर्णनात्मक निबंधामध्ये अनेकदा पाल्हाळच फार असते. पण हा अत्यंत महत्त्वाचा

दोष टाळून त्यांनी, 'आणि आम्ही हरलो', 'माझी पहिली चोरी' यासारख्या निबंधांतून हुबेहूब ते दृश्य किंवा प्रसंग डोळ्यासमोर उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

कल्पनाविलासात्मक निबंधातही कल्पनेची, तसेच शालेय पातळीची मर्यादा त्यांनी व्यवस्थित पाळली आहे. नाहीतर कल्पनाविलासाच्या गर्तेत कधीकधी मूळ विषयापासून दूर जाण्याचा धोका असतो, पण तोही त्यांनी सहजपणे टाळला आहे. 'मी मुख्याध्यापिका झाले तर' 'अचानक परीराणी भेटली तेव्हा' यांसारखे निबंध हे याचे उत्तम उदाहरण आहे.

चिंतनात्मक निबंधांतून थोड्या गांभीर्याला व विचारांच्या मांडणीला महत्त्व असते. साधकबाधक दोन्ही बाजूंचा विचार सांगून शेवटी स्वत:चे निर्णायक मत देणेही आवश्यक असते. या दृष्टीने या पुस्तकातील चिंतनात्मक निबंधांची, त्यांतील 'विचारांची मांडणी' अतिशय व्यवस्थित झालेली आहे.

'मुद्यांवरून गोष्ट' हाही प्रकार ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असतो. अशा छोट्या गोष्टींमध्ये सोपी, सुटसुटीत भाषाही हवी, तितकेच सहजपणे 'तात्पर्यही' सूचकतेने व्यक्त करावे लागते. या दृष्टीने या पुस्तकातील सर्वच गोष्टींचे लेखन मार्गदर्शक वाटते.

'आत्मनिवेदनपर निबंध' हा ही एक निबंधाचा महत्त्वाचा प्रकार. या प्रकारात एखादी वस्तू किंवा व्यक्ती किंवा प्राणी आपली कहाणी सांगत असल्याने प्रथमपुरुषी एकवचनी भाषाच वापरावी लागते. त्याच्या बोलण्यातून नेमके त्या वस्तूचे मनोगत व्यक्त व्हावे लागते. या सर्व गोष्टींचे भान ठेवल्यानेच या पुस्तकातील सर्वच 'आत्मवृत्ते' सुंदर झाली आहेत.

याशिवाय थोर व्यक्तिविषयक निबंधप्रकारांमध्ये व्यक्तींची निवड व त्या दृष्टीने त्यांच्या जीवनाची, कार्याची सोप्या पण सुंदर भाषेतील ओळखही योग्य वाटते. शिवाय 'व्यक्तिचित्र', 'ऋतूवर्णन', 'प्राणीविषयक किंवा पक्षीविषयक' निबंध इत्यादी सर्वच प्रकारांमध्ये ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना समजेल अशा पद्धतीने लेखन केलेले आहे.

आई ज्याप्रमाणे मुलाला बोलायला शिकविते, त्याप्रमाणे छोटे पण नीटनेटके निबंध लिहायला मुलांना शिकविणे हे शिक्षकाचे, तसेच प्रत्येक पालकाचेही कर्तव्य आहे. यांच्या व्यक्तीरिक्त इतर व्यक्तीही जेव्हा ही 'सामाजिक बांधिलकी' समजून विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त कार्य करतात. तेव्हा रामदासांच्या 'केल्याने होत आहे रे' या ओळींचीच आठवण येते. या दृष्टीने श्रीमती सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी हे पुस्तक लिहून विद्यार्थीवर्गावर फार मोठे उपकार केले आहेत, असेच म्हणावे लागेल.

**सौ. प्रभा श्रीकांत ऐनापुरे**
मुख्याध्यापिका
जी. ए. रानडे विद्यालय
ठाकूरद्वार,
मुंबई : ४००००२

# पुस्तक उघडताना

छोट्या दोस्तांनो,

मुळात लहानपणी अभ्यासाचा मनापासून कंटाळा येतो, त्यात भाषाविषयक पेपरमध्ये गणितासारखे पैकीच्या पैकी गुण मिळत नाही, निबंधलेखनात तर मुळीच नाही. त्यामुळे तुम्हां सर्वांना निबंधलेखन गृहपाठ स्वरूपात असो किंवा परीक्षेतील स्वतंत्र प्रश्न या स्वरूपात असो, तुम्हा सर्वांना निबंध लिहिणे फारसे आवडत नाही. हे मलाही माहीत आहे.

पण अनेकदा जी गोष्ट आपल्याला खूप कठीण वाटते ती प्रयत्न केला तर सहज जमते हे तुम्हांला माहीत आहे का ? याच दृष्टीने तुम्हांला आवडेल, समजेल अशा भाषेत हे निबंध, पत्रे, कथा वगैरेंचे लेखन केले आहे. 'गाता गळा आणि शिंपता मळा' अशी एक म्हणार आहे. गाणं खुळवायचं असेल किंवा मला फुलवायचा असेल तर त्यासाठी रोज परिश्रम घेतले पाहिजेत. तसेच शालेय अभ्यासक्रमानुसार सर्व प्रश्न तुम्हांला मनाप्रमाणे सोडवायचे असतील तर जाणीवपूर्वक तयारी करायलाच हवी. या तयारीत तुमच्या हातात हात देऊन तुम्हांला नीट वाटचाल करता यावी म्हणूनच काही निवडक विषयांची मांडणी या पुस्तकात केली आहे. त्यामुळे तुम्हांला प्राथमिक शिक्षणापासूनच छान, सूसूत्र निबंध लिहिता येतील अशी आशा आहे.

तुमच्याप्रमाणे तुमच्या पालकांना - चुकले लाडक्या आई-बाबांना ह्या पुस्तकाचा निश्चितच उपयोग होईल असे वाटते. कारण तुम्हीं मुलांना छान निबंध लिहिता यावेत असे त्यांनाही वाटत असते. तेवढे छान विचार मांडण्याची त्यांची मनाची बैठकही तयार झालेली असते. पण बालमित्रांनो, वेळेअभावी ते जी अनेक कामे करू शकत नाहीत, त्यांपैकीच हेही एक. म्हणून त्यांनाही, तुम्हांला निबंधलेखनात मदत करता यावी या दृष्टीने हे पुस्तक लिहिले आहे.

अर्थात या जगी 'परिपूर्ण' अशी कोणतीही गोष्ट नाही. मग ह्या माझ्या प्रयत्नात दोष नाहीत असे कसे म्हणू ? तरीही तुमच्या विश्वात डोकावण्याची संधी मला हवी होती म्हणून हा प्रयत्न केला. हा प्रयत्न पुस्तकरूपाने तुमच्यासमोर येण्यात श्रीगणेशाच्या कृपेइतकाच सर्वांचा लोभही कारणीभूत ठरला आहे. त्या सर्वांचे ऋणनिर्देश करताना मला खूप आनंद वाटतो आहे.

**लेखिका**

# अनुक्रमणिका

## विभाग : १: व्यक्तिचित्र

(१) माझी आई / १
(२) माझे बाबा / २
(३) माझा आवडता शिक्षक / ३
(४) पोस्टमन / ३
(५) माझ्या शाळेतील शिपाई / ४
(६) माझा खोडकर मित्र / ५
(७) ट्रॅफिक पोलिस / ६
(८) माझे आजोबा / ७

## कल्पनाविलासात्मक

(१) सूर्य उगवलाच नाही तर / ९
(२) मला लाख रुपये मिळाले तर / १०
(३) मी मुख्याध्यापिका झाले तर / ११
(४) मी सैनिक झालो तर / ११
(५) अचानक परीराणी भेटली तेव्हा / १३
(६) बाबांनी केलेला स्वयंपाक / १४
(७) गणपती बाप्पा बोलू लागला / १५
(८) आमची चंद्रावरील सहल / १६

## चरित्रात्मक निबंध

(१) संत गाडगे महाराज / १८
(२) संत रामदास / १९
(३) संत तुकाराम / २०
(४) गानकोकिळा लता मंगेशकर / २१
(५) सुनिल गावसकर / २२
(६) प्रियदर्शिनी इंदिरा गांधी / २३
(७) थोर शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा / २४
(८) स्वातंत्र्यवीर सावरकर / २५
(९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर / २६

## आत्मवृत्तपर

(१) शाळेची घंटा / २८
(२) मोडक्या बॅटचे आत्मवृत्त / २९
(३) मी आहे रेडिओ / ३०
(४) कल्पवृक्षाची कहाणी / ३१
(५) पिंजऱ्यातील पोपट / ३२
(६) मी जंगलचा राजा / ३३
(७) बाहुलीचे मनोगत / ३४

## ऋतूवर्णनपर


(१) वसंत ऋतू / ३५

(२) नको हा पावसाळा / ३६

(३) उन्हाळ्यातील एक दिवस / ३७

(४) माझा आवडता ऋतू / ३८


## कथनात्मक


(१) माझे पहिले बक्षीस / ३९

(२) माझे अविस्मरणीय स्वप्न / ३९

(३) नको तेव्हा आलेले पाहुणे / ४०

(४) माझे आवडते पुस्तक / ४१


## प्राणीविषयक / पक्षीविषयक


(१) आमचा लाडका टॉमी / ४३

(२) आपला राष्ट्रीय पक्षी / ४४

(३) माझी आवडती हरिणी (गाय) / ४४

(४) माझा आवडता प्राणी / ४५


## स्थलवर्णन


(१) माझी शाळा / ४७

(२) असा आमचा गाव / ४८

(३) आपला महाराष्ट्र / ४९

(४) आपला भारत देश / ५०


## प्रसंगवर्णनपर


(१) नदीकाठची सहल / ५१

(२) बाहुलीचे लग्न / ५२

(३) सूर्यास्त / ५३

(४) आणि आम्ही हरलो / ५४

(५) माझी पहिली चोरी / ५५

(६) शाळेचा पहिला दिवस / ५६


## सणविषयक


(१) आपला स्वातंत्र्यदिन / ५७

(२) प्रजासत्ताक दिन / ५८

(३) महाराष्ट्र दिन / ५९

(४) गुढी -पाडवा / ५९

(५) नारळी पौर्णिमा / ६०

(६) होळी / ६१

(७) नाताळ / ६२

(८) रमजान ईद / ६३

## चिंतनात्मक निबंध

(१) चांगले संस्कार / ६५
(२) सहकाराचे महत्त्व / ६६
(३) खेळ - एक महत्त्वाची गरज / ६७
(४) बचतीचे महत्त्व / ६८
(५) एकीचे बळ / ६९
(६) शिस्तीची आवश्यकता / ७०

## विभाग : २ : कल्पनाविस्तार

(१) ग्रंथ हेच गुरू / ७१
(२) प्रयत्नांती परमेश्वर / ७१
(३) केल्याने देशाटन / ७२
(४) कठिण समय येता कोण कामास येतो / ७२
(५) जे का रंजले गांजले / ७३
(६) जया अंगी मोठेपण / ७४
(७) उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी / ७४
(८) वृक्षवल्ली आम्हां सोयरे / ७५

## विभाग : ३ : कथालेखन

मुद्द्यांवरून गोष्ट

(१) एकी हेच बळ / ७६
(२) खोटे कधी बोलू नये / ७७
(३) दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ / ७८
(४) मुंगीची करामत / ७९
(५) सर्वात प्रिय गोष्ट / ८०
(६) चतुर कावळ्याची गोष्ट / ८१
(७) आंधळे आणि हत्ती / ८२
(८) अति लोभ केव्हाही वाईट / ८४

## विभाग : ४ : पत्रलेखन

(१) मैत्रिणीस वाढदिवसासाठी आमंत्रण / ८५
(२) वडिलांना - सहलीसाठी परवानगी / ८६
(३) वडिलांना - अभ्यासविषयक निवेदन / ८७
(४) गुरुजींस - सुट्टीसाठी अनुमती / ८८
(५) पुस्तक विक्रेत्यास पुस्तकांची मागणी / ८९
(६) मित्रास - अभिनंदनपर पत्र / ९०
(७) आरोग्याधिकाऱ्यांस तक्रार करणारे पत्र / ९१
(८) सहकार भांडारास मालाची चौकशी / ९२

व्यक्तीचित्र

बाल वाङ्मय विभाग.
ग्र. क्र. २९०९ दिनांक 39/3/

# माझी आई

'आई' किती गोड शब्द आहे नाही ? मला तर या जगात सर्वांत जास्त कोण आवडत असेल तर ती म्हणजे माझी आई.

माझी आई खूप प्रेमळ आहे. ती दिसते जशी गोड तशी बोलतेही गोड. तिच्यामुळेच तर मला छान बोलायला, वळणदार, लिहायला येऊ लागले आहे.

आम्ही सारे उठायच्या खूप आधी ती उठते. घरातली सकाळची कामे, आजोबांच्या पूजेची तयारी, बाबांचा जेवणाचा डबा... हे सारे ती मनापासून करते.

'लवकर निजे लवकर उठे
तया ज्ञानसंपत्ती भेटे'

असे गोड आवाजात म्हणत ती आम्हांला उठवते. आमचा नियमित अभ्यास घेते. घर व्यवस्थित राहावे म्हणून ती सतत काम करते. पण बरं का, याचमुळे आम्ही अभ्यास वेळेवर केला नाही किंवा खूप दंगामस्ती केली तर मात्र ती खूप रागावते. कधी कधी धम्मकलाडूसुद्धा देते. बाबा तर म्हणतात, 'अगं, लहान मुलं आहेत ती, तुझे विद्यार्थी नाहीत.' आणि बाबा असं का म्हणतात माहीत आहे ? ती आहे आमच्या शाळेच्या प्राथमिक शाळेची मुख्याध्यापिका. तेथील कडक शिस्त तर विचारूच नका. पण तिथेही ती मन लावून खूप उशिरापर्यंत काम करते. शाळेतून घरी येताच मात्र पुन्हा गाणी गुणगुणत ती पटपट कामे उरकते. रात्री अगदी आठवणीने छानशी गोष्टही सांगते.

अवेळी येणारे पाहुणे, बाबांचे सुट्टीच्या दिवशी येणारे मित्र, आमचा वाढदिवस, सणवार..... सारे कार्यक्रम ती हौसेने साजरे करते. हे सारे तिला एकटीला कसे काय जमते याचेच मला कोडे वाटते. इंद्रधनुष्यात जसे सात रंगाचे सुंदर मिश्रण झालेले असते तसे अनेक छान गुणांचे मिश्रण तिच्यात झालेले आहे. मग सांगा बरं, अशी आई कोणाला आवडणार नाही ?



BVBK-0402971

# माझे बाबा

एखादी गोष्ट, एखादी व्यक्ती - मग ती कितीही साधी असली, तरीही आपणाला खूपखूप आवडते. याचं प्रमुख कारण म्हणजे ती आपली असते. माझ्या बाबांच असंच आहे, ते दिसायला अगदी साधे - म्हणजे थोडेसे सावळे आहेत. उंची कमी आहे. कुणीतरी वर्णन करावं असं देखणेपण त्यांच्याकडे नाहीच. पण तरीही ते मला खूप आवडतात. कारण ते माझे बाबा आहेत. हसरे आनंदी. स्वत: हसता हसता घर खूप छान. आनंदी ठेवायची सवय आहे त्यांना.

माझे बाबा फळे विकण्याचा व्यवसाय करतात. आमच्या गावातल्या 'लक्ष्मी मार्केटमध्ये' आमचं छोटंसं दुकान आहे. तिथे ते रोज सकाळी लवकर उठून जातात. हळुवारपणे सगळी फळे छान रचून ठेवतात. काही फळांच्या आकर्षक करंड्याही तयार करतात. त्यांचा व्यवसायच असा आहे की त्यांना खूप खूप बोलावे लागते. पण शक्यतो आपला आवाज चढणार नाही, याची ते काळजी घेतात. हसऱ्या चेहेऱ्याने गिऱ्हाईकांचे स्वागत करतात. फारशी घासाघीस न करता फळे विकायला त्यांना खूप आवडतं.

आंबा, केळी, द्राक्षे वगैरे सर्व प्रकारची फळे आमच्या दुकानातून विकली जातात. त्यामुळे ती आणण्यासाठी त्यांना आधी खूप फिरावं लागतं. पण त्यांना मुळी कधी कंटाळाच येत नाही. दुपारच्या वेळी मार्केटमध्ये लोकांची वर्दळ कमी असते. म्हणून ते स्वत: हातगाडी घेऊन दारोदार जाऊन फळे विकतात. दुकान चांगले चालते, तरीही वेळ वाया घालवायचा नाही, मुलांसाठी, घरासाठी सतत कष्ट करायचे असे त्यांनी मनाशी पक्के ठरविले आहे.

स्वतंत्र उद्योग करीत असल्याने त्यांना सुट्टी नसतेच. पण रोज रात्री ते घरी नियमित वेळेवर येतात. माझ्या आणि शीलाच्या अभ्यासाची चौकशी करतात. 'मला नाही जमलं, पण पोरांनो तुम्ही मात्र खूप शिकलं पहिजे,' असं म्हणून आमच्याशी गप्पागोष्टी करतात. दिवसभर आई एकटीच काम करते. म्हणून रात्री दमून आल्यावरही घरातली सोपीसोपी कामे ते करतात. स्वावलंबानाने आपणाला शिस्त लागते, असं म्हणत ते सगळी कामं गप्पागोष्टी करत संपवतात. त्यामुळे आम्हीही त्यात चटकन सामील होऊन जातो. मग अशा बाबांचा अभिमान कोणाला वाटणार नाही ?

●●●

## माझा आवडता शिक्षक

स्वत:च्या घरकुलाइतकीच प्रत्येकाला आपली शाळाही आवडत असते. कारण शाळा हे आम्हां मुलांचे सर्वस्व असते. पण आमच्या शाळेतील दातार गुरुजी हे तर आम्हां सर्वांचेच आवडते गुरुजी आहेत.

पांढऱ्या रंगाचा साधाच पण नीटनेटका पोशाख त्यांना खरंच शोभून दिसतो. त्याचबरोबर कुणालाही ते पाहाताक्षणी आवडतात, कारण त्यांचा हसरा चेहेरा आणि मनमोकळा स्वभाव.

इतिहास हा त्यांचा विषय. त्यांची शिकवण्याची पद्धतही आम्हां मुलांना पटकन समजू शकेल अशीच आहे. त्यामुळेच त्यांच्या तोंडून शिवाजीराजांच्या, लोकमान्य टिळकांच्या किंवा गांधीजींसारख्या नेत्यांच्या कामगिरीचे वर्णन ऐकता ऐकता तास कधी संपून जातो हे कळतसुद्धा नाही. रिकाम्या तासाच्या वेळी तर तेच आमच्या वर्गावर यावेत असं आम्हांला वाटतं. कारण त्यांना खूप छान गोष्टी सांगता येतात, गंमतीशीर कोडी घालता येतात.

पण शिस्तीबाबत मात्र ते खूपच कडक आहेत. त्यामुळेच गच्च भरलेल्या वर्गातून गुपचूप तोंडात चॉकलेट टाकणारा मुलगा ते बरोबर शोधतात. अभ्यासाच्या वेळी गप्पा मारलेल्या तर त्यांना मुळीच खपत नाहीत.

पण असे असले तरीही मला ते खूप आवडतात. कारण मिळेल तितका वेळ ते मुलांच्यात घालवतात. गरीब मुलांकरिता, मंदबुद्धीच्या मुलांकरिता शाळा सुरू होण्याआधी ते शिकवणी घेतात. पण त्यांच्याकडून फी मात्र कधीच घेत नाहीत. कोणत्याही स्पर्धांत, खेळांत - कशातही आम्हांला कोणालाही बक्षीस मिळाले की आठवणीने शाबासकी देतात. असे आहेत माझे आवडते गुरुजी.

●●●

## पोस्टमन

'जो आपल्या घरातला नसूनही आपल्याला अगदी जवळचा वाटतो, तो पोस्टमन' असं माझी आजी म्हणते. मला तर तिचं म्हणणं अगदी तंतोतंत पटतं. कारण ह्या पोस्टमनकाकांची आमच्या घरीच काय, सर्वांच्याच घरी आतुरतेने वाट पाहिली जाते. काका - काकूंची हकीगत, आत्याकडच्या, मामा-मामीकडच्या सगळ्या निरोपांची देवाणघेवाण पत्रातून चालते. ही सगळी पत्रे, पाकिटे, लग्नपत्रिका आणि भाऊबीजेला आईला पैसे ... हे सारं काही पोस्टमन घेऊन येतो. 'टपाल' अशी आरोळी देऊन, पत्र हाती देऊन तो पटकन दुसऱ्या घरी जायला वळतो.

त्यामुळेच तर मला कधी कधी प्रश्न पडतो, उन्हातान्हात, पावसात, थंडी - वाऱ्यात फिरायचा याला कंटाळा कसा येत नाही? इतकं चालून पाय दुखत नसतील का ?

खरं तर तो स्वत: सरकारी नोकर आहे. त्यामुळे खाकी गणवेश चढवूनच तो सतत काम करतो. शहरातील किंवा गावातील ज्या विभागाची पत्रे, पाकिटे, भेटकार्डे द्यावयाची असतील, ती सारी एका पिशवीत भरून तो पत्रे वाटण्यासाठी बाहेर पडतो. घराघरांतून पत्रे पोहोचवताना त्याच्या चेहेऱ्यावर नाराजी किंवा राग तरी कधीच नसतो.

कधी कधी तो शहरातील वेगवेगळ्या पत्रपेट्यांतून पत्रे गोळा करून पोस्टापर्यंत नेऊन पोहोचवतो. त्यावर शिक्के मारतो. त्यांचे वर्गीकरण करतो. गावागावांतील, शहराशहरांतील माणसांमधील पत्रे त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे, त्यांच्यात प्रेमाचे संबंध निर्माण करण्याचे काम तो मधमाशीसारखा सतत करतो.

असा हा पोस्टमन, आपणा सर्वांचाच घरातला आपलाच वाटणारा मित्र. परवा बाबा आईला सांगत होते, आपल्या उंच इमारतीत पोस्टमनचा चढायचा त्रास वाचावा म्हणून प्रत्येकाने आपल्या नावाच्या पेट्याच ठेवायच्या आहेत. खरंच, असं झालं तर त्याचा चालायचा त्रास वाचेल, पण 'टपाल' ही हाक देणारा आजीचा, आई - बाबांचा, आपलं जिव्हाळ्याचा मित्र मात्र आपणाला रोज कसा भेटेल ?

●●●

## माझ्या शाळेतील शिपाई

बघताक्षणी जी गोष्ट माणसाला आवडते ती कायमची आवडते असं मोठी माणसे म्हणतात. पण बघताक्षणी एखाद्याची खूप भीती वाटली, तरीही त्याच्याशी खूप छान दोस्ती व्हावी असाही एक माणूस मला भेटला. कोण माहीत आहे? आमच्या शाळेचा सर्वांत जुना शिपाई - गणू.

गणूचा रंग मुळात सावळा. शिवाय त्याच्या डोक्यावर एकही केस नाही, पण त्याच्या काळ्या-पांढऱ्या मिशा मात्र झुपकेदार आहेत. शिवाय त्याची तब्येतही खूपच चांगली असल्याने. त्याला बघितल्याबरोबर मी खूपच घाबरले होते. चित्रपटात मारामारी करणारे गुंड लोक कसे भीतीदायक असतात, तसाच वाटला होता तो मला.

पण शाळेच्या पहिल्याच दिवशी सगळी मुले घरी गेली, तरी बाबा मला न्यायला येऊ शकले नाहीत. म्हणून मी कोपऱ्यात घाबरून उभी होते. तेव्हा

शाळेचे आवार स्वच्छ करणाऱ्या गणूचे लक्ष माझ्याकडे गेले. तो माझ्याजवळ येऊन म्हणाला, 'काही काळजी करू नगंस, मी हाय, कुणी नाय आलं ना, तर म्या पोचवीन तुला.' आणि एवढे म्हणून त्याने आपले काम थांबवून बाबा येईपर्यंत मला किती गंमतीजंमती सांगितल्या. म्हणून तर म्हणते की पहिल्याच दिवशी मला त्याची भीती वाटली आणि पहिल्याच दिवशी माझी त्याच्याशी दोस्तीही झाली.

अर्थात शाळेत मात्र त्याचा खूपच दरारा आहे. मुळात तो स्वत:च खूप नीटनेटका आहे. त्याचे कामही खूप स्वच्छ आहे. त्यामुळे इतर शिपायांनी कामाकडे थोडेही दुर्लक्ष केलेले त्याला आवडत नाही. चुकीबद्दल जरी तो आम्हां मुलांना किंवा इतर शिपायांना रागावत असला, तरीही त्याचे वागणे मात्र अतिशय नम्र आहे.

त्याचे आई-वडील त्याला लहानपणीच सोडून गेले. तेव्हापासून तो एकटाच इथे येऊन राहिला. म्हणून स्वत:च्या घराइतकेच तो शाळेवरही प्रेम करतो. शाळेच्याच आवारात एका छोट्याशा खोलीत तो राहतो. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ शाळेची सेवा तो करतो.

शाळेचा क्रीडामहोत्सव असो किंवा आणखी कुठला कार्यक्रम - तोही मोठ्या उत्साहाने जमेल तितकी कामे करतो. आम्ही मुलांनी कशात जरी बक्षीस मिळवले, तरी त्याला सर्वात अधिक आनंद होतो. मराठीच्या बाईंसारखं त्याला छान बोलता येत नाही. पण त्याची ती गावाकडची भाषाच आम्हांला गोड वाटते, कारण ती त्याच्यासारखीच प्रेमळ आहे.

●●●

## माझा खोडकर मित्र

पाटीलकाकांचा जया माहीत नाही, असा आमच्या गवळीगल्लीत एक माणूस मिळायचा नाही. अवलक्षणी कार्टं मेलं, म्हणून कुणी त्याचा राग करतं, तर कुणी त्याची तक्रार घेऊन त्याच्या आईशी चक्क भांडणही काढतं. पण कुणी काही म्हणालं ना, तरी मला मात्र 'जया' खूप आवडतो.

खरं तर त्यांच नाव 'जयवंत' आहे. पण सारेच जण त्याला जया म्हणून ओळखतात. स्वच्छ गोऱ्या रंगाच्या जयाचे डोळे मोठे मोठे आणि काळेभोर आहेत. डोक्यावर भुऱ्या रंगाचे केस. चेहेऱ्यावर नेहमीच खोडकर भाव. तोंडात दोन बोटं घालून तो शीळ घालतो, तेव्हा सेनापतीने सैन्याला इशारा करावा तसे आम्ही सर्वचजण आवाजाच्या दिशेने धावत जातो. तेव्हा घराघरातली मोठी माणसे,

'आली वाटतं वानरसेना' म्हणून आमच्याकडे रागाने पाहतात. पण त्यांची पर्वा कोण करतो ?

प्रत्येक सुट्टीच्या दिवशी त्याच्या डोक्यात एक नवी कल्पना असतेच. गच्चीवर कुणी वाळवण घातलं की त्यातले दाणे किंवा डाळ मूठमूठभर पळवण्यापासून ते कुणाच्याही गोठ्यातलं दावणीला बांधलेलं जनावर सोडून देण्यापर्यंतचे सगळे उद्योग तो धीटपणे करतो. कुणाच्या घराच्या दरवाजाला बांहेरून कडी लाव, कुणाच्या तरी वेणीला कागदाचे व दोऱ्याच्या रिळांचे शेपूट अडकव, असली कामे तर तो सहज करतो.

कोपऱ्यावरच्या घाटेकाकू दिवाळी जवळ आली म्हणून बेसनाचे लाडू करीत होत्या. तशी घरांघरांत फराळाची तयारी चालू होती. पण तरीही घाटे काकू एकट्याच आहेत हे बघून त्याने एक छान योजना आखली. आम्हां मुलांना त्यांच्या घराजवळ लपायला सांगून तो थेट काकूंकडे आत गेला, रडव्या आवाजात म्हणाला, 'काकू, काकू माझी आजी गेली ?' ' कधी रे आणि अचानक कशी ?' असं म्हणत घाटेकाकू ताडकन उठल्या. त्याला म्हणाल्या, 'तू बसं हं इथंच, मी आलेच तुझ्या घरी जाऊन, त्यांची पाठ वळताक्षणी त्याने ताटातले सगळे लाडू आम्हांला अगदी वाटून टाकले आणि आपल्याही तोंडात लाडूचा बोकणा भरून तो बाहेर पडणार एवढ्यात घाटेकाकू गरजल्या , 'मेल्या त्या लाडवासाठी एवढा खोटा बोललास', तसा न घाबरता, पळता पळता तो म्हणाला, पण तुम्ही नीट ऐकून कुठे घेतलंत. मला तुम्हाला सांगायचं होत अचानक आजी काकूकडे गेली. आता ती तुमचे फराळाचे पदार्थ करायला, मदत करायला येऊ शकणार नाही. हे ऐकून घाटेकाकूंनी कपाळावर हात मारून घेतला.

असा हा जया, त्याला ना माराची भीती ना शिक्षेची कुठेही चढताना, अंधारात फिरताना वा खोल पाण्यात सूर मारताना तो खरंच घाबरत नाही. पण परीक्षेच नाव काढलं कि मात्र स्वारी घाबरते, थंडी ताप आल्याचे नाटक करते आणि परीक्षेची वेळ संपली कि उठून बसते. पुन्हा नव्या खोड्या करायला.

●●●

## ट्रॅफिक पोलिस

तसा त्याचा - आपला खरंच काही संबंध नाही. पण तरीही आपण सगळे. आपणच काय सगळी मोठी माणसे त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागतात. त्याने हाताने थांबायचा इशारा केला की सारेचजण थांबतात, आणि त्याने जायची परवानगी दिली की जाऊ लागतात. अर्थात ही परवानगी देताना किंवा थांबवताना तो

केवळ हातानेच इशारा करतो. फार वेळ गप्पा मारणे कधी त्याला आवडतच नसावे. कारण वाहतूक सुरक्षेची सारी जबाबदारी त्याच्यावरच असते. पण वाहतूक सुरक्षित करणाऱ्या या रक्षकाला ट्रॅफिक पोलिस या इंग्रजी नावानेच सारे जण ओळखतात.

तो सरकारी चाकर असल्यामुळे नेहमी गणवेशात वावरतो. गावाच्या किंवा शहराच्या मध्यभागी जो चौक असतो, तिथे तो वेळेवर जाऊन उभा राहतो. चारी दिशांनी धावणाऱ्या मोटारगाड्या, सायकली, स्कूटर्स, ट्रक वगैरेंनी सुरळितपणे आपापली वाहाने न्यावीत म्हणून त्यांना हाताने सूचना देणे हे त्याचे काम. हे काम करताना तो सतत उभा राहून इशारा करतो. ऊन असो वा पाऊस थंडी असो किंवा वारा, तो मनापासून आपले काम करीत असतो. जणू वाहतूक सुरक्षेची केवळ चाकरी नव्हे तर त्याने व्रतच घेतले आहे.

शाळा, कचेऱ्या सुरू होण्याच्या वेळी, मिरवणुकीच्या वेळी तर कधी कधी अपघातामुळे वाहनांची, माणसांची गर्दी चारी दिशांना वाढतच राहाते. अशा वेळी त्याच्यावर कामाचा खूप ताण पडतो. तरीही तो सतत काम करतच असतो. पण वाहतुकीचे नियम मोडून कुणी धावायला लागला की मग मात्र तो शिटीचा वापर करून अशा वाहनचालकाला थांबवतो. त्याला शिक्षाही करतो. असा हा ट्रॅफिक पोलिस, नात्याने आपला कुणी नसला तरी नकळत आपला होऊन गेलेला.

परत बाबा आईला सांगत होत की, पुण्या मुंबईसारख्या शहरात जसे मोठ्या रस्त्यावर 'सिग्नल्स' असतात, तसे आपल्याही गावात यंत्राद्वारे वाहतूक रक्षा करणारे दिव्यांचे खांब उभे केले जाणार आहेत. असे झाले तर सतत कष्ट करणाऱ्या 'ट्रॅफिक पोलिसाचे' कष्ट वाचतील हे खरे आहे. पण आता आपलाच झालेला हा रक्षक आपणाला रोजरोज दिसणार नाही त्याचं काय ?

●●●

## माझे आजोबा

तसे मला खूप मित्र आहेत. ते सर्वचजण मला आवडतातही. पण या सर्व मित्रांपैकी माझा आवडता मित्र कोणता माहीत आहे ? माझा आवडता मित्र आहे 'माझे आजोबा' ! लहान मुलांत लहान मुलांसारखे आणि मोठ्या माणसांत मोठ्या माणसांसारखे वागणारे माझे आजोबा, खरे तर आमच्या शिवाजी चौकात सर्वांचेच आवडते आहेत. गप्पा मारणे हा त्यांचा आवडता छंद आहे. शिवाय आमच्या चौकातल्या अनेकांना, घरच्या घरी वनस्पतीपासून औषधे तयार करून ते देतात. त्यामुळे ते सर्वांना परिचित आहेत.

आमच्या घरी तुम्ही केव्हाही आलात की 'या', 'कोण हवंय आपणाला' अशा खणखणीत आवाजातल्या प्रश्नाने तरी ते तुमचे स्वागत करतील; किंवा 'अरे वा, आज अगदी सकाळी लवकर काम काढलंत,' 'मी काही मदत करू का' या वाक्याने तरी गप्पांची सुरुवात करतील. तसे ते रंगाने सावळेच आहेत. पण हसरा चेहेरा, शुभ्र धोतर आणि स्वच्छ खणखणीत आवाज या तीन गोष्टींमुळे ते पटकन आपलं लक्ष वेधून घेतात. शिवाय कोणत्याही कार्यक्रमात भाग घ्यायला ते सतत तयार असतात. अहो, परवा आमच्या क्रिकेटच्या मॅचला चक्क अंपायर मिळेना, मग आम्ही गेलो आजोबांकडे. तसे ते हसत हसत म्हणतात कसे, "मला यायला खूप आवडेल. पण तू खरंच बाद होशील तेव्हा मी बोट वर करेन. तू बाद झाल्याचा इशारा करेन. तेव्हा रुसूबाईसारखा रुसणार नाहीस ना ?" मी 'नाही', म्हणताच ते भर उन्हात आमच्याबरोबर चक्क खेळायला देखील आले.

कधी कधी मला वाटतं देवानं त्यांना स्मरणशक्तीचं खास वरदान दिलेलं असावं. कारण जुन्या कविता छान आवाजात म्हणणारे आजोबा, 'देव एका पायाने लंगडा' हेही गोड आवाजात म्हणतात. शंका गणितातली असो वा इतर कोणत्याही विषयातली. त्याचे उत्तर ते लगेच देतात. प्रश्न पाठांतराचा असो किंवा नाटकातला प्रवेश म्हणून दाखवण्याचा, 'चल, मी घेतो करून तुझी तयारी' असे म्हणून ते हावभाव करून शिकवायला तयार.

हे सारे करताना त्यांचे पहाटेचे फिरणे, देवपूजा, व्यायाम, दुपारचे वाचन, संध्याकाळचा फेरफटका यात ते कधीही बदल करीत नाहीत. म्हणूनच त्यांनी स्वत:ची तब्येत छान सांभाळली आहे.

अडचण आईची असो, बाबांची किंवा दादाची, ते मदत करायला धावतील. पण वेळ मिळाला की लगेच माझ्याजवळ येऊन म्हणतील, 'बरं का लाडोबा, आज नवीन गोष्ट सांगेन.' सर्वांसाठी खूप काही करताना माझ्याकडे ते इतकं लक्ष पुरवतात, म्हणून मी त्यांना माझा लाडका दोस्त मानतो.

●●●

## कल्पना विलासात्मक

# सूर्य उगवलाच नाही तर

सकाळी लवकर उठून शाळेला जायचा मला खरंच खूप कंटाळा येतो. अरे विपुल, शाळेची वेळ झाली, ऊठ लवकर, असं आई तर केव्हापासून सांगत होती. पण पांघरूण बाजूला करून खरंच उठावसं वाटत नव्हतं. अरे दिवस उगवला, ऊठ बघू लवकर, आईने रागाने पांघरूणच हिसकावून घेतले, तेव्हा तर अस्सा राग आला आईचा. आणि हो, आईबरोबर सकाळी अगदी लवकर उगवणाऱ्या सूर्याचाही. मनात विचार आला, हा सूर्य जर उगवलाच नाही तर - खरंच, किती मज्जा येईल नाही. अगदी चंगळ होईल नुसती कारण सूर्यच उगवला नाही तर कोंबडा आरवणार नाही. पक्षी किलबिल करणार नाहीत. आईला सुद्धा पहाट कधी झाली हेही कळणार नाही, आणि तीच जर लवकर उठली नाही तर लवकर उठा रे, म्हणून तीही आपणाला कटकट करणार नाही.

अहो, मुळात सूर्यच उगवला नाही तर रात्र मुळी संपेलच कशी ? रात्र संपली तर अंधार सरणार नाही. बाबा ऑफिसला जाणार नाहीत. सगळीकडे अंधारच अंधार म्हणून अभ्यास नाही, शाळाही नाही आणि गंमत म्हणजे परीक्षाही नाही.

नाही पुस्तक नाही शाळा।
हवे तेवढे खुशाल खेळा।

या गाण्यातली मजा खरंच अनुभवता येईल आपल्याला. अरे हो, पण सगळीकडे जर अंधारच असला तर आपण खेळणार तरी कुठे ? कसे ? अहो, खेळाची गोष्ट सोडून द्या. पण सूर्य उगवला नाही तर शेतकरी शेतात कसे जातील ? झाडे, वेली फुलाफळांनी कसे बहरतील ? दुकानदार दुकाने कशी उघडतील ? जमीन तापली नाही. पाण्याची वाफ झाली नाही तर पाऊस कसा पडेल ? पाऊसच पडला नाही तर पिके नाहीत, फळे, फुले नाहीत की पाणीसुद्धा नाही ... आणि मग पाण्याशिवाय जीवन. छे! छे! एक सूर्य उगवला नाही तर केवढे घोटाळे होतील. त्यापेक्षा आपणच लवकर उठलेलं बरं म्हणून मी ताडकन उठलो. खिडकी उघडली. तसा स्वच्छ प्रकाश आत आला. खोली नुसती प्रकाशाने उजळून निघाली. हा प्रकाश साऱ्या जगाला देणाऱ्या सूर्यदेवाकडे बघून हात जोडीत मी म्हणालो 'नमस्कार माझा सूर्यनारायणासी'.

●●●

# मला लाख रुपये मिळाले तर

अस्सा राग आला होता आईचा. इतका सुंदर फ्रॉक, पण खूप महाग आहे. नंतरच घेऊ, असे म्हणून काहीच न घेता मला घरी घेऊन आली. सारखं आपले पैसे पैसे ... ते काही नाही. मला आवडलेला फ्रॉक आणला नाहीस ना तर मी मुळात जेवणारच नाही. असं म्हणून, रुसून रागावून मी कधी झोपले कळलंच नाही. एवढ्यात कुणी तरी मला हलवून जागं केलं. हळूच कानात विचारलं, तो पांढराशुभ्र फ्रॉक हवाय ना तुला? हो. पण आई म्हणते आपणाकडे एवढे पैसे नाहीत. समज, मी तुला एक लाख रुपये दिले तर ?

काय ? मी आनंदाने उठून बसले. तर माझ्यासमोर परीराणीसारखी एक सुंदर बाई उभी होती. पण मग ही आपल्याकडे कशी आली ?

माझा गोंधळलेला चेहेरा बघून ती म्हणाली. मला ओळखलं नाहीस ना, माझं नाव आहे भाग्यलक्ष्मी, लॉटरीच्या तिकिटावर जे चित्र आहे ना, ते माझंच आहे. आणि बरं का, मी आज अचानक का आले माहीत आहे, तुला पहिलं बक्षिस मिळालंय. ते ही एक लाखाचं, हे सांगायला आलेय मी. सांग बरं आता तू काय काय करशील ?

अरे वा, काय काय करशील म्हणजे ? सर्वप्रथम तो पांढरा शुभ्र फ्रॉक आणेन, शिवाय खूप खूप छान कपडे, रंगीबेरंगी खेळणी, झालंच तर आइस्क्रीम, चॉकलेट, क्रीमची बिस्किटे, गोष्टीची पुस्तके.... सगळं मला हवंय तितकं घेऊन येईन मी. शिवाय हे सारं ठेवायला एक मोठ्ठं कपाटही हवंय. तसंच घराभोवती छान बगीचा असलेलं एक घरही घ्यायचंय मला. बाबांना, आईला भरपूर कपडे. आजोबांना बसायला मस्तपैकी आरामखुर्ची सारं काही घ्यायचंय मला. शिवाय आमच्या घराशेजारीच राहाणाऱ्या रोहितला कधी नवी पुस्तके घेतली जात नाहीत. म्हणून तो दरवर्षी रुसतो आणि माझ्या नव्याकोऱ्या पुस्तकांवरून सतत हात फिरवून बघतो. मला लाख रुपये मिळाले की मी त्यालाही सगळा नवा सेटच आणून देणार आहे. शिवाय वाढदिवसाच्या दिवशी सगळ्या मैत्रिणींना भरपूर आइस्क्रीम देणार. नवा फ्रॉक घालून नव्या कोऱ्या गाडीतून शाळेत जाणार. मैत्रिणींच्या देखत गाडीतून टुणकन उडी मारून खाली उतरणार - असं म्हणून मी उडी मारली. उडी कुठली झोपेतच कॉटवरून खाली पडले. आई गं, माझा रडवेला आवाज ऐकून आई धावतच आली. तिनं मला जवळ घेतलं, पण ती भाग्यलक्ष्मी, नवं घर, बगीचा, नवा फ्रॉक हे सारं कुठाय.... म्हणजे इतका वेळ आपण जे बेत आखत होतो, ते लाख रुपये, हे सारं फक्त स्वप्नंच होतं तर !

●●●

# मी मुख्याध्यापिका झाले तर

सलग चार दिवस शाळेत अनुपस्थित राहिल्याबद्दल, नेहेमी नेहेमी शाळा चुकविणाऱ्या मुलांबरोबर मलाही कर्वेबाईंसमोर उभं केलं होतं. आता सर्दी, खोकला आणि ताप सारं काही एकदम आल्यावर कुणी शाळेत येणं शक्य तरी आहे का? पण एवढी साधी गोष्ट सुद्धा आमच्या कर्वेबाईंना कळू नये? 'पुन्हा जर न सांगता घरी राहिलीस तर शाळेतून नाव काढून टाकीन,' अशी धमकी त्यांनी मला दिली तेव्हा अस्सा राग आला होता. पण करणार काय? मनातल्या मनात दात - ओठ खात मी बाहेर पडले खरी. पण तेव्हाच मनाच विचार आला, खरंच, मी मुख्याध्यापिका झाले तर!

मी मुख्याध्यापिका झाले की मुलांशी अगदी प्रेमळपणे वागेन. शाळेतून उशिरा येणाऱ्या मुलांकडे चष्म्यातून डोळे मोठ्ठे करून न बघता, त्यांना समजावून घेण्याचा प्रयत्न करेन. शाळेत नेहेमीनेहेमी गैरहजर राहणाऱ्या मुलांना विश्वासात घेऊन त्यांची अडचण आधी समजावून घेईन. बाबा तर म्हणतात, जे काम छडीने होत नाही ते गोडीगुलाबीने होते. त्यामुळे जी मुले खोडकर असतील त्यांच्या मुलांना, पालकांना योग्य शब्दात शाळेचे महत्त्व पटवून देईन.

शालेय जीवनात सर्व मुलांना जिचा कंटाळा येतो ती गोष्ट म्हणजे परीक्षा. पण माझ्या शाळेतील सर्वच शिक्षक मुलांना छान हसत खेळत शिकवतील याची मी काळजी घेईन. मुलांना सोप्या, सुंदर भाषेत उत्तरे कशी लिहावयाची हे शिकवण्याची जबाबदारी घेईन. आजकाल सर्वच शाळांमध्ये हुशार मुलांना आणखी गुण मिळावे म्हणून खास प्रयत्न केले जातात. खरं तर, खरी आवश्यकता असते ती मंदबुद्धीच्या मुलांना स्वतंत्र मार्गदर्शन करण्याची. म्हणून तर मी निश्चय केला आहे की मी मुख्याध्यापिका झाल्यावर अशा मंद मुलांसाठी खूप मेहनत घेईन. म्हणजे त्यांनाही परीक्षेची भीती वाटणार नाही. शिवाय अशा प्रयत्नांमुळे माझ्या शाळेचा निकालही छान लागेल.

याशिवाय मुलांना त्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा विकास करता येईल, अशा सर्व संधी मी त्यांना मिळवून देईन. माझी शाळा एक आदर्श शाळा बनेल, यादृष्टीने शक्य तितके सर्व प्रयत्न करेन. पण हे सारं केव्हा? मी मुख्याध्यापिका झाल्यावर, तोपर्यंत मात्र मला कर्वेबाईंचं ऐकायलाच हवं.

●●●

# मी सैनिक झालो तर

'जालियनवाला बागेच्या हत्याकांडाची' गोष्ट सरंजामेबाईंच्या तोंडून ऐकली आणि तेव्हाच मनाशी ठरवलं की, हजारो निरपराध भारतीयांना क्रूरपणे ठार मारणाऱ्या इंग्रजांचा बदला आपणही घ्यायचाच. आपल्या पवित्र भारतमातेचं रक्षण करण्यासाठी आपणही आपल्या जीवाची तमा न बाळगता गरज पडल्यास बलिदानही करायचं. पण देशरक्षणाचं हे काम करायचं असेल तर मला सैनिक व्हायला हवं. खरंच मी सैनिक झालो तर !

मी अगदी लहानपणापासून, जेव्हापासून कळायला लागलं तेव्हापासून युद्धाच्याच गोष्टी जास्त ऐकल्या आहेत. त्या गोष्टी ऐकताना जुलूम आणि अन्याय करणाऱ्या साऱ्या स्वार्थी राजांची मला खूप चीड येत असे. आजही मला अशा राजवटीचा राग येतो. म्हणूनच मी ठरवलंय, आपणही सैनिक व्हायचं. सैनिक झाल्यानंतर भारतमातेचं रक्षण हे मी माझं पहिलं महत्त्वाचं कर्तव्य मानेन.

आपण १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झालो असलो, तरीही आज आपला देश पूर्णपणे सुरक्षित आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. या संपन्न भूमीला लुटायला पाकिस्तानसारखी शत्रूराष्ट्रे सदैव टपून बसलेली आहेत. म्हणून तर मी सैनिक होताच, डोळ्यात तेल घालून आपल्या देशाचं रक्षण करायचा प्रयत्न करेन.

अर्थात आपल्या देशाला धोका काही भारताबाहेरील देशांकडूनच आहे असे नाही. आपल्याच देशातील काही स्वार्थी व्यापारी पैशासाठी इतके हपापलेले असतात की ते चोरून मादक द्रव्ये आपल्या देशात आणतात. तरुण मुलांच्या तब्येतीचे त्यामुळे खूपखूप नुकसान होते, हे मी बाबांच्या, आईच्या तोंडून ऐकले आहे. मी सैनिक झाल्यावर अशा वस्तू आपल्या देशात येणार नाहीत अशी व्यवस्था करेन. अशा वस्तू चोरून आणणाऱ्या लोकांना पकडून आणेन. जरूर पडल्यास त्यांचा प्राण घेऊन तरुण मुलांना वाचवेन. या वाईट वस्तूंबरोबरच चोरून बॉम्ब वगैरे आणणारे लोकही आपल्या देशात आहेत हेही मोठ्यांच्या तोंडून ऐकले आहे. मुंबई, म्हणजे महाराष्ट्राची राजधानी. माणसांनी गजबजलेल्या या शहरात परवाच स्फोट झाला, तेव्हाही म्हणे हजारो माणसे मारली गेली. आपल्या देशाला काळीमा लागेल अशा गोष्टी पुन्हा इथे घडणार नाहीत याची मी काळजी घेईन. हे सारं करताना कदाचित मला प्राणासही मुकावे लागेल. पण प्राण गेला तरी बेहत्तर, मी माझ्या देशाचे रक्षण करेन, कारण शिवबांच्या, टिळक, गांधीजी, बाबू गेनू, भगतसिंग यांच्या प्रयत्नांतून स्वतंत्र झालेल्या देशाचा मला खूप खूप अभिमान वाटतो. या देशाचे रक्षण हे मी माझे प्रमुख कर्तव्य मानतो.

●●●

# अचानक परीराणी भेटली तेव्हा

काकूंच्या बाळाचे बारसे, म्हणून घरातली सगळीजण तिकडे गेली होती. पण उद्या माझी गणिताची परीक्षा म्हणून मला मात्र एकटीला घरी बसवलं होतं. अभ्यास करण्यात माझं तर मुळीच लक्ष लागत नव्हतं. सारखी झोप येत होती. एवढ्यात कुणीतरी खांद्याला धरून हलवलं. ए वेडाबाई, पेंगतेस काय अशी? अशाने अभ्यास कसा होणार? अरे, हा आवाज तर आईचा नव्हे, मग बोलंतय कोण? म्हणून मी डोळे उघडून बघितलं. आणि माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. समोर चक्क परीराणी उभी होती! सुंदर पंख, झगमग करणारे कपडे, सुंदर चेहेरा आणि गोड आवाज. इतकी सुंदर दिसत होती की बघतच राहावसं वाटेल.

'एकटीला घरात बसून कंटाळा आला ना?' चल आपण एक फेरफटका मारून येऊ असं म्हणून तिनं आपल्या सुंदर पंखांवर बसायची मला खूण केली. बघता बघता उंच आकाशात तिने झेप घेतली. घरे, माणसे, झाडे सारे लहान लहान ठिपक्यांसारखे दिसू लागले. नंतर नंतर तिने वेग इतका वाढवला की मी घाबरून किंचाळलेच, तशी हसत हसत ती म्हणाली, 'घाबरू नकोस, समोर ती हिरवीगार टेकडी दिसतेय ना, तिथे सध्या राहातोय आम्ही. असं म्हणत तिने वेग कमी केला आणि मला हळूच पंखावरून खाली उतरवलं.

हिरवीगार टेकडी कसली? जादूनगरी होती ती. फुलांचे सुंदर ताटवे, त्यावर भिरभिरणारी फुलपाखरे, अवतीभोवती तुरुतुरु पळणारी हरणे, काय नव्हतं त्या सुंदर बागेत? त्या बागेच्या मध्यभागी एक छान महाल होता. त्या महालाच्या भिंतींत तर हिरेच बसवले असावेत. परीराणीइतक्याच अनेक सुंदर पऱ्या तिथे होत्या. त्यांनी आमचे खूप छान स्वागत केले. सोन्याच्या ताटातून, चांदीच्या झारीतून एकापेक्षा एक सुंदर पदार्थ आणि पेये त्यांनी आमच्यासमोर आणून ठेवली. मला तिथे घेऊन येणारी परीराणी म्हणाली, बरं का सख्यांनो, ही आपली नवी मैत्रिण. बालमैत्रिण म्हणा हवं तर; इथेच राहील आता. काय राहाशील ना? फक्त अट एक, तुला घरी मात्र जाता येणार नाही. तिच्या या प्रश्नासरशी मात्र मी दचकले, म्हटलं छे! छे! मला तुमची ही सुरई नको, सोन्याचे ताट नको, हा इतका सुंदर महाल नको, काही नको, मला माझी आई हवीय, घर हवंय, मला माझ्या घरी जायचंय. छान! अभ्यास करायचा सोडून झोपा काढताय वाटतं, खणखणीत आवाजातला प्रश्न कानावर आला म्हणून पुन्हा डोळे उघडून बघितले, तर समोर आई उभी. माझी आई. आई, मी तुला सोडून कुठे जाणार नाही, म्हणून मी तिला बिलगले. पण तिला कळलंच नाही, मला काय झालंय ते.

●●●

# बाबांनी केलेला स्वयंपाक

तुम्ही आमच्या घरी याल ना, तेव्हा बाहेरच्या खोलीत काचेच्या कपाटात जी सगळी बक्षिसे तुम्हाला दिसतील ना, ती एकट्या बाबांनी मिळवलीत बरं का. ते आहेतच मुळात हुशार. अभ्यासाची, खेळाची आणि म्हणे चित्रकलेची सुद्धा त्यांना लहानपणापासून बक्षिसे मिळत गेली. पण अशा आमच्या या बाबांना एक गोष्ट मात्र बिलकूल येत नाही बरं का, आणि ती म्हणजे स्वयंपाक.

एकदा काय झालं, रविवारचा सुट्टीचा दिवस म्हणून आम्ही सगळेच उशीरा उठलो. उठून बघितलं तर आई मात्र उठायलाच तयार नाही. बाबा म्हणाले, दोन तीन दिवस पावसात भिजलीय ना, तिला भरलाय ताप. तुम्ही उठा बघू, मी दूध आणतोच एवढ्यात. आई कधीच झोपून राहात नाही, त्यामुळे बाबांना स्वयंपाकघरातलं काही करायची मुळी वेळच येत नाही. त्यामुळे साधा साखरेचा डबा सुद्धा सापडेना त्यांना. पण त्यांच्याजवळ उत्साह मात्र भरपूर होता. आम्हाला चक्क थंडगार दूध देता देता म्हणाले, 'बरं का मुलांनो, पोळ्या, शिरा, भात-भाजी सारं करणार आहे मी. फक्त तुम्ही दोघांनी एक करायचं, माझं सारं करून होईपर्यंत खेळायला जायचं नाही. हे पदार्थांचं पुस्तक. पान ७५ काढा, हा शिरा प्रथम करून घेऊ. तुम्ही सारखे वाचत राहा. आपली क्रिकेटची मॅच चालू असताना नाही का सतत वर्णन ऐकवलं जात. बस, तस्संच बोलत राहा, असंच म्हणत बाबा स्वत:च बोलत होते. बाजीप्रभूच्या थाटात सगळ्या स्वयंपाकभर फिरत होते. एका हातात झारा, दुसऱ्या हातात चिमटा, आणि सतत बडबड, 'हां, काय म्हणालात? अंदाजाने पाणी घाला; अरे, अंदाजानेच घातलंय, पण हा असा घट्ट गोळा कसा तयार झालाय? कदाचित पाणी कमी पडलं असेल, बरं आता पोळ्या करताना मात्र नीट सांगा हं, आता पाणी कमी पडता कामा नये. असं म्हणत जवळ जवळ कळशीभर पाणी त्यांनी पिठात ओतलं. तसं परातीतून, ओट्यावरून ते पिठाच्या पाण्याचे ओघळ खाली आले, अरे बापरे! थांब, आता या पाण्यात मावेल एवढं पीठ घालू या म्हणजे काम झालं असं म्हणत ते उठायला गेले, तोपर्यंत त्या पिठाच्या पाण्यावरून त्यांचा पाय घसरला. ते त्यांच्याच नकळत इतक्या जोरात आपटले आणि त्यांच्या हाताचा धक्का लागून तिखटाची बरणी, तेलाचं भांड सारं काही फरशीवर उपडं झाला. 'अरे देवा! एकवेळ ऑफिसची 'डबल ड्यूटी' परवडली पण हा एकवेळचा स्वयंपाक नको रे बाबा. चला उठून पुसून काढू.' असं म्हणून ते कसेबसे उठले. एवढ्यात आईच समोर येऊन उभी राहिली. म्हणाली, "असू दे थोडासा ताप. मी बघेन काय करायचं." "नाहीतर तू आता असं कर, उठलीच आहेस तर हा कुकर तिकडे घे. आणि त्यातला

वरणभात तुम्ही तिघे खाऊन घ्या बरं.'' बाबा म्हणाले, ''तो तरी नीट केलात का ?'' असं म्हणून आईनं कुकरचं झाकण उघडलं आणि दुसऱ्याच क्षणी ती ओरडली, ''अहो, डाळ, तांदूळ सारं काही तसंच आहे.''

आता मात्र बाबांचा चेहेरा खरंच पडला. आईकडे बघत ते म्हणाले, अगं पुस्तकात लिहिलं तस्सं सगळं केलंय. तरीही भात झालाच नाही ?

''अहो राजे, पण हा कुकर गॅसवर ठेवल्यावर गॅस चालू कोण करणार ? उठा मीच बघते.''

तर असा बाबांनी स्वयंपाक केला आणि आम्हांला छान उपवास घडला.

●●●

# गणपती बाप्पा बोलू लागला

''मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरया'', आरतीनंतरचा हा गजर अतिशय मोठ्या आवाजात सुरू होता. आईने आलेल्या पाहुण्यांची जेवणे लवकर आटोपावीत म्हणून नैवेद्याचे ताट उचलले, तसा आवाज आला, 'थांबा, ठेवा ते ताट तिथंच.'

प्रथम आईला वाटलं हा घरातल्याच पोरांचा चावटपणा असेल. आईप्रमाणेच सगळ्यांनाही तसंच वाटलं. पण नाही, आम्हांला आलेली शंका खरी होती. इतका वेळ आम्ही सर्वांनी ज्याची मनोभावे पूजा केली होती तो गणपती बाप्पाच अचानक बोलू लागला. म्हणाला, 'भक्तांनो, तुम्ही सगळे एकत्र येऊन माझं स्मरण करता, याचा मला खूप खूप आनंद वाटतो. पण गेले कित्येक वर्षे मी पाहातोय, मी येण्याआधीपासून तुम्ही घरात माझ्या स्वागताची तयारी करता. खूप छान रोषणाई करता, सजावट करता, खूप पैसे खर्च करून खूप छान छान पदार्थ करता आणि सारे मोठ्या आनंदाने फस्त करता. यात थोडासा बदल करावा असं नाही वाटत ?

तुम्ही नैवेद्याचे ताट आत नेताय म्हणून नाही तक्रार करीत मी. तुमच्या भक्तीनं माझं पोट कधीच भरलंय. पण पोटभर खाण्याइतकं किंवा त्यापेक्षा जास्त ज्यांच्याजवळ आहे, त्यांनी एखाद्या तरी गरीब माणसाला पोटभर जेवणं द्यावं. त्याला त्यामुळे समाधान मिळेल, मलाही मिळेल.

आणि लोकांकडून हट्टाने वर्गणी गोळा करून गल्लीबोळात माझी स्थापना करता, तिथेही सजावटीकरता हजारो रुपये खर्च करता. त्यापेक्षा हेच पैसे इतर चांगल्या कामासाठी वापरलेत तर आम्हा देवदेवतांना खरंच आनंद वाटेल. अरे, देव प्रसन्न होण्यासाठी हा थाटमाट कशाला हवा ? खरी भक्ती असेल तेव्हा देव भक्ताकडे

आपण होऊन जातो. भक्ताघरी उष्टी काढणारा, जनाबाईचं दळण दळणारा भगवंत हा खरंच प्रेमाचा भुकेला असतो, भावाचा, भक्तीचा भुकेला असतो.

हे प्रेम गोरगरीब लोकांना देव मानून त्यांना द्या. त्यांनाही सुखाचे चार घास खाऊ द्या. तिळगुळाचा एक कण सात जणात वाटून खावा म्हणतात. तुमच्या जवळ तर खूप काही आहे, ते एकमेकांना देऊन खा आणि आनंदी राहा. असे म्हणून तो बोलायचा थांबला, तसा आनंदाने आम्ही पुन्हा गजर केला, 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया.'

●●●

## आमची चंद्रावरची सहल

तुम्ही या गोष्टीवर कदाचित विश्वासही ठेवणार नाही. पण परवाच आमच्या वर्गाची सहल चंद्रावर जाऊन आली. त्याचं काय झालं, या वर्षी सहलीचं ठिकाण ठरवण्याबाबत एकमतच होईना, सर्वांना काहीतरी वेगळं ठिकाण हवं होतं, म्हणून शेवटी चंद्रावरच जायचं ठरवलं.

प्रथम सर्वांच्या घरी आईवडिलांनी थोडीशी तक्रार केली. पण पाचवीच्या मुलांना अर्धे तिकिट. शिवाय शाळेची मुलं म्हणून खास सवलत. हे ऐकून मात्र बरेच जण यायला तयार झाले.

अर्थात ही सहल चंद्रावरील. त्यामुळे वेळ मात्र रात्रीची निवडावी लागली. ठीक नऊ वाजता आमच्या रॉकेट १ ने उड्डाण केले. क्षणभर आम्ही घाबरलो. पण मग त्या वेगाचा आम्हाला सराव झाला. एरवी खूप लांब दिसणाऱ्या चांदण्या आता थोड्याशा जवळ आल्या आहेत असे वाटत होते. निळ्या आभाळाची ती सुंदर रूपे बघता बघता आम्ही चक्क एके ठिकाणी खाली उतरलो.

गुरुजी म्हणाले, 'बरं का मुलांनो, हा आपला चांदोबा ऊर्फ चंदामामा. आपल्या पृथ्वीवर चांदण्याची शीतल बरसात करणारा, गप्पागोष्टींतून, गाण्यांतून तुमच्या भेटीला बाळपणापासून येणारा हाच तो तुमचा दोस्त. याच्यासाठीच श्रीरामाने आपल्या मातेजवळ हट्ट धरला होता. याच्याच दर्शनाने आपल्या घरातील वडील -माणसे चतुर्थीचा उपवास सोडतात.

गुरुजी एकीकडे बोलत होते, पण आता त्या बोलण्यात मला फारशी मजा वाटत नव्हती. कारण तिथे उतरल्यानंतर इकडे तिकडे फिरताना फक्त खाचखळगे जाणवत होते. गच्चीतून दिसणारा देखणा चंदामामा आणि हा प्रत्यक्षातला चांदोबा यात खूपच फरक होता. हा तर आजोळच्या खाच - खळग्यांच्या गावांसारखा; म्हणजे 'दुरून डोंगर साजरे' म्हणतात ते याचमुळे की काय? हां, पण तेथून

आपली पृथ्वी मात्र खूपच सुंदर दिसत होती. तिचं, इतर ग्रहांचं वर्णन गुरुजी करीत होते. एवढ्यात गौतम मला हळूच म्हणाला, ए, आपण काहीतरी खाऊ या का रे? मी म्हटलं, चल, मला पण भूक लागलीय. पण भूक लागली, तहान लागली तरी आम्हाला तिथे काही खाता येईना की पिता येईना, कारण गुरुजी म्हणाले तिथे. म्हणे गुरुत्वाकर्षणच नाही. आम्हांला तर भूक आणि तहान दोन्ही लागली होती, म्हणून आम्ही पटकन जाऊन रॉकेटमध्ये बसलो आणि वेगाने खाली आलो. जमिनीवर आलो तेव्हा किती आनंद झाला म्हणून सांगू?

●●●

# गाडगे महाराज

आपला महाराष्ट्र ही थोर संतांची आणि महान नेत्यांची एक अनमोल खाण आहे. संत गाडगेमहाराज हे या अनमोल खाणीतील अतिशय मौल्यवान असे रत्न आहे. तसे खऱ्या धर्माची ओळख करून देणारे अनेक संत आपल्या भूमीत होऊन गेले. पण लोकांना पटेल, रुचेल अशा भाषेत एकतेचे, स्वच्छतेचे, मानवतेचे धडे मात्र गाडगेमहाराजांनीच दिले. सोपे सोपे प्रश्न विचारून लोकांकडून त्यांची ते उत्तरे मागवीत, मग हळूच त्यांच्या चुकांवर बोट ठेवून, त्यांना नेमकं कसं वागावं हे सहजपणे पटवून देत, 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले.' या ओळीप्रमाणे खरोखरच लोकशिक्षणाचे धडे देताना त्यांनी समाजसुधारणेचे अनेक प्रयत्न केले. स्वच्छतेचा पाठ आधी स्वत: गिरवला. देवालयाच्या दाराजवळचा परिसर ते स्वत: झाडून स्वच्छ करत. मग इतरांना साफसफाईचे महत्त्व समजावून सांगत आणि म्हणूनच हे व्यक्तिमत्त्व इतरांपेक्षा नक्कीच वेगळे आहे.

त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ साली झाला. परीट जातीत जन्माला आलेल्या गाडगेमहाराजांचे खरे नाव डेबूजी झिंगराजी जाणोरकर. पण लोकशिक्षणाच्या निमित्ताने ते जेव्हा गावोगाव फिरू लागले, तेव्हा त्यांचा वेश अतिशय फाटका असे. हातात एक गाडगेही असे. म्हणून लोक त्यांना गाडगेमहाराज म्हणू लागले. आजही ते याच नावाने प्रसिद्ध आहेत.

समाजातील अंधश्रद्धा, भोळ्या धार्मिक कल्पना आपल्या प्रगतीच्या आड येताहेत, पण हे लोकांना समजत नाही. हे ध्यानात येताच त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथील गावोगावी जाऊन कीर्तने केली. कर्ज काढू नये, चोरी करू नये, दारू पिऊ नये, देवापुढे पशूचा बळी देऊ नये इतक्या सोप्या शब्दांत त्यांनी लोकांना शिकवण दिली. पण ती देण्याआधी सर्वसामान्य लोकांच्या जीवनातलाच एक प्रसंग ते त्यांना सांगत. त्यांच्या चुका त्यांच्या नजरेला येतील अशा भाषेत त्यांना समजावून सांगत.

तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते स्वत: जात असत. पण स्वत: मात्र मंदिराबाहेर थांबून तेथील आवार स्वच्छ करीत. श्रीमंतांनी दिलेले अन्न ते गोरगरिबांना वाटून टाकत. सधन लोकांनी दिलेल्या पैशांतून त्यांनी अनाथ आणि अपंग लोकांसाठी आश्रम काढले. गोरक्षण संस्था उभ्या केल्या. पंढरपूर, नाशिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी

येथे त्यांनी धर्मशाळा बांधल्या. अशा प्रकारे लोकशिक्षणाचे आणि समाजसुधारणेचे व्रत त्यांनी घेतले होते. अशा या थोर महात्म्याने २० डिसेंबर १९५६ रोजी या जगाचा निरोप घेतला.

●●●

## संत रामदास

प्रसंग आहे एका लग्नमंडपातला. विवाहाचा क्षण अगदी जवळ येऊन ठेपलेला. मंगलाष्टके म्हणणाऱ्या भटजींनी मोठ्या आवाजात 'सावधान' म्हणायचा अवकाश, नवरदेवाने चक्क मंडपातून धूम ठोकली. प्रत्यक्ष लग्नमंडपातून धूम ठोकणारे हे नवरदेव कोण होते माहीत आहे ? ते होते समर्थ रामदास स्वामी.

त्यांचा जन्म चैत्र नवमी शके १५३० ला झाला. त्यांचे मूळ नाव नारायण. लहानपणी ते अतिशय हूड होते. पण तरीही आपल्या मोठ्या भावाप्रमाणे आपणही दीक्षा घ्यावी, अध्यात्माचा अभ्यास करावा असे त्यांना खूप वाटे. पण त्यांचा हूडपणा लक्षात घेऊन त्यांच्या मोठ्या भावाने त्यांना नकार दिला. तेव्हा त्यांनी स्वतःच लग्नमंडपातून पळ काढला. गोदाकाठी जाऊन तपश्चर्या केली.

त्यानंतर मात्र त्यांनी लोकजागृतीचे कार्य हाती घेतले. गावोगाव फिरून त्यांनी लोकांचे धर्मविषयक अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. अतिशय सोप्या आणि सुंदर भाषेत त्यांनी लोकांना शिकवण देण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष हिंदवी राज्याची निर्मिती करणाऱ्या शिवाजी राजांनाही त्यांनी उपदेश केला होता. जनजागृतीचे हे कार्य करीत असतानाच त्यांनी दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके यांसारखे एकापेक्षा एक श्रेष्ठ ग्रंथही लिहिले. त्यांची लयबद्ध रचना, सुंदर आणि सोपी भाषा, त्यात दडलेला खोल अर्थ- यामुळे आजही त्यांतील कित्येक ओळी आपल्या ओठांवर सहज येतात. हे सारे करीत असतानाच कृष्णेच्या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी त्यांनी मारुतीची मंदिरे उभी केली. लोकांना बलोपासनेची शिकवण दिली. चाफळच्या खोऱ्यात रामाचे मंदिर बांधून, त्यांनी बराच काळ तिथे घालविला. पण आपला संसार सांभाळूनही आपण कसे सदाचारी होऊ शकतो हे त्यांनी जनतेला पटवून दिले. म्हणूनच आज काळ बदलला तरी त्यांच्या श्लोकांतूनच आपणाला आपल्या अडचणी दूर करणारा मार्ग सापडतो.

●●●

# संत तुकाराम

शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी ॥
मुखी अमृताची वाणी। देह देवाचे कारणीं ॥
सर्वांग निर्मळ। चित्त जैसे गंगाजळ ॥

ह्या सुंदर ओळींचा हा अभंग कोणाचा आहे माहीत आहे ? ही रचना आहे संतकवी तुकाराम यांची.

त्यांचा जन्म पुण्याजवळ देहू येथे सन १६०८ मध्ये झाला. त्यांच्या घरचा व्यवसाय वाण्याचा होता. पण तरीही त्यांच्या बालपणीच त्यांच्यावर भक्तियुक्त संस्कार झाले. घरची महाजनकी असल्याने ते लवकरच लिहायला, वाचायलाही शिकले. आई-वडिलांकडून त्यांनी भक्तीचा वारसा घेतला. तर लहान वयापासून कीर्तने, प्रवचने ऐकून त्यांचे स्वत:चे छान विचारही तयार झाले.

पण बालपण बरेचसे सुखात गेलेल्या तुकोबांना वयाच्या १७ व्या वर्षापासून दु:खेच दु:खे भोगावी लागली. त्यांचा व्यवसाय बंद पडला, आई-वडील गेले, त्यातच त्यांचे कुटुंब दुष्काळात होरपळले. जीवनाचे हे महाभयंकर रूपही त्यांच्या वाट्याला आले, म्हणूनच असेल कदाचित

जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण।

यासारख्या ओळी ते सहज लिहू शकले. मुळात त्यांना कवित्वाची प्रेरणा ही स्वप्नात मिळाली. त्याच्याच जोडीला त्यांनी घेतलेले जीवनाचे कडूगोड अनुभव. त्यामुळेच सुंदर, सोप्या अशा पाच हजार अभंगांची गाथा त्यांना सहज लिहिता आली. अर्थात त्यांचे हे मोठेपण मानवले नाही, म्हणून मंबाजीने, रामेश्वर भट्टाने हे अभंग इंद्रायणीत बुडविले. पण जीवनाच्या सर्वच कठीण परीक्षांत यशस्वी ठरणाऱ्या तुकोबांना चौदाव्या दिवशी इंद्रायणीने हे अभंग परत केले.

ह्या अभंगांच्या आधारे हरिनाम घेता घेता, जीवनातील अडचणींवर कशी मात करायची हे त्यांनी लोकांना शिकवले. गावोगाव कीर्तने करून लोकांमध्ये भक्तीभाव, समाधानी वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. म्हणून तर त्यांना भागवतधर्मावरील कळस मानले जाते.

●●●

# गानकोकिळा - लता मंगेशकर

'घन:श्याम सुंदरा, श्रीधरा अरुणोदय झाला'

सकाळच्या मंगलवेळी हे मंगल सूर कानी पडले की आपला दिवस सुरू होतो. तेव्हापासून ते रात्री झोपेपर्यंत, प्रवासात, मंदिरात, शाळेत, चित्रपटगृहात... कुठेही गेलात तरी एक गोड गळा तुमच्या सोबत असेलच. हा लहान मोठ्यांची, गरीब, श्रीमंताची, हिंदी, मराठी, पंजाबी.... सर्वांची सोबत करणारा गोड गळा आहे लतादीदींचा.

लता मंगेशकर - भारतीय संगीतातील एक असामान्य कलाकार. मधुर, मुलायम अशा अमृततुल्य आवाजातून ज्यांनी हजारो भावगीते, भक्तीगीते, चित्रपटगीते गायिली असे एक श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व. भारतीय संगीताला सगळ्या जगात लोकप्रियता मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. पण एवढी मोठी कामगिरी केल्यानंतरही त्यांचे शांत, पाणीदार डोळे प्रेमळपणे आपल्याकडे पाहून हसतात. त्यांचा साधेपणा, त्यांच्याकडे आपले लक्ष पुन्हापुन्हा वेधून घेतो, तेव्हा अशा श्रेष्ठ गायिकेबद्दल नेमकं काय लिहावं हेच कळत नाही.

अर्थात संगीताचा वारसा या गायिकेने प्रत्यक्ष आपल्या वडिलांकडूनच घेतला आहे. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ साली झाला. वडील मा. दीनानाथ हे श्रेष्ठ संगीतकार होते, त्यामुळेच उत्कृष्ट गाण्याचे संस्कार त्यांच्यावर बालपणीच झाले. पण दुर्दैवाने वडील वयाच्या १२ व्या वर्षी गेले आणि एवढ्या लहान वयातच कुटुंबप्रमुखाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. पण असे असूनही अतिशय कष्ट करून त्यांनी परिस्थितीवर मात केली.

आज भारतातील संस्कृत, मराठी, हिंदी, पंजाबी.... अशा वेगवेगळ्या भाषांमधील त्यांची हजारो गाणी लोकप्रिय झालेली आहेत. संत कबीर, सूरदास, ज्ञानेश्वर, तुकारामापासून ग. दि. माडगूळकरांपर्यंतच्या अनेक संताच्या, श्रेष्ठ कवींच्या कविता त्यांनी गायिलेल्या आहेत. एक प्रसिद्ध पार्श्वगायिका म्हणून त्या परिचित आहेत.

पण या श्रेष्ठ व्यक्तीजवळ आणखी एक महत्त्वाची कला आहे आणि ती म्हणजे 'फोटोग्राफीची.' याशिवाय त्याचे पाठांतरही खूप आहे. वाचनही अफाट आहे. पण हे सारे उद्योग करीत असताना हजारो मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांच्यावर

प्रेमाचा वर्षाव करताना त्या कुठेच कमी पडत नाहीत. मला वाटतं, म्हणूनच या असामान्य कलाकाराचा उल्लेख 'कल्पलता' म्हणून केला जात असावा.

●●●

## सुनिल गावसकर

भारतीय क्रीडाक्षेत्रात मानबिंदू ठरणारा एक श्रेष्ठ खेळाडू म्हणून ज्याचा उल्लेख करावा लागेल, असा खेळाडू म्हणजे 'सुनिल गावसकर'.

मुळात क्रिकेट हा लहानांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांचा आवडता खेळ. त्यात सुनिल गावसकरसारखे खेळाडू जेव्हा खेळत, तेव्हा भारतीयांनी जो आनंद लुटला असेल त्याचे वर्णन शब्दांत करणे कठीण आहे.

लहानपणीच क्रिकेटच्या खेळातील चुणूक सुनिलने दाखवली. त्यानंतर चिकाटी आणि एकाग्रतेच्या जोरावर याच खेळावर लक्ष केंद्रित केले. सन १९७१ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भाग घेतला आणि चक्क ७७४ धावा काढल्या. तेव्हापासून ते १९८७ पर्यंत सुनिल गावसकरने 'एक श्रेष्ठ फलंदाज' म्हणून जगाला स्वत:ची ओळख करून दिलीच. शिवाय भारतीय संघालाही अनेक विजय मिळवून दिले.

संयम, चिकाटी आणि एकाग्रतेच्या जोरावर या फलंदाजाने नेहमी शास्त्रशुद्ध खेळ केला. वेस्टइंडिज, इंग्लंड, न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया वगैरे अनेक देशांतील खेळाडूंशी त्याने दोन हात केले आहेत. अनेकदा भारताचा कर्णधार या नात्यानेही जबाबदारी स्वीकारली आहे आणि भारताला विजयही मिळवून दिला आहे.

आतापर्यंत बरोबर १२५ कसोटी सामन्यांतून त्याने फलंदाजी केली. त्याची या सर्व सामन्यांतील धावसंख्या आहे चक्क 'दहा हजार एकशे बावीस' इतकी.

अर्थात एवढी विलक्षण कामगिरी करणाऱ्या या खेळाडूने अनेक मान सन्मान मिळवले. भारतीय संघाला मिळवून दिले. पण योग्य वेळ येताच त्याने थांबायचाही, खेळातून निवृत्त व्हायचाही निर्णय १९८७ साली घेतला. हे बघितले की वाटते, ही माणसे कर्तृत्वाने जितकी मोठी होतात तितकीच ती मनाने मोठी आहेतच. अशा महान खेळाडूला जन्म देणारी आपली धरणीमाता खरंच धन्य आहे.

●●●

# प्रियदर्शिनी - इंदिरा गांधी

'बाप से बेटा सवाई' यात थोडासा बदल करून 'बाप से बेटी सवाई' अशाच शब्दांत जिचा उल्लेख करावा लागेल अशी एक महान व्यक्ती म्हणजे आपल्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी.

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या या लाडक्या कन्येचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ या दिवशी अलाहाबाद इथे झाला. त्या दरम्यान स्वातंत्र्य लढ्याने चांगलेच बळकट रूप धारण केले. त्यात पंडित नेहरूंचा समावेशही मोठ्या प्रमाणावर होताच. त्यामुळे अगदी लहान वयातच राजकारणाचे धडे समजावून घेणे त्यांना शक्य झाले.

मुळात हुशार बुद्धिमत्ता असणाऱ्या आपल्या कन्येला उत्कृष्ट शिक्षण मिळावे अशी व्यवस्था पंडितजींनी केली. त्यामुळेच तर देशाचे नेतृत्व करताना किंवा कोणालाही मार्गदर्शन करताना त्या मोठेपणी कुठे कमी पडल्या नाहीत. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' असे म्हणतात ते इंदिराजींच्या बाबतीत अगदी खरे आहे. कारण लहानपणीच त्यांनी चरखा संघ स्थापन केला. लहान मुलामुलींची वानरसेना स्थापन केली, तेव्हा त्यांचे वय होते अवघे बारा वर्षांचे. आणि त्यांच्या वानरसेनेची सभासदसंख्या होती केवळ साठ हजार.

लहानपणीच त्यांनी गांधीजींच्या सविनय चळवळीत भाग घेतला. 'चले जाव' च्या लढ्यात भाग घेतल्याबद्दल तर त्यांना तुरुंगवासही सहन करावा लागला. पण या साऱ्या मेहनतीचे फळ त्यांना भारत स्वतंत्र झाल्यावर मिळाले. प्रथम १९५९ मध्ये त्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. त्यानंतर त्यानी नभोवाणी मंत्री म्हणून काम केले. १९६६ पासून तर तीन वेळा त्यांना भारताच्या पंतप्रधान म्हणून काम करावे लागले. पण एवढ्या मोठ्या देशाचे नेतृत्व त्यांनी समर्थपणे केले. या काळात त्यांनी 'वीस कलमी' कार्यक्रम आयोजित केला. दारिद्र्याचा प्रश्न लक्षात घेऊन 'गरीबी हटाओ'ची योजना राबवली. शिवाय पाकिस्तानसारख्या राष्ट्रांनी आपल्यावर हल्ले केले, तेव्हाही त्या समर्थपणे आपल्या पाठीशी उभ्या राहिल्या.

एक बुद्धिमान व्यक्ती, एक उत्कृष्ट व्यक्ती, एक थोर व्यक्ती - सर्वच नात्यांनी त्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. पण अशा या थोर स्त्रीची १९८४ रोजी हत्या करण्यात आली आणि काळाने त्यांना आपल्यापासून दूर नेले.

●●●

# थोर शास्त्रज्ञ. डॉ. होमी भाभा.

भारताची शान मोठी करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे, अशा थोर व्यक्तींपैकी एक व्यक्ती म्हणजे डॉ. होमी भाभा. अणुउर्जेचा उपयोग शांततामय कारणांसाठी कसा करता येतो हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. तसेच या विषयावर महत्त्वाचे संशोधनही केले. म्हणून तर जागतिक कीर्तीच्या शास्त्रज्ञांमध्ये त्यांचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.

त्यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ मध्ये, एका पारशी कुटुंबात, मुंबई येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव होमी जहांगीर भाभा असे होते. लहानपणापासून ते अतिशय बुद्धिमान होते. विशेषत: त्यांना गणिताची खूपच आवड होती. त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथे झाले. त्यानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची पीएच.डी. संपादन केली आणि ते भारतात परतले.

भारतात परतल्यानंतर त्यांनी आपल्या संशोधन कार्यास प्रारंभ केला. त्याच दृष्टीने प्रथम त्यांनी मुंबई येथे 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चची' स्थापना केली. त्याच दरम्यान अण्वस्त्रांचा संहारासाठी उपयोग केला गेला होता. हिरोशिमा आणि नागासकी बेचिराख करणाऱ्या अणूशक्तीत केवळ संहार करण्याची क्षमता आहे असं नाही. या प्रचंड शक्तीचा विधायक कार्यांसाठी वापर करता येतो यावर त्यांचा अढळ विश्वास होता. आणि म्हणूनच त्यांनी तुर्भे येथे अणू संशोधन केंद्र उभे केले. अणूऊर्जेचा उपयोग वीजनिर्मितीकरिता, शांततामय कारणांकरिता करता येतो हे सिद्ध केले. जगाला हाच संदेश दिला. हेच लोकांना नेमक्या शब्दांत पटवून देण्यासाठी अनेक वैज्ञानिक निबंध लिहिले.

अर्थात विज्ञानांतील तत्त्वांवर इतकी दृढ श्रद्धा असणाऱ्या होमी भाभांना संगीत, वास्तु - शिल्पकला यांचीही विशेष जाण होती. ते अतिशय सुंदर चित्रेही काढत. म्हणजे एक बुद्धिमान, रसिक अशा कलाकाराचे व्यक्तिमत्त्व म्हणजे होमी भाभा होय. त्यांनी आपल्या अणूविषयक संशोधनाने सर्व जगाला विनाशापासून वाचविण्याचा निश्चितच प्रयत्न केला आहे. पण दुर्दैवाने अशा या थोर संशोधकाचे निधन एका विमान अपघातात झाले.

●●●

**"तुजसाठी मरण ते जनन**
**तुजवीण जनन ते मरण"**

मातृभूमीबद्दलचे प्रेम आणि अभिमान शब्दांशब्दांतून व्यक्त करणाऱ्या या ओळी आहेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या. महाराष्ट्रातील ज्या थोर पुढाऱ्यांनी भारतीय स्वातंत्र्य यज्ञात उडी घेतली, त्यांत सावरकरांचे नाव मोठ्या आदराने घ्यावे लागेल. एक चरित्रसंपन्न, नि:स्वार्थी आणि देशभक्त नेता ही त्यांची सर्वांच्या मनावर कोरली गेलेली प्रतिमा, खरोखरच देवपूजा करण्याइतकी पूज्य आहे, थोर आहे.

त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर नावाच्या गावी झाला. मुळात सावरकर घराणेच देशसेवेला वाहिलेले. त्यामुळे अगदी लहानपणापासून त्यांच्यावर देशसेवेचे, देशभक्तीचे संस्कार झालेले होतेच. पुढे मोठेपणी विलायतेला बॅरिस्टर होण्यासाठी गेल्यानंतरही त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या हालचालींची ही बातमी कळताच त्यांना लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर अटक करण्यात आली. तिथे भरलेल्या खटल्यात त्यांना भारतात परत पाठवण्याचा निर्णय घेतला गेला. सशस्त्र पोलिसांच्या पहाऱ्यात त्यांना भारताकडे पाठविण्यात आले. तेव्हा फ्रान्सचा किनारा दिसताच त्यांनी 'पोर्टहोलमधून' मोठ्या धाडसाने समुद्रात उडी घेतली. पण त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला. कारण इंग्रजांनी आपल्याजवळील बळाचा पुरेपूर वापर करून त्यांना लगेचच पकडले.

अर्थात या साहसी उडीचा परिणाम म्हणून पुन्हा त्यांच्यावर खटला भरला गेला. इंग्रज अधिकाऱ्याच्या हत्येची शिक्षा म्हणून त्यांना आजन्म कारावासाची सजा दिली गेली. त्यांना अंदमानला पाठवले गेले. तिथे तर त्यांचा अतोनात छळ झाला. पण ते आपल्या ध्येयापासून जराही विचलित झाले नाहीत. पुढे १९३७ मध्ये त्यांची सुटका केली गेली. पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांनी समाजसेवाच केली. त्यांनी कोणत्याही प्रकारची लालसा बाळगली नाही. कारण खऱ्या अर्थाने ते नि:स्वार्थी देशसेवक होते. त्यांची देशसेवेची ही कळकळ त्यांनीच आपल्या एक कवितेत व्यक्त केली आहे, ते म्हणतात.

"ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला!!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आपल्या भारत देशात एकापेक्षा एक श्रेष्ठ असे अनेक थोर समाजसुधारक होऊन गेले. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वांत श्रेष्ठ असे भारतीय पुढारी आहेत असे मला वाटते. कारण मानवतेला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यांसाठी त्यांनी स्पृश्यांविरुद्ध सतत लढा दिला. वर्षानुवर्षे गुलामगिरीचे जीवन जगण्याची ज्यांच्यावर वेळ आली, अशा अस्पृश्यांना 'माणूस' म्हणून जगण्याचे सगळे हक्क त्यांनी मिळवून दिले. हे समाजसुधारणेचे कार्य करताना त्यांना स्वत:च्याच धर्मवेड्या समाजाबरोबर लढा द्यावा लागला म्हणून त्यांना 'अस्पृश्यांचे नेते' म्हणून ओळखले जाते.

त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे या गावी १४ एप्रिल १८९१ ला झाला. लहानपणापासून अतिशय तल्लख बुद्धी असणाऱ्या बाबासाहेबांना वाचनाचाही अतिशय नाद होता. शिवाय अध्ययनासाठी लागणारी चिकाटीही त्यांच्याजवळ भरपूर होती. याच गुणांमुळे सन १९१३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम.ए.पी.एच.डी. सारख्या उच्च पदव्या मिळविल्या. अतिशय सामान्य कुटुंबात, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले.

पण मायदेशी परतताच बडोदे संस्थानातील नोकरी करताना एक अस्पृश्य म्हणून त्यांना अतिशय वाईट अनुभव आले. शिक्षणाने किंवा कर्तृत्वाने माणूस कितीही मोठा झाला तरी येथील जातिव्यवस्था आपणाला माणूस म्हणून जगू देत नाही. मग अशिक्षित, दरिद्री अस्पृश्यांची तर अवस्था बघायलाच नको. पदोपदी अस्पृश्य म्हणून होणाऱ्या अपमानाने ते संतापून ऊठले आणि अस्पृश्यांमध्ये जागृती करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले.

वर्तमानपत्रातून त्यांनी सातत्याने अस्पृश्यांविरुद्ध होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला, अस्पृश्य बांधवांना संघटित केले, महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांनाही पाणी भरता यावे म्हणून सत्याग्रह केला. इतकेच नव्हे तर नाशिक येथील काळ्या रामाच्या मंदिरात सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करताना त्यांना लाठीमारही सहन करावा लागला. पण ते डगमगले नाहीत. त्यांच्या या प्रयत्नाने हळूहळू अस्पृश्य लोकांमध्ये जागृती निर्माण झाली. पण तरीही जाती व्यवस्थेने पोखरलेल्या या समाजात आपल्यावर अन्याय होतच राहणार हे ओळखून

त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माच्या प्रसाराचे कार्य करीत असतानाच त्यांनी स्वतंत्र मजुरपक्षाचीही स्थापना केली.

सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे स्वतंत्र भारताची घटना त्यांनीच लिहिली, म्हणून तर त्यांना घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. स्वतंत्र भारताचे ते पहिले कायदा मंत्री होय. अस्पृश्यांची शैक्षणिक व आर्थिक प्रगती घडून यावी म्हणून झटणाऱ्या या महान नेत्याने प्रचंड ग्रंथरूप लेखनही केले आहे. अशा या श्रेष्ठ कायदे पंडिताचे ६ डिसेंबर १९५६ रोजी आकस्मिक निधन झाले. पण अस्पृश्यता निर्मूलनाचे त्यांचे कार्यच इतके थोर आहे कि त्यांना प्रणाम करताना म्हणावेसे वाटते.

दिव्यत्वाची जेथं प्रचीती<br>
तेथे कर माझे जुळती

●●●

आत्मवृत्त

# शाळेची घंटा

टण् टण् टण्. शाळेची घंटा झाली, आम्ही सारे प्रार्थनेसाठी जमलो. एका सुरात सर्वांनी मोठ्या आवाजात प्रार्थना म्हणायला सुरुवात केली. माझे ओठ नुसतेच हलत होते. पण खरंच मी प्रार्थना म्हणत नव्हते. कारण माझे सारे लक्ष शाळेच्या घंटेकडे होते. ती आज चक्क मला खुणावून बोलवत होती. गोड आवाजात काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती. म्हणून मी हळूच कान देऊन ऐकू लागले. तशी ती म्हणाली. अगं, आज किनई मला खूप खूप आनंद झालाय. तुमची दिवाळीची सुट्टी संपून आजपासून तुमची शाळा सुरू होतेय ना म्हणून आनंद वाटतोय मला. तुम्हाला सुट्टी लागली की मी अगदी एकटी पडते. निरुपयोगी होऊन जाते. पण आज तुम्ही सगळे आलात ना. आता पुन्हा मला तुमच्या शाळेची सेवा करायला मिळेल. तुमच्या गप्पागोष्टी, गाणी ऐकता ऐकता माझा वेळ मजेत जाईल.

मला आठवतं. बरोबर दहा वर्षांपूर्वी तुमच्या गुरुजींनी मला इथे आणलं. तेव्हापासून मी तुम्हा मुलांमध्ये वावरते आहे. खरे तर सर्वप्रथम मी एका खाणीतून धातूरूपात या जगात आले. मग तळपत्या आगीतून अनेक प्रक्रिया करून मला एका साच्यात ठेवले गेले बरं का आणि ज्या वेळी मी त्या साच्यातून बाहेर पडले तेव्हा हा छान आकार मला मिळाला, मग मला, माझ्याबरोबरच्या इतर घंटांनाही वेगवेगळ्या दुकानांमध्ये पाठविले गेले. आमच्यापैकी काही जणी देवळात गेल्या, काहींना अग्निशामक दलाकडे पाठविले गेले. मला न्यायला तुमचे गुरुजी आले. तेव्हा तर लहान मुलांमध्ये आपण जायचं या कल्पनेने मला खूप आनंद वाटला.

तेव्हापासून आजपर्यंत मी सेवेचे व्रत घेतल्याप्रमाणे तास सुरू झाल्याची, संपल्याची सूचना देते. तुम्हाला कंटाळा आलेला बघितला की मधली सुट्टी झाल्याचे जाहीर करते. संध्याकाळचे साडेपाच वाजले कि तुम्हांला घरी जायचा इशारा करते. तुमच्या छातीत ज्या वेळी धडधडत असतं ना त्याच वेळी परीक्षा सुरू झाल्याचा टोला मीच देते. पण तुम्हांला परीक्षा संपताच सुट्टी झाल्याची गोड बातमी मीच तुम्हांला ऐकवते. त्यामुळेच तुम्हांला कधी कधी मी खूप आवडते. तर कधी माझा रागही येतो. हे मला कळतं गं, पण तुम्हांला जसं तुमच्या गुरुजींचे ऐकावे लागते, तसेच मलाही. आणि शेवट अभ्यास, परीक्षा हे सारे तुमच्या हिताचेच नाही का ? ते बघ, तुझे गुरुजी वर्गाकडे चालले सुद्धा. चल पळ बघू वर्गाकडे असे म्हणून ती बोलायची थांबली. तिचे गोड मनोगत ऐकून मीही वर्गाकडे पळाले.

●●●

# मोडक्या बॅटचे आत्मवृत्त

सकाळपासून आईचे एकही काम न ऐकता मी खेळत राहिलो, म्हणून आईला खूप राग आला होता. रागारागाने ती मला अडगळीच्या खोलीत बसवून गेली होती. त्या कोंदट, अंधाऱ्या खोलीत बसून मी हुंदके देत होतो. एवढ्यात आवाज आला, 'एक दिवस आईने तुला इथे बसविले तर तुला इतके वाईट वाटते. मग मी तर इथे केव्हापासून धूळ खात पडलेय.'

'अगं, पण तू आहेस तरी कोण ? कोण बोलतंय माझ्याशी ? मला तर इथे कोणीच दिसत नाही.'

'अरे राजा, हे बघ इकडे, या आरामखुर्चीच्या खाली तुझ्या आईने मला टाकले आहे. मी आहे एक मोडकी बॅट. माझा दांडाच तुटल्याने तुम्ही मुलांनी मला खेळायला घ्यायचे बंद केले. मग मोडकी बॅट बाहेरच्या खोलीत कशाला म्हणून तुझ्या आईने मला इथे आणून टाकले. तेव्हापासून या अडगळीच्या खोलीत मी धूळ खात पडले आहे. कधी स्वच्छ हवा नाही की पुरेसा प्रकाशही नाही.

पूर्वी तुझा, तुझ्या मित्रांचा, प्रेमळ हात माझ्या अंगावरून फिरायचा. त्यामुळे चेंडू मैदानाच्या दुसऱ्या टोकापर्यंत पळवून लावताना मलाही खूप आनंद वाटायचा. तुला तर माझ्याशिवाय करमतच नसे. म्हणूनच तुझ्या गादीजवळच्या कोपऱ्यात तू मला जागा दिली होतीस. तुझे माझ्यावर खूप खूप प्रेम होते. म्हणूनच या घरात आपण नवे आलो आहोत असे मला कधीच वाटले नाही.

खरं तर, माझा जन्म लाकडाची खेळणी तयार करणाऱ्या एका कारखान्यात झाला. त्यावेळी तर मी खूप छान दिसत होते. मग तुमच्या गावातल्या खेळणी विकणाऱ्या दुकानदाराने आम्हांला दुकानात आणून ठेवले. आपला जन्म लहान मुलांची करमणूक करण्यासाठी आहे हे तर आम्हांला लहानपणापासून शिकवले गेले होते. त्यामुळे आपणाला कोणता बालदोस्त नेणार ? असा विचार मी रोज करीत असे.

एके दिवशी तुझ्या वाढदिवसाची भेट म्हणून तुझ्या बाबांनी मला या घरी आणले. तेव्हापासून गेली दोन वर्षे मी सतत तुझ्याबरोबर असे. तुझा संघ जिंकला की मला खूप आनंद होत असे. तुम्ही हरलात की मला वाईट वाटत असे. मी अगदी तुमच्याशी एकरूप होऊन गेले होते. पण एके दिवशी माझा दांडा तुटला आणि मग मला तुम्ही इथं आणून टाकलं आहे. पण म्हणून मी रडत नाही बसत. जमेल तितका तुला आनंद दिला. तुमच्याबरोबर खेळले. त्या दिवसांच्या आठवणी आता माझ्यासोबत असतात. छान आहे की नाही माझी कहाणी ?

●●●

# मी आहे रेडिओ

नमस्ते बालमित्रांनो! आजच्या गंमतजंमत कार्यक्रमात आपण ऐकलीत 'पावसाची गाणी'. पण आता मात्र मी तुम्हाला सांगणार आहे माझी स्वत:ची कहाणी. तसे रोज सकाळी उठल्यापासून भावगीते, भक्तिगीते, बातम्या असे खूप कार्यक्रम मी ऐकवत असतो. पण माझ्या स्वत:विषयी तुम्हांला काही सांगायला मला कधी वेळच मिळत नाही. पण आता तुम्हांला सुट्टी लागलीय हे बघितलं. मग ठरवलं, आज आपण मुलांना आपलीच कहाणी सांगायची.

माझा खरा जन्म झाला तो मार्कोनी नावाच्या शास्त्रज्ञाच्या शोधामुळे. त्याने माझा शोध लावल्यानंतर सर्वच देशांमध्ये मी बघता बघता लोकप्रिय झालो. घरबसल्या गप्पागोष्टी ऐकवणारा दोस्त म्हणून खूप खूप लोकांनी माझी खरेदी केली.

माझा जन्म मुंबई येथील एका मोठ्या कारखान्यात झाला. आज तुम्हाला हे जे छान रूप दिसतंय ना, ते धारण करण्यासाठी मला खूपच यातना सहन कराव्या लागल्या. 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडालाही देवपण येत नाही' हे मलाही ऐकून माहीत होते. म्हणून मी कारखान्यातही हसतमुखाने साऱ्या प्रक्रियांना सामोरा गेलो. ज्या कंपनीने आम्हांला तयार केले, त्याच कंपनीचे रेडिओ म्हणून आम्ही बाजारात आलो.

माझ्या कारखान्यात माझ्यासारखेच इतरही अनेक लहान - मोठे रेडिओ तयार केले जातात. कुणी आकाराने मोठा, दिवाणखान्याला शोभा देईल असा. तर कुणी सहज प्रवासात नेता येण्यासारखा. आमच्यापैकी काहीजण तर आकाराने इतके लहान आहेत कि त्यांना शर्टच्या खिशातूनही सहज बरोबर नेता येईल.

आम्ही सारेजण बॅटरीवर तसेच वीजेवरही चालतो. त्यामुळे तुमची सेवा करण्याआधी तुम्हांला आमच्या पोटाची मात्र व्यवस्था करावी लागते. पण एकदा का ती व्यवस्था केलीत की मग मात्र आम्ही न थकता, न थांबता, न रागावता बोलायला तयार. आहे की नाही आमची गंमतशीर कहाणी. बरंय तर बालमित्रांनो. आजचा आमचा कार्यक्रम संपला. नमस्ते.

●●●

# कल्पवृक्षाची कहाणी

आज आजीची अंगारकी चतुर्थी, म्हणून तर आजीने छान छान मोदक केले होते. त्या मोदकांवर मस्त ताव मारून मी आजोबांच्या बरोबर वाडीत फेरफटका मारायला निघालो होतो. कोकणातलं हे एक छोटंस गाव. शिवाय प्रत्येकाच्या घराच्या अवतीभोवती खूप झाडी, त्यामुळे सारं कसं शांत शांत होतं.

'काय, आवडले ना मोदक ?' शांत वातावरणात अचानक कुणीतरी हा प्रश्न विचारल्याने दचकलोच. घाबरून मी आजोबांचे बोट पकडणार, एवढ्यात पुन्हा आवाज आला, अरे बाळ, मी कल्पवृक्ष बोलतोय. तुम्हीच तर नाही का हे सुंदर नाव मला दिलंत. पण हे सुंदर नाव तुम्ही मला देण्याआधी मला तुमची मनापासून सेवा करावी लागली. माझा प्रत्येक अवयव तुम्हाला उपयोगी पडतोय. हे कळल्यावर मात्र तुम्ही मला कल्पवृक्ष म्हणून ओळखू लागलात.

खरं तर माझं नाव आहे नारळाचे झाड. समुद्राकाठची खारी दमट हवा आम्हाला मानवते. म्हणून तर तुझ्या आजोबांनी या घराभोवतीची जागा स्वच्छ करून घेतली. छान खड्डे खणून नारळांची जी झाडे लावली ना, त्यांच्यापैकीच मी एक. आम्ही सारे लहान होतो ना तेव्हा ते आमची खूप काळजी घेत. आता त्यांचे हात -पाय थकले तरी ते आम्हाला पाणी द्यायला कधीही विसरत नाहीत. हे त्यांचे उपकार मी कसे विसरणार ?

म्हणून तर आम्ही भावंडे तुम्हाला भरपूर नारळ देतो. या नारळाचे गोड पाणी पोषक तर आहेच. शिवाय आतले खोबरे तर अनेक कारणांसाठी उपयोगी पडते. मोदक, करंज्या असे तुझी आजी जे छान छान पदार्थ बनवते ना ते खोबऱ्यापासूनच आणि बरं का, हे खोबरे सुकवून त्याचे तेलही बनविता येते. हे तेल तर खूपच शुद्ध, उष्णता कमी करणारे आहे. शिवाय खोबरे काढून घेतल्यावर जी करवंटी उरते ना तिचाही उपयोग कलाकुसरीची शोभेची भांडी बनवायला होतो. आमच्या झावळ्यापासून कुणी घराचे छप्पर बनविते. काही काही जण तर त्यापासून काथ्या, दोरखंड बनवतात. तुम्ही जो सफाईसाठी झाडू वापरता ना, तो तयार करण्यासाठीही माझ्या पानांचाच उपयोग केला जातो. शिवाय खोडाचा उपयोग लाकूड म्हणून केला जातो. असे वेगवेगळ्या कारणांनी आमचे सगळे अवयव तुम्हाला उपयोगी पडतात. म्हणनूच असेल कदाचित, तुमच्या पूजेत तुम्ही आम्हांला मानाचे स्थान दिले आहे. श्रीफळ म्हणून सर्व मंगलप्रसंगी तुम्ही नारळ वापरता, तेव्हा तर आपला जन्म कृतार्थ झाला असे आम्हांला वाटते. आहे की नाही माझी कहाणी छान ? असं म्हणून पानांची सळसळ करणारा तो उंच कल्पवृक्ष समाधानाने हसू लागला.

●●●

# पिंजऱ्यातील पोपट

ताईचे लग्न म्हणून घराला नवा रंग दिला होता. घरी गोडाधोडाची छान तयारी चालू होती. पाहुणे तर इतके आले होते की, घरात आम्हांला खेळायला कुठे जागाच नव्हती. शिवाय बाहेर कडक ऊन. अगदी कुणीतरी पिंजऱ्यात कोंडल्यासारखे वाटत होते. म्हणून मी कसे बाहेर सटकावे याचा विचार करत व्हरांड्यात बसलो होतो. 'वा ! आता कळलं ना कोंडून ठेवलं की कसं कंटाळवाणं वाटतं ते?' हा आवाज कोणाचा म्हणून मी निरखून बघू लागलो, तर रोज 'या बसा, नमस्ते' एवढंच बोलणारा पोपटच चक्क बोलत होता.

– बरं का मित्रा, तुला कसं मित्रांसमवेत मोकळ्या हवेत खेळायला खूप खूप आवडतं ना, तसं मलाही लहानपणापासून मोकळ्या हवेत खेळायला, आनंदाने शीळ घालायला खूप आवडत होतं. त्याच वेडात मी, माझे सवंगडी आमच्या घरकुलापासून थोडे दूर दंगामस्ती करायला म्हणून आलो होतो. तर एका माणसाने चांगली हाताची घट्ट पकड करून मला, माझ्या दोस्तांना पकडले. आपली सुटका व्हावी म्हणून मी सुद्धा पंखांची खूप फडफड केली. पण आमचे काही चालू शकले नाही. मग त्याने आमची विक्री करण्याच्या हेतूने आम्हांला खूप फिरवले.

पण त्या दिवशी अचानक बाबांच्याजवळ तू मलाही 'पोपट' हवाच म्हणून हट्ट धरलास. म्हणून तर तुझ्या बाबांनी मला इथे आणलं. तुझ्या घरात आलो तेव्हा आपण त्या क्रूर माणसाच्या हातून सुटल्याचा आनंद वाटला रे. पण तुम्ही लोकांनी मी उडून जाऊ नये म्हणून पिंजरा आणलात, तेव्हा मात्र खूप वाईट वाटलं. उंच निळं आभाळ, हिरवीगार झाडे, झुळझुळ वाहणारा वारा, शीळ घालून दंगामस्ती करणारे माझी सवंगडी - इतकं आनंदी जीवन होतं माझं आधी. पण तुम्ही लोकांनी मला कैदी बनवून टाकलंत असंच वाटायचं मला.

पण नंतर नंतर कळलं की मला आठवणीने दाणापाणी देणारे तुम्ही सगळे माझ्यावर खूपखूप मायाही करताय. एखाद्या दिवशी मी 'नमस्ते' म्हणालो नाही किंवा बोललो नाही, तर आपलं मूल रुसल्यासारखी तुझी आई माझ्या जवळ येते. काही न बोलता प्रेमळपणे माझ्या पाठीवरून हात फिरवते. त्यामुळेच तर मला आता तुमचा खूप लळा लागला आहे.

मला रोज मोकळ्या हवेत फिरायला मिळावं म्हणून तुझे आजोबा मला पिंजऱ्यातून बाहेर सोडून देतात. पण आता तुमची इतकी सवय झालीय की तुम्हांला सोडून कुठे जावं असं कधी आता मनातही येत नाही. म्हणून तर मी आठवणीने अर्ध्या तासात परततो, कळलं?. तेव्हा ऊन उतरेपर्यंत थोडासा तुरुंगवास सहन करा, ऊन संपलं की खेळायला पळा.'

● ● ●

# *मी जंगलचा राजा*

सर्कस सुरू व्हायला चक्क वीस मिनिटे होती, म्हणून मामाचा हात धरून मी आणि राजू सगळे प्राणी न्याहाळीत होतो. सर्वांत जास्त गर्दी हत्तीसमोरच होती. पण मला मात्र वनराज सिंहाचे आकर्षण वाटत होते. तशी थोडीशी भीती पण वाटत होती. तरीही मी तिथे जी थोडीशी माणसे होती, त्यांच्यामध्ये जाऊन उभा राहिलो. आणि काय आश्चर्य, एवढा डौलदार जंगलचा राजा, ज्याला बघितल्याबरोबर सर्वांची भीतीने गाळण उडते तो चक्क शांतपणे पिंजऱ्यात विश्रांती घेत होता. पण तो आनंदी नसावाच, कारण त्याच्या डोळ्यात खूप खूप पाणी आलं होतं. मी त्याच्याकडे पुन्हा पुन्हा बघतोय हे लक्षात येताच तो म्हणाला, माझ्या डोळ्यात पाणी बघून तुला आश्चर्य वाटतंय ना ? पण हे अश्रू का आले माहीत आहे, थोड्या वेळापूर्वी जो खेळ झाला त्यात रिंगमास्टरच्या मनाप्रमाणे मी वागलो नाही. म्हणून त्याने उभे आडवे चाबकाचे फटके मारलेत माझ्या पाठीवर.

अरे, मी मुळात एका घनदाट जंगलात जन्माला आलो. आपलं अन्न आपणच शिकार करून स्वत: मिळवायचं आणि खायचं हा धडा मला माझ्या आई -वडिलांनी दिला. त्यातून मी मूळचा स्वाभिमानी. आपण जंगलच्या राजाचे वारसदार आहोत. आज ना उद्या आपणालाही इथे राज्य करायचे आहे. स्वतंत्र जीवन जगायचे आहे, म्हणून मी रोज नव्या वाटा शोधत असे. 'जंगलतोड करणाऱ्यांनी आपणाला धोक्यात आणलंय राजा, खूप दूर एकटा जाऊ नको.' असं माझी आई मला पुन्हा पुन्हा सांगत असे. तेव्हा तिचं न ऐकता मी एकटाच खूप दूरवर गेलो आणि काही लोकांनी छान सापळा रचून मला पकडलं.

पैसे मिळावेत म्हणून प्रथम त्या लोकांनी मला या सर्कसवाल्यांना विकले आणि आता तुमच्याकडून पैसे मिळावेत, म्हणून ते मला नाचवतात. त्यांच्या एकेका फटक्यासरशी निमूटपणे थाळीतले अन्न मी खातो तेव्हा तुम्ही लोक आनंदाने टाळ्या वाजवता. तेव्हा तुमचा खेळ होतो, पण आमचा मात्र निष्कारण जीव जातो. तुम्ही माणसे कंटाळा आला की, आपल्या मनासारखे वागायला मिळावे म्हणून एखाद्या सहलीला जाता. आनंदाने गाणी गाता. नाचता, खेळता, असे आनंदाचे क्षण आता माझ्या वाट्याला फारसे येत नाहीत. पण तरीही तुम्हा मुलांची घटकाभर करमणूक केल्याचा आनंद मात्र मला नक्कीच मिळतो. तुमच्या चेहेऱ्यावरचा हा आनंद पाहायला मिळावा म्हणून मी जन्माने जंगलचा राजा असलो, तरी आता पिंजऱ्यात राहून चाबकाचे फटकेही सहन करतो, बराय् दोस्ता, तो बघ सर्कस सुरू झाल्याचा बँड वाजू लागलाय, चल लवकर, असं म्हणून तो बोलायचा थांबला.

●●●

# बाहुलीचे मनोगत

वाढदिवसाची सगळी खरेदी झाली होती. मनासारख्या सगळ्याच वस्तू आईबाबांनी घेतल्यामुळे माझाही आनंद गगनात मावत नव्हता. कधी एकदा घरी जातो आणि सगळ्या वस्तू ताब्यात घेतो असे मला झाले होते. पण काही केल्या घराकडे जाणारी बस लवकर येत नव्हती. त्यामुळे खरंच अगदी कंटाळा आला होता. 'ए वेडाबाई, अशी रागावतेस काय ?' आता मी आलेय ना तुझ्याबरोबर खेळायला.' संध्याकाळची वेळ, स्टॉपवर केवढी गर्दी, मग एवढ्या गर्दीत माझ्याशी इतकं प्रेमळपणे कोण बोलतंय बरं ? मी कितीतरी वेळ इकडे तिकडे पाहात विचार करीत होते.

'म्हटलं बाईसाहेब, मी तुझ्या हातातल्याच एका खोक्यात आहे. होय, मी चक्क बाहुली बोलतेय. आज तुला जेवढा आनंद झालाय ना, तेवढाच आनंद मलाही झालाय, कारण गेल्या काही दिवसांपासून दुकानात खूप खूप माणसे येऊन गेली. त्यांच्याबरोबर येणाऱ्या छोट्या मुली मला घरी न्यायचा हट्ट करीत. पण माझी किंमत ऐकताच, त्यांचे आई - वडील त्यांची कशीबशी समजूत घालत, तर कधी त्यांना रागवत घरी घेऊन जात. आता तुम्हा लहान मुलांना आनंद देणं जरी माझ्या हातात असलं, तरीही माझी विक्री कोणत्या किंमतीला करायची हे माझा दुकानदारच ठरवतो. त्यामुळे मला काहीच करता येत नव्हतं.

आणि तुला एक सांगू, मला ज्या कारखान्यात तयार केलं गेलं ना, तेथील कामगारांनी खूप कष्ट करून मला सुंदर बनवलं आहे. खूप छान कपडे, मऊमऊ केस यांमुळे त्यांनी माझं रूप देखणं करून टाकलंय. शिवाय खेळता खेळता तुम्ही माझे हातपाय मोडलेत ना, तरी ते पुन्हा जोडता येतील अशी सोयही आहे. त्यामुळेही माझी किंमत थोडीशी जास्त आहे. पण तुझ्या बाबांनी तुझा हट्ट पुरवायचा ठरवला ना, आता मला खूप खूप आनंद वाटतो.

तुझ्या भातुकलीच्या खेळात आता मी रोज खेळायला येईन. तुझ्या मैत्रिणींशीही खूपखूप खेळेन. पण हो, तुम्ही आमचं लग्न लावाल ना, तेव्हा मात्र एक अट आहे बरं का ! तुम्ही नटवून थटवून आमचं लग्न लावून द्या, पण म्हणून मी काही कुणाच्या घरी सासरी म्हणून नाही जायची. मला आपलं तुझ्याचबरोबर राहायला आवडेल. तुला सोडून मी कुणाकडे जायची नाही. चालेल ?'

'हो, हो, कुण्णाकडे पाठवणार नाही मी तुला.' असं म्हणून ती नवीकोरी बाहुली आणखी जवळ घेतली आणि तिच्या कानात हळूच पुटपुटले,
लाडकी बाहुली आहे माझी एक मिळणार अशी ना शोधुनि दुसऱ्या लाख !

●●●

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २१०७ दिनांक ३१/३/१०
विषय बा.वा. क्र. ........

# वसंत ऋतू

• वसंत ऋतू हा तर सर्व ऋतूंचा राजा. सृष्टीला सूर्यदेवाने तळपत्या उन्हांचे चटके दिल्यानंतर, माणसाचीच काय पण साऱ्या सृष्टीची तगमग होते. पण नेमक्या याच काळात आंब्याला मोहोर येतो. झाडांना नवी पालवी फुटते. गोड आवाजात कोकिळ पक्षी गाऊ लागतात. मोगरा, जाई - जुई, मदनबाण यासारख्या सुगंधी फुलांनी झाडे - वेली बहरून जातात. जणूकाही तप्त उन्हाळ्याचा त्रास सहन केल्याबद्दल धरणी मातेला निसर्गाने नवे देखणे रूप बक्षीस दिले असावे असेच या काळात वाटते.

खरंतर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर हे सहा ऋतू आपापल्या परीने सृष्टीला नवे रूप देणारे आहेत. पण ऋतूंच्या या चक्रातला, वसंत ऋतू मात्र सर्वांचाच आवडता ऋतू आहे. कारण या काळात केवळ धरणीमाताच फुलाफळांनी बहरते, असं नव्हे. तर कवी -लेखक यांच्याही प्रतिभेला नवा बहर येतो तो याच काळात. घराघरांतील लहान -मोठी माणसे प्रवासाचे बेत आखतात तेही याच काळात.

आमच्याकडे तर अजूनही या काळात संध्याकाळ झाली की ढग दाटून येतात. जोराचा वारा सुटतो. कधी गारांचा तर कधी टपोऱ्या थेंबाचा पाऊस पडतो. आणि मुळात वसंत ऋतूने गंधमय केलेल्या वातावरणात ओल्या मातीचाही वास मिसळतो. तेव्हा तर खूपच छान वाटते. कारण नुकतीच पालवी फुटलेली झाडे स्नान करून पुन्हा नव्याने बहरत आहेत असेच आपणाला वाटते.

तर असा हा ऋतू - फुले - फळे भरपूर फुलवणारा, धरणीमातेला नवे चैतन्य मिळवून देणारा, त्याला आपण ऋतूंचा राजा म्हणतो ते योग्यच नाही काय ?

●●●

## ‘नको हा पावसाळा’

“येरे, येरे पावसा
तुला देतो पैसा”

म्हणता म्हणता एकदा जो पाऊस आला तो नुसता कोसळत होता. दोन दिवस झाले तरी सतत पडणारा पाऊस काही थांबायचं लक्षण नव्हतं. पहिल्यांदा जेव्हा रस्त्यावर खूप पाणी साचले, आणि सगळा रस्ता पाण्याखाली गेला, तेव्हा शाळेला सुट्टी मिळणार म्हणून खूप आनंद वाटला. पण एका क्षणाचीही विश्रांती न घेता कालपासून सतत पाऊस पडतोय, त्यामुळे आता मात्र खरंच ‘नको हा पावसाळा’ म्हणायची वेळ आलीय.

हा पाऊस सुरवातीला जोरजोरात पडायला लागला तेव्हा आम्हा लहान मुलांप्रमाणेच मोठ्या माणसांनाही आनंद वाटला होता. पण न थांबता तो पडत राहिला आणि रस्त्यारस्त्यातून पाणीच पाणी झाले. शाळा, कचेऱ्या, बाजार सारे काही बंद पडले. बघता बघता गोरगरिबांच्या झोपड्यांतून पाणी शिरले. त्यांचं होतं नव्हतं ते सारं वाहून गेलं. अन्नपाण्याविना ते कसेबसे आपला जीव वाचवून झाडांवर, देवळांत जिथे जागा मिळेल तिथे राहाताहेत हे कुणी ना कुणी येऊन सांगत होते.

आमच्या घरातही हळूहळू पाणी येऊ लागलं, तसं आई - बाबांनी आम्हाला माडीवरच्या खोलीत बसायला सांगितलं. ती खोली मुळात अंधाराची, त्यात अती पाऊस पडल्याने वीजही गेली होती. बाहेर कुठे खेळायला जाता येत नव्हते की घरात बसून काही करता येत नव्हते. वर्तमानपत्रे, दूध, भाजी कोणतीही गोष्ट कालपासून मिळू शकली नव्हती. अक्षरशः उपाशीपोटी, कुणीतरी तुरुंगात कैदी म्हणून ठेवल्यासारखेच वाटत होते. त्यातच भर घातली होती ती घराजवळच चिखलात ओरडणाऱ्या बेडकांनी. त्यांच्याच पाठोपाठ आलेल्या डासांनी तर असा जीव हैराण केला होता की बोलायची सोय नाही. आणि म्हणूनच प्रत्येक जण म्हणत होता, ‘नको हा पावसाळा’.

●●●

# उन्हाळ्यातील एक दिवस

खरंतर, दरवर्षी आमच्याकडे इतका कडक उन्हाळा कधीच नसतो. पण आज सकाळी उठल्यापासूनच उकाडा जास्त जाणवत होता. घामाच्या नुसत्या धारा लागल्या होत्या. जसजसा सूर्य डोक्यावर येत होता, तसतसा उष्मा अधिक वाढत होता. घर, अंगण, भिंती सारं काही तापलं होतं. कुठेही वाऱ्याचा मागमूस नव्हता. झाडाचं एक पानसुद्धा हलत नव्हतं की एखादं पाखरूसुद्धा कुठे भिरभिरताना दिसत नव्हतं.

मला तर असं वाटत होतं की कुठेतरी छानपैकी पाण्यात जाऊन डुंबत राहावं, म्हणूनच मी चार मित्रांना घेऊन ओढ्याकडे निघालो. 'भर उन्हाचे जाऊ नका,' म्हणून आई रागावत होती. पण तिचं काहीएक न ऐकता आम्ही भर उन्हाचे ओढ्याकडे पळत सुटलो. उन्हाने पाऊलवाटा तर तापल्या होत्याच. पण उन्हाच्या झळाही इतक्या गरम होत्या की, सगळ्या शरीराची लाहीलाही होत होती. कसेबसे आम्ही ओढ्यापर्यंत पोहोचतो तर काय ? ओढ्यास पाण्याचा एक थेंबही नव्हता. तापलेल्या दगडगोट्यांच्या त्या कोरड्या ओढ्याकडे बघवत नव्हते. धावतपळत आल्याने तहानही खूप लागली होती. आता पाणी नाही तर नाही. निदान एखाद्या झाडाच्या सावलीखालीतरी बसावं, म्हणून इकडे तिकडे पाहिले. तर ओढ्याकाठची सारी झाडे - झाडे कुठली, केवळ कोरड्या शुष्क फांद्या होत्या. त्या वाळलेल्या झाडांकडे बघून बघून अक्षरश: डोळ्यात पाणी आलं. "माणसाची, धरणीमातेची अशी अवस्था करणाऱ्या निसर्गापुढे आपण काहीच करू शकत नाही." हे आजीचं म्हणणं खरं आहे, असं मनाशी म्हणत घरी परतलो.

संपूर्ण दिवसभर घरादाराची अशी भट्टी करणाऱ्या सूर्याचे संध्याकाळी मात्र समाधान झाले असावे. संध्याकाळ होताच मात्र जोराचे वारे सुटले, विजेच्या गडगडाटा बरोबर पाऊसही आला. तापलेल्या जमिनीवर पावसाचे टपोरे थेंब पडले मात्र. सारा आसमंत मातीच्या वासाने गंधित झाला. जणू आनंदाने म्हणू लागला,

पाऊस आला सवंगड्यानो,<br>
जलधारा पडती, रिमझिम जलधारा पडती।

●●●

# माझा आवडता ऋतू

"हासत नाचत दीपावली,
येणार, येणार घरोघरी"

असं म्हणत मुलेबाळे आनंदाने नाचू लागली, घराघराची अंगणे रांगोळ्यांनी सजली. दिव्यादिव्यांची रांग घरादारांवर प्रकाशाची बरसात करू लागली की, ओळखायचं ही चाहूल आहे दिवाळीची, त्याबरोबरच येणाऱ्या हिवाळ्याची, मस्त गुलाबी थंडीची. थंडीबरोबरच वातावरणातला उत्साह वाढवणाऱ्या मस्त आरोग्यदायी हवेची.

तसे पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे निसर्गाचे चक्र खऱ्या अर्थाने आपल्याला उपयुक्त असे आहे. पण आपल्या धरणीमातेला हिरवीगार वस्त्रे नेसवणाऱ्या वर्षाऋतूपेक्षा मला मात्र हिवाळाच जास्त आवडतो.

कारण मुळात हा ऋतू सुरू होतो तो हंगाम असतो सुगीचा. गच्च दाण्यांनी भरलेल्या कणसांची कापणी, मळणी करून शेतकरी त्यांची रास तयार करतात ते याच काळात. ओला हरबरा, वाटाणा, गाजर, ऊस, रसदार फळे ही या काळात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. शिवाय हवा तर थंडगार, प्रत्येकालाच भरपूर खावं -प्यावं असं वाटणारी असते. उत्साहाने काम करावं असं वाटणारी असते. कुठे घामाच्या धारा नाहीत की पावसाळ्यातला चिखल नाही. सारं कसं आल्हादायक असतं.

आता काही काही वेळेला थंडीही खूप पडते पण आमच्या गावात पडणाऱ्या थंडीचा मुळात आम्हाला खूप फायदा होतो. कारण; थंडीचे निमित्त काढून खूप उशिरापर्यंत पांघरुणात पडून राहता येते. छान उबदार रंगीबेरंगी कपडे घालून सहलीला जाता येते. गरमागरम स्निग्ध पदार्थांची तर घरी रेलचेल असते. त्यातच 'तिळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणत संक्रांतही साजरी केली जाते. मग मात्र हळूहळू थंडीचे प्रमाण कमी होत जाते. उन्हाळ्याची चाहूल लागली की पाठोपाठ परीक्षाही येणार म्हणून मला खूप वाईट वाटते. पण तरीही पुढच्या वर्षी आपणाला आवडणारा ऋतू— हिवाळा – पुन्हा येणार आहे असा विचार मनाशी करून आम्ही समजूतदारपणे उन्हाळ्याचे स्वागत करतो.

●●●

**कथनात्मक निबंध**

## माझे पहिले बक्षीस

स्पर्धा म्हटली की कोणीही भाग घेतं, ते आपल्यालाही एखादं बक्षीस मिळावं म्हणून. मलाही पाठांतराच्या, भाषणाच्या तसेच अभिनयाच्या स्पर्धेत भाग घ्यायला खूप आवडतं. या स्पर्धांमधून मी आजपर्यंत अनेक बक्षिसे मिळवली आहेत. पण मला जे पहिलं बक्षीस मिळालं ना, त्याचं महत्त्व मला खूप वाटतं. कारण त्याची कहाणी आहेच मोठी विलक्षण.

त्याचं काय झालं, आंतरशालेय अभिनय स्पर्धा होती ती. ५ वी ते ७ वी वयोगटातील जवळजवळ ४५ मुलांनी त्यात भाग घेतला होता. 'हिमगौरी आणि सात बुटके' मधील पहिली वाक्ये मी अशी काही म्हटली होती की सर्वांनी टाळ्या वाजवून खूप कौतुक केले. ह्यामुळे तर माझा उत्साह आणखीन वाढला. सगळीच वाक्ये मी मोठ्या दिमाखात म्हणत होतो. पण शेवटची चारच छोटी वाक्ये राहिली होती आणि नेमकी वीज गेली. सगळीकडे अंधार झाला. अध्या तासानंतर स्पर्धा परत सुरू झाली. पण मला मात्र पुन्हा संधी दिली गेली नाही.

मी खूप खूप नाराज झालो. डोळ्यात राहून राहून पाणी येत होते. तरीही पहिली सारी वाक्ये विचारात घेऊन कदाचित आपल्याला बक्षीस दिले जाईल असेही वाटत होते. शेवटी एकदाचा बक्षीस समारंभाचा क्षण आला. पण हाय ! बक्षीस मिळालेल्या मुलांच्या यादीत माझे नावच नव्हते. काहीच न बोलता मी हळूच तेथून उठणार. एवढ्यात परीक्षकांनी मला व्यासपीठावर बोलाविले. सर्वांना उद्देशून ते म्हणाले, "आणि आजच्या या स्पर्धेचं विशेष पारितोषिक आम्ही देत आहोत, ते रमेश पाटीलला. त्याचा प्रवेश पूर्ण होण्याआधीच वीज गेली हा काही त्याचा दोष नव्हे." त्यांनी असे म्हणून बक्षिसाचा. छोटासा चषक माझ्या हाती दिला. सर्वांनी टाळ्या वाजवून या गोष्टीचे खूप कौतुक केले. त्यानंतर मला आणखी खूप बक्षिसे मिळाली. पण माझे पहिले बक्षीसच मला खूप आवडते.

●●●

## माझे अविस्मरणीय स्वप्न

मला पक्क आठवतं. क्रिकेटचा तो अंतिम सामना होता. ७ वी च्या 'अ, ब, क, ड' सर्वच तुकड्यांच्या संघाला आम्ही सहज पराभूत केलं होत. आणि आज शेवटचा सामना होता. तो ६ वी अ च्या संघाबरोबर. आपल्यापेक्षा थोड्याशा मोठ्या असणाऱ्या मुलांना आम्ही सहज हरविले होते. त्यामुळे ह्या संघालाही आपण नक्कीच हरवणार असंच आम्हाला वाटत होतं. पण एकतर ६ वी अ

च्या पहिल्याच जोडीने ९० धावांचा डोंगर उभा केला होता. आणि आमच्या संघातले एकापाठोपाठ एक सहा खेळाडू केवळ २५ धावांतच बाद झाले होते.

आता संघाची सगळी जबाबदारी माझ्यावर व उरलेल्या खेळाडूंवर होती. आमची होणारी फजिती बघून प्रतिपक्षाला उत्तेजन देणारी सगळी मुले जास्तच आरडाओरडा करू लागली. माझे तर हातपायच गार पडू लागले होते. डोळ्यात पाणी येऊ लागले होते. एवढ्यात आवाज आला, 'अरे!, असा रडूबाईसारखा रडू नको. समोरून येणाऱ्या चेंडूवर नीट लक्ष ठेव, इतर खेळाडूंचा अंदाझ घे, आणि मार फटका जोरात. अरे! पण तुम्ही कोण? मला दिसत कसे नाही? मी विचारले. ते मी तुला नंतर सांगेन, चल एकाग्रपणे खेळायला लाग बघू. मी तुझ्याजवळच आहे. घाबरू नको.

आणि काय जादू झाली कोणास ठाऊक? मी सहज जरी बॅट उचलली तरी पटापट धावा मिळत गेल्या. चौकारांचा आणि षटकारांचा नुसता वर्षाव केला आम्ही. मी आणि सुजितने आवश्यक ती धावसंख्या पूर्ण केली. तेव्हा तर सगळ्यांनी कौतुकाने खांद्यावर उचलून घेतले आम्हाला. पण हा विजय केवळ मी नव्हता मिळवला. मला प्रेरणा देणारी कुणी दुसराच दोस्त होता. तो मलाही दिसला नव्हता. पण कदाचित बोलेल. म्हणून मी म्हटलं, प्रिय दोस्ता, हा विजय केवळ तुझ्यामुळेच मिळवता आला. पण मला एकदा तरी तू दिसावास असं वाटतं. मला एकदाच तुझे आभार मानायचे आहेत.

अरे हा काय ? मी तर तुझ्याशेजारीच आहे.

त्याचे वाक्य ऐकून मी मान वळवून बघितलं तर चक्क सचिन तेंडुलकर !!

एक क्षणभर मी बघतच राहिलो. मग भानावर येऊन म्हणालो, 'सचिनदादा, तुम्ही मला प्रेरणा दिलीत. मला एकदा तरी तुमचे पाय धरू द्या.' असे म्हणून मी मित्रांच्या खांद्यावरून खाली उडी मारली. आणि मला धक्काच बसला, मी चक्क कॉटवरून खाली पडलो होतो. म्हणजे आपण मिळवलेला विजय, आपल्याशी चक्क जवळ येऊन गप्पा मारणारा, धीर देणारा सचिनदादा, हे केवळं स्वप्नच होते तर!

●●●

## नको तेव्हा आलेले पाहुणे

आईचा जवळजवळ सर्व स्वयंपाक करून झाला होता. आजीच्या मदतीने ताईनेही बरीचशी तयारी केली होती. आता एकदा सगळ्यांची खाणी आटोपली की निघू आपण, बाबा म्हणाले. माझा आणि निलेशचा तर आनंद गगनात मावत

नव्हता. कारण शाळेला सुट्टी लागलेल्या पहिल्याच दिवशी बाबांनी आम्हाला पन्हाळगड दाखवायचं कबूल केलं होतं. त्याप्रमाणे सर्व तयारी झालेली होती. आता कपडे वगैरे घालून बाहेर पडायचं की झालं मग तबक उद्यानात भरपूर खेळू. पन्हाळगडाची माहिती करून घेऊ. भरपूर मजा करू. आईस्क्रीम खाऊ असे बेत मी आणि निलेश करीत होतो.

एवढ्यात 'पाटणकर इथेच ना'? थोडासा अनोळखी आवाज आला. आत्ता नेमकं कोण आलं आणखी ? असं म्हणत सगळेच बाहेर डोकावलो. समोर हातात सामानाच्या पिशव्या कशाबशा सांभाळीत एक आजोबा- आजी उभे होते.

अग आई, आपले रत्नागिरीचे डोंगरेकाका-काकू आलेत बघ. असं म्हणून बाबांनी त्यांना हाताला धरून आत आणलं. तसे ते थोडेसे रेलून बसत म्हणाले. ''बरं झालं तुम्ही घरीच आहात ते. फार वर्षांपूर्वी भेटलो होतो. म्हटलं तू नसलास तर मुलं काय ओळखायची नाहीत आपल्याला. पण तू आज घरी कसा ? घरी आहेस ते ही बरंच म्हणा, आम्ही दोघे चाललो आहोत मुंबईला. म्हटलं गाडी रात्री ७॥ ची आहे आणि आता तर सकाळचे ७ वाजले आहेत. जाऊ पाटणकरांकडे, तेवढीच विश्रांती होईल. देवीचं दर्शन होईल. संध्याकाळी मात्र गाडीत बसवून दे, अरे, वयामुळे हल्ली काही होत नाही.''

''आणि बरं का, हे म्हणाले एकदा, आपण पत्र तरी घालू त्याला. पण मीच म्हटलं, करायचंय काय, आपलीच तर माणसं आहेत ती.''

खराय, असं म्हणत बाबांनी आमच्याकडे बघून डोळे मिचकावले. पण आम्हाला जराही हसू आले नाही. अस्सा राग आला होता त्या दोघांचा, अगदी नको तेव्हा येऊन आमच्या सहलीची सगळी मजाच काढून घेतली होती त्यांनी. तबक उद्यान, आईस्क्रीम सगळे बेत मनातल्या मनात राहिले. आणि आईने केलेले सगळे पदार्थ आम्ही घरीच खाऊन टाकले.

●●●

## माझे आवडते पुस्तक

अगदी खूप लहानपणी चित्रांची ओळख करून द्यायला म्हणून बाबांनी आमच्यासाठी पुस्तके आणायला सुरुवात केली. त्या सवयीप्रमाणे आजही ते सर्व प्रकारची गोष्टींची, साहसकथांची, परीकथांची, रामायण, महाभारतातील गोष्टींची सर्व प्रकारची पुस्तके सतत घेऊन येतात. वाचनाचा छंद मलाही आणि दादालाही. त्यामुळे आम्ही ही सारी पुस्तके अधाशीपणे पुन:पुन्हा वाचतो. पण आजपर्यंत मी जेवढी पुस्तके वाचली त्यांत 'बिरबलच्या गोष्टी' हे माझे सर्वांत

आवडते पुस्तक आहे.

एकतर या सर्व कहाण्या चतुर बिरबलाने दिलेल्या हजरजबाबी उत्तराच्या आहेत. शिवाय या सर्वच गोष्टी आकाराने लहान आहेत. पण अर्थांच्या दृष्टीने खूप महान आहेत. असं आमच्या मराठीच्या बाई म्हणतात. आता जसं वय वाढतं ना तसं मलाही ते पटतंय. कारण साध्या सुध्या प्रसंगातून बिरबलाने बादशहाला खूष करण्यासाठी, नव्हे तर त्याच्या निरीक्षणातून त्याला जगात जे जे काही बरे वाईट दिसले त्याचे नेमके वर्णन केले आहे. यावरून त्याची बुद्धिमत्ता तर कळून येतच. पण हे सारे सोप्या पण सुंदर भाषेत मांडल्यामुळे त्याचा आम्हा मुलांनाही कंटाळा येत नाही. गोष्टींना साजेशी चित्रेही यात असल्याने अगदी प्राथमिक शाळेच्या मुलांनाही हे पुस्तक आवडले तर नवल नाही.

'सत्तावीस उणे नऊ बरोबर शून्य' असे म्हणणारा बिरबल गणितात कच्चा होता की काय असे पहिल्यांदाच गोष्ट वाचताना मलाही वाटले. पण सत्तावीस नक्षत्रांपैकी पावसाची नऊ नक्षत्रे वजा केल्यावर जीवन कसे होईल हे त्याचे स्पष्टीकरण वाचले. तेव्हा लक्षात आले, त्याचा अभ्यास खूप मोठा होता. पण आपणाला माहीत असणारी तत्त्वं त्यानं फारच सहज इतरांना पटवून दिली. बादशहाला 'जो बूंदसे गयी वो हौजसे नही आती' हे उत्तर देणारा धीट बिरबल, माकडिणीच्या गोष्टींतून आपण किती स्वत:वर प्रेम करतो हे सांगणारा बिरबल, बेगमसमोर आंब्याची साले टाकून 'आपण किती फळे खाल्लीत' असं म्हणून बेगमसाहेबांना चिडवणाऱ्या बादशहाला, पण सरकार, आपल्यासमोर सालीही नाहीत. म्हणजे आपण सालीसकट फळे खाल्लीत वाटतं. असं म्हणून प्रत्यक्ष बादशहाची गोड थट्टा करणारा बिरबल - किती म्हणून उदाहरणे सांगावीत. या सर्वच कथांची मी आजपर्यंत अनेक पारायणे केली आहेत.

बाबा नेहमी म्हणतात. ज्या दरबारात बिरबलासारखी माणसे होती, तो नवरत्नांचा दरबार ज्याचा, तो बादशहा किती नशीबवान. पण मी म्हणतो, ज्या घरांत त्या बिरबलाच्या कहाण्यांचे पुस्तक आहे, त्या घरांतली माणसेही नशीबवानच आहेत. कारण या छोट्याशा पुस्तकाने आम्हाला थोडे हसवले आहे, आमचे मनोरंजन केले आहे, आमच्यावर खूप चांगले संस्कार केले आहेत.

●●●

प्राणीविषयक

## ''आमचा लाडका टॉमी''

आमच्या घरी तुम्ही केव्हाही आलात तर सर्वात पहिल्यांदा तुमचे स्वागत करेल तो आमचा 'टॉमी'. तसा तो भुंकूनच स्वागत करतो, हे खराय. पण एकदा ओळख पटली ना की गुरगुरणे थांबवून तो छान शेपटी हालवत पायात घोटाळत राहतो. आम्हा सर्वांना तर त्याचा खूप लळा आहेच; पण आमच्या घरी येणाऱ्या सर्वांनाच तो खूप खूप आवडतो.

मागील वर्षी, बाबा गावाकडे काही शेतीच्या कामासाठी म्हणून गेले होते. तिकडून येताना ते 'टॉमीला' घेऊन आले. मुलांनो, ''मी तुमच्यासाठी नवा दोस्त आणलाय.'' असं म्हणून सशासारखा पांढरा शुभ्र 'टॉमी' त्यांनी आमच्या हातात ठेवला तेव्हा तर आम्हा दोघींना किती आनंद झाला म्हणून सांगू? खरंतर तो 'अल्सेशियन' जातीचा वगैरे नाही आहे. पण मुळातच त्याचा रंग पांढराशुभ्र आहे. डोळे एकदम काळेभोर आणि ह्या साऱ्यामुळेच त्याला दृष्ट लागू नये म्हणून की काय एक छान काळाभोर ठिपका त्याच्या कपाळावर आहे. त्यामुळे तर तो आणखीनच रुबाबदार दिसतो.

आमच्या टॉमीला पाण्यात डुंबायला खूप आवडते. शिवाय बाबांच्या बरोबर गाडीतून जातानाही तो खूपच खूश असतो. आम्ही दोघी खेळायला निघालो की त्यालाही खेळायला यायचे असते. शिवाय वेळच्यावेळी खायला मिळाले नाही तर लहान मुलासारखा तो आईच्या पायात घोटाळतो. पण स्वभिमानी मात्र इतका की जोपर्यंत आई किंवा आम्ही कोणी त्याला एखादी वस्तू देत नाही, तोपर्यंत तो त्या वस्तूला तोंडही लावत नाही.

तसा वयाने मोठा नसला तरी घराचे रक्षण हे आपलेच काम आहे, अशी तो पाळत ठेवतो. नवीन माणसाची चाहूल जरी लागली तर भुंकून भुंकून सारे घर डोक्यावर घेतो. पण आलेला माणूस घरचा पाहुणा आहे हे लक्षात आले की मग मात्र तो ओशाळतो. त्यांच्या पायांत पायांत घोटाळतो. ते पाहुणे परत जायला निघाले की रिक्षा किंवा बस चालू होईपर्यंत थांबतो. जणू झालेल्या चुकीची भरपाई करायची त्याची इच्छा असते.

असा हा आमचा लाडका 'टॉमी.'

•••

# आपला राष्ट्रीय पक्षी

**"नाच रे मोरा, आंब्याच्या वनात,**
**नाच रे मोरा, नाच"!!**

या ओळीतून लहानपणीच छान थुई थुई नाचत, आपल्याला चित्रातून भेटणारा मोर. हा एक अत्यंत सुंदर पक्षी आहे. तो आपला राष्ट्रीय पक्षी आहे. अर्थात केवळ म्हणून तो मला आवडतो असे मात्र मुळीच नाही. कारण 'मोर' म्हणजे निसर्गाने लक्षपूर्वक घडवलेली एक रंगीत, सुंदर कलाकृती आहे.

त्याचा आकार अतिशय देखणा आहे. त्याला शोभेसा भरजरी निळा रंग त्याच्या मोहक रूपाला शोभा देतो. शिवाय त्याच्या डोक्यावर असणारा तुरा तर तो इतरांपेक्षा खूपच वेगळा, आकर्षक तसेच डौलदार आहे हे सिद्ध करतो. त्याच्या पिसाऱ्यातील मनमोहक रंगांचे वर्णन तर करणे केवळ अशक्यच आहे. तो जेव्हा खुशीत येतो तेव्हा आपला संपूर्ण पिसारा फुलवून नाचत राहातो. विशेषत: आकाशात पर्जन्यऋतूची चाहूल देणारे काळे ढग आले की तो आनंदाने खूप खूप नाचतो. बागेमध्ये वगैरे ठेवलेले मोरही आनंदाने नाचतात. पण रानावनात राहाणारे, मुक्त नर्तन करणारे मोर मात्र खूपच सुंदर दिसतात. म्हणूनच त्याला 'राष्ट्रीय पक्षाचा' मान दिला गेला असावा. पण स्वत:च्या सुंदर रूपाचा त्याला गर्व होऊ नये म्हणून असेल कदाचित निसर्गाने त्याचे पाय कुरूप बनविले आहेत.

मोर हे विद्यादेवीचे वाहन आहे. तर यमुनेकाठी गोपगोपींसमवेत क्रीडा करणाऱ्या श्रीकृष्णालाही मोरपिसांचा मुकुट खूपच आवडत असे. शहाजहानचे सुप्रसिद्ध मयूरासनसुद्धा, त्याचे विलक्षण देखणे रूप अजरामर करणारे आहे.

असा हा आपला 'राष्ट्रीय पक्षी' विलक्षण देखणा, मनमोहक रंगांचे सुंदर मिश्रण असणारा म्हणून तर रांगोळ्या, भरतकाम, हस्तकला, शिल्पकला....सर्वत्रच त्याची रूपे कलावंतांनी रेखाटलेली असतात.

●●●

# माझी आवडती हरिणी (गाय)

मला आठवते तेव्हापासून आमच्या घरी 'दुग्धपालनाचा' व्यवसाय चालू आहे. साहजिकच आमच्या घरी अनेक गाई म्हशी आहेत. पण या सर्वांमध्ये हरिणी नावाच्या गायीवर माझे सर्वात जास्त प्रेम आहे.

तिला घेऊन बाबा आणि काका घरी आले ना, तेव्हा आम्ही सारे तिच्याभोवती जमलो. तिचा तांबूस रंग, त्यावर असणारे छान काळे - पांढरे ठिपके हे बघताच

आम्ही बाबांना सांगून टाकलं 'की हिचं नाव 'हरिणी' ठेवायचं. आईने आल्याआल्या तिला ओवाळून घेतलं. मायेनं पाठीवरून हात फिरवला. तेव्हा आपले टपोरे डोळे रोखून ती नुसती बघत राहिली. थोड्या वेळाने वाऱ्यासारखी सुसाट पळायला लागली. तिला पकडून आणता आणता बाबांना इतका दम लागला की शेवटी ते थकून गेले. म्हणाले, "छान नाव शोधलंत रे पोरांनो, खरंच हरिणासारखी धावतेय ही –"

पहिल्यांदा तिने थोडा त्रास दिला. मग मात्र खूप समजूतदार झाली. तिला आम्ही वेळच्यावेळी भरपूर खायला प्यायला देतो, तसेच मायाही करतो; हे समजल्यामुळेच असेल कदाचित ती भरपूर दूध देते. आम्ही कुणीही तिच्याजवळ गेलो की कधीही हंबरून किंवा शिंगे रोखून आपली नाराजी व्यक्त करीत नाही. तर उलट आमच्या अंगाला जिभेने चाटून ती प्रेम व्यक्त करते. 'कृष्णा' नावाच्या एका छान कन्येलाही अलीकडे तिने जन्म दिला आहे.

संध्याकाळ झाली की सगळी गुरे घेऊन आमचा रामू घरी परततो. घरी येताक्षणीच ती प्रथम कृष्णेच्या चेहेऱ्यावर दुधाच्या धारा सोडते. नंतर आम्हालाही कासंडी भरून दूध देते. जणू आमच्या प्रेमाची भरपाईच आपण करतोय असा आनंद तेव्हा तिच्या चेहेऱ्यावर असतो.

●●●

## माझा आवडता प्राणी (हत्ती)

'सिंह' हा जंगलचा राजा आहे, मुळातच तो देखणा आणि रुबाबदार आहे, तर वाघाचे रूप अतिशय मोहक आहे. हरिणाचे डोळे विलक्षण देखणे आहेत, तर काळविटाची चाल अतिशय तेज आहे. जंगलातील प्रत्येक प्राण्याचे स्वत:चे असे कोणते ना कोणते तरी वैशिष्ट्य आहे. वरीलपैकी एकही गोष्ट ज्याच्याजवळ नाही, तरीही सर्वांना जो मनापासून आवडतो, तो म्हणजे 'हत्ती'. आणि 'हत्ती' हा माझाही सर्वांत आवडता प्राणी आहे.

त्याचा विशाल देह, लांबसडक सोंड आणि जबरदस्त मोठे सुपाएवढे कान..... सर्वच गोष्टी त्याच्या त्या रूपाला खुलून दिसतात. विशेषत: त्याच्या देहाच्या मानाने त्याचे डोळे खूपच लहान असतात. पण तरीही श्रीगणेशासारख्या त्याच्या मोहक, उंच कपाळाला ते नक्कीच शोभा देतात. शिवाय सोंडेजवळ असणारे त्याचे लांबसडक दात – तेही त्याच्या सौंदर्यात भर टाकतात.

हत्तीला पाण्यात खेळणे, सोंडेमध्ये भरपूर पाणी घेऊन कारंजासारखे ते उडवणे खूपच आवडते. शिवाय ऊसही त्याला भरपूर आवडतो. अर्थात देहाच्या व

ताकदीच्या मानाने त्याला खाद्यही भरपूर लागते. पण असे जरी असले तरी तो वेगवेगळ्या रूपाने आपल्याला उपयोगी पडतो. राजे लोकांच्या काळात 'राजे -राण्या' हत्तीवरील अंबारीत बसून जात असत. दागदागिन्यांनी, सुंदर वस्त्रांनी नटलेले दारी झुलणारे हत्ती हे राजवैभव मानले जात असे. आजही ऐतिहासिक सणांच्या निमित्ताने जेव्हा मिरवणुका निघतात तेव्हा अग्रभागी हत्ती हा असतोच. शिवाय जंगलामधील प्रचंड आकाराचे लाकडी ओंडके वगैरे वाहून न्यायलाही हत्तीचा वापर केला जातो. आजकाल सर्कसचे चालकही हत्तींना वेगवेगळे खेळ शिकवून, प्रेक्षकांची करमणूक करायला त्यांचा वापर करतात. शिवाय हत्तींच्या शर्यतीही आजकाल मोठ्या प्रमाणात लावल्या जातात. अशा प्रकारे आपणाला सर्वांना हवाहवासा वाटणारा हा प्राणी बहुपयोगी नक्कीच आहे.

शिवाय हत्तीचे दातही 'हस्तिदंती दागिने', कलाकुसरीच्या वस्तू बनवायला अतिशय उपयुक्त ठरतात. अशा प्रकारे मृत्यूनंतरही तो मानवजातीवर उपकारच करीत असतो म्हणूनच असेल कदाचित लहानांचे, मोठ्यांचे, साऱ्यांचेच त्याच्यावर प्रेम असते.

●●●

## स्थलवर्णनपर

# *माझी शाळा*

मिडल स्कूल स्कॉलरशिपच्या परीक्षेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल माझा आणि माझ्याबरोबर ज्या आणखी वीस विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळाली, त्यांचा सत्कार आमच्या शाळेने आयोजित केला होता. प्रत्येकजण कौतुकाने माझ्याकडे बघत होता. आमच्या मुख्याध्यापिका कारखानीसबाईंनी तर माझे खूप खूप कौतुक केले. त्यामुळे तर मला एकदम गोंधळल्यासारखेच वाटायला लागले. कारण मला जे यश मिळाले त्याचे प्रमुख कारण होते, माझी तयारी करून घेणारे शिक्षक. मला हवी ती पुस्तके आणि प्रश्नपत्रिका पुरविणारे आमचे ग्रंथालय. दरवर्षी निकालाचे नवे नवे उच्चांक गाठणारी माझी शाळा, हे माझ्या यशाचे खरे रहस्य आहे.

वास्तविक बाबांची बदली या तालुक्याच्या गावी झाली. तेव्हा मी खूप नाराज झालो होतो. पुण्यातल्या शाळेच्या मानाने 'अभिनव विद्यामंदिर'ची म्हणजे माझ्या या आजच्या शाळेची इमारत मला खूप जुनाट, पडकी वाटली होती. पण जसजसा या शाळेत मी रमत गेलो तसं लक्षात आलं, 'ऊस डोंगा परि रस नाही डोंगा' या ओळी खऱ्या करून दाखवल्यात आपल्या शाळेनं. कारण तिचे बाह्यरूप देखणे नसले तरी अंतरंग नक्कीच अभिमान वाटावे असे आहे.

माझ्या या शाळेत अडीचहजार विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. बालवाडीपासून ते दहावीपर्यंत सर्व वर्गांच्या पाच - पाच तुकड्यांतून इथे मुलांना मोठ्या उत्साहाने शिक्षण दिले जाते. जागा अपुरी असल्याने मोठ्या मुलांची शाळा सकाळी भरते, तर दुपारी आम्हा मुलांची. पण मुळात स्वतः कारखानीसबाई तसेच इतर सर्व शिक्षक शिस्तप्रिय असल्याने मोठ्या आनंदाने पण कडक शिस्तीत आम्हाला शिकवतात. अभ्यासाबरोबरच खेळ, गायन, हस्तकला यांचेही शिक्षण माझ्या शाळेत दिले जाते. त्यासाठी व ग्रंथालयासाठी मागील वर्षीच नवीन इमारतही बांधली गेली आहे.

दरवर्षी माझ्या शाळेचे विद्यार्थी परीक्षांमध्ये, स्पर्धांमध्ये, सांघिक खेळांमध्ये चमकतात. शाळेचे नाव उज्ज्वल करतात. तेव्हा आज माझे झाले तसे त्यांचेही कौतुक होते. पण आमच्यातील गुण ओळखून आम्हाला गुणी बनविणाऱ्या शाळेचंच ते खरे यश नव्हे काय ?

●●●

# असा आमचा गाव

कुणी काही म्हणो, मला माझे गाव फार आवडते. अर्थात माझे सारेच दोस्त वर्णन करून सांगतात. त्याप्रमाणे झुळझूळ वाहणारी नदी माझ्या गावाजवळ नाही. हिरवीगार सुपीक शेतेही येथे आनंदाने डोलत नाहीत. किंवा कोणत्याही फळांच्या फळबागाही येथे नाहीत.

निसर्गाने उदारपणे निसर्गसौंदर्य बहाल केलं, तेव्हा एखाद्या खोडकर मुलाप्रमाणे माझ्या गावाने कुठेतरी पळ काढला असावा. म्हणून तर संपन्नतेच्या कोणत्याच खुणा येथे नाहीत. उघड्या - बोडक्या डोंगरमाथ्याच्या पायथ्याशी माझे हे गाव वसलेले आहे. या गावाच्या बाजूलाच, फक्त पावसाळ्यातच ज्याच्यात पाणी असते असा एक छोटासा ओढा वाहतो. मुळात पाणी पुरवठाच कमी. त्यामुळे फुलाफळांनी बहरलेली झाडे इथे फारशी नाहीत. पण रानोमाळ उगवणारी रंगीबेरंगी रानफुले वाऱ्यावर डोलताना मात्र तुम्हाला जरूर दिसतील.

प्रत्येक गावाचं, कोणती ना कोणती कलाकुसरीची वस्तू निर्माण करण्याबाबतीत नाव प्रसिद्ध असतं असे उत्कृष्ट कारागीर आमच्या गावात नाहीत. तरीही हे गाव स्वत:च्याच एका वेगळ्या मनस्थितीत वातावरणाशी मिळतं - जुळतं घेताना मात्र तुम्हाला दिसेल. साधेपणा, सोशिकपणा हेच या गावाचं वैशिष्ट्य आहे.

मुळात या गावची लोकसंख्या २० - २५ हजार एवढीच आहे. त्यातले बरेचजण शेती करतात. तर काहीजण छोटासा व्यवसायही करतात. पण एकूण परिस्थितीने श्रीमंत असे लोक इथे फारसे नाहीतच. त्यामुळेच अन्नासाठी, पाण्यासाठी पैशासाठी सारेच सतत कष्ट करताना दिसतात.

एका जुन्या दगडी इमारतीत इथे शाळाही भरवली जाते. १० वी पर्यंतचे सारेच वर्ग आता इथे आहेत. शाळेजवळच जी नवी इमारत दिसते तिथे ग्रामपंचायत आहे. शिवाय दुसऱ्या मजल्यावर सरकारी दवाखानाही आहे. अलीकडेच एक सहकारी बँकही इथे सुरू करण्यात आली आहे. माझी आई तर म्हणते ''हल्ली शहरातल्या सर्व सुधारणा इकडे यायल्या लागल्या आहेत. बघता बघता आपला गाव सुधारेल.'' 'पण खरं सांगू, तो आज फारसा सुधारलेला नसला तरीही मला खूप आवडतो. कारण तो माझा आहे. माझ्या साध्या - भोळ्या मित्रांचा आहे.'

●●●

# आपला महाराष्ट्र

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा
प्रणाम माझा घ्यावा हा श्री महाराष्ट्र देशा...।

खरंच, या ओळीत म्हटल्याप्रमाणे आपला महाराष्ट्र ही एक मंगलभूमी आहे. संत तुकाराम, एकनाथ तसेच ज्ञानेश्वर या साऱ्या संतमहात्म्यांच्या स्पर्शाने पवित्र झालेली ही भूमी आहे. सह्याद्रीच्या कडेकपारीतून मावळ्यांना एकत्र आणून मुघलांच्या हातून युगपुरुष शिवाजी राजांनी जिची सुटका केली ती जरीपटक्याच्या भगव्या झेंड्याची भूमी म्हणजेच आपली महाराष्ट्रभूमी आहे. शिक्षण महर्षी कर्वे, विनोबा भावे, बाबा आमटे, थोर साहित्यिक कै. वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर.... एक ना दोन किती नावे सांगावीत या थोर भूमीच्या सुपुत्रांची ? आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने संपन्न भूमी आहे.

तसा आपला महाराष्ट्र सप्तसिंधूसारखा सुपीक नाही किंवा काश्मीरइतका देखणा नाही पण तरीही विविध प्रकारच्या निसर्गाच्या सुंदर छटा इथे आपणाला एकाच वेळी पाहायला मिळतात. कोकणची समुद्रकिनारपट्टीने हिरवीगार झालेली माडांपोफळींची संपन्न भूमी हे या महाराष्ट्राचेच एक अंग आहे. तर ज्वारी, बाजरी, ऊस यांची भरपूर पिके घेणारा घाटावरचा प्रदेश हे त्याचे दुसरे अंग आहे. अर्थात याचा अर्थ आमचे राज्य हे केवळ शेतीवरच अवलंबून आहे असे मात्र नाही. कारण शेतीबरोबरीने उत्कृष्ट कलाकारांची, कारागीरांची ही जन्मभूमी असल्याने इथे लहानमोठे उद्योगही खूपच चांगले चालतात.

मुंबई ही राज्याची राजधानी असून, पुणे हे तर 'विद्येचे माहेरघर'. म्हणूनच ओळखले जाते. याशिवाय पंढरपूर, कोल्हापूर, देहू, आळंदी यासारखी अनेक तीर्थक्षेत्रेही येथे आहेत. सह्याद्रीच्या कडेकपारीजवळच आपला महाराष्ट्र वसलेला आहे. त्यामुळेच कोकणचे अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक किल्ले आजही प्रसिद्ध ऐतिहासिक क्षेत्रे म्हणून ओळखले जातात.

'मराठी' ही येथील लोकांची भाषा आहे. आणि ती ही या महाराष्ट्रासारखीच संपन्न आहे. येथील लोकांचे राहणीमान, वागणे - चालणे हेही अतिशय साधे आहे. कुणी त्याला रांगडे म्हणून हसतातही. पण खडकाळ डोंगराच्या पोटात जसे पाण्याचे झरे असतात, तसेच मराठी माणसाचेही अंतरंग आहे. म्हणून तर 'माझा महाराष्ट्र' मला खूप आवडतो.

●●●

# आपला भारत देश

प्रत्येक माणूस जेवढा आपल्या आईवर प्रेम करतो. तेवढेच प्रेम आपल्या मातृभूमीवरही करतो. त्यातून तो देश जर विविधतेने नटलेला, अनेक परंपरांचा असेल तर तो कोणाला आवडणार नाही ?

"जहां डाल डाल पर सोने की चिडियाँ करती है बसेरा,
वो भारत देश है मेरा।"

हे समूहगीत जेव्हा आम्हाला शिकवलं गेलं, तेव्हा त्या गाण्याचा सुंदर अर्थ ऐकून खूप खूप अभिमान वाटला. कारण खरंच आपला देश ही भूमी एकेकाळी 'सुवर्णभूमी' म्हणून ओळखली जात होती. आजही आपल्या देशात सर्व प्रकारची धनधान्ये, फुले - फळे इतक्या प्रमाणावर पिकतात की ते बघूनच कुणालाही अभिमान वाटावा. शेती हा आपल्या देशातील पूर्वी एक प्रमुख व्यवसाय होता. आजही शेती महत्त्वाची आहे. पण शेतीच्या बरोबरीने आज आपल्या देशात लहान - मोठ्या उद्योगांचा विकास होत आहे. वाहतुकीच्या आधुनिक सोयी आपणाला मिळवून दिल्या जात आहेत. त्यामुळेच इंग्रजांनी आपल्याला खूप लुटून नेले असले, तरीही पुन्हा आपण प्रगती करू शकलो आहोत.

आपल्या या देशात हिंदू, शीख, मुसलमान वगैरे सर्व धर्मांचे लोक राहातात. आपल्या देशात एकूण २५ घटक राज्ये आहेत. विशेष म्हणजे या प्रत्येक राज्यात मराठी, कन्नड, सिंधी, पंजाबी अशा वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. त्यांचे सणवार, उत्सवही वेगवेगळे आहेत. या विविधतेमुळे काही वेळा त्यांची आपापसात भांडणेही होतात. कधी कधी भांडणाचे रूपांतर लहान - मोठ्या दंगलीतही होते. पण जर कुणी भारतावर चाल करून आले तर मात्र हे सारेच जण एक होतात. एकजुटीने भारताचे रक्षण करतात. हे आजपर्यंत अनेकदा त्यांनी दाखवून दिले आहे.

अर्थात याचा अर्थ आपला देश केवळ भौगोलिक दृष्ट्या संपन्न आहे असे नाही. डॉ. होमी भाभासारखे शास्त्रज्ञ, लतादीदीसारख्या गायिका, सुनिल गावसकरसारखे खेळाडू, एकनाथ, ज्ञानदेव, तुकाराम कबीरांसारखे संत, महात्मा फुले, आंबेडकरांसारखे समाजसुधारक हे या देशाचे थोर सुपुत्र आहेत. या सार्‍यांच्या प्रयत्नांबरोबरच. उत्कृष्ट कारागिरी करणार्‍या अनेक कलाकारांनीही आपल्या देशाला मोठे केले आहे. म्हणून तर माझे आपल्या भारतावर खूपखूप प्रेम आहे.

●●●

प्रसंगवर्णनपर

## नदीकाठची सहल

दिवाळीची सुटी म्हणून आम्ही मुले मामाकडे कुरुंदवाडला गेलो होतो. गाव छोटंसं, शिवाय रहदारीचा फारसा प्रश्न नाही, त्यामुळे मनसोक्त खेळायला मिळत होतं. त्यात अचानक मामाने जाहीर केलं, "बरं का मुलांनो, उद्या सकाळी ठीक सहा वाजता सर्वांनी तयार राहायचं बरं का. उद्या आपण नृसिंहवाडीला जाऊन येऊ, नदीकाठी खूप मजा करू आणि संध्याकाळी परतून येऊ. चालेल ?" – "हो" एका सुरात आम्ही ओरडलो.

खुळखुळ वाजणाऱ्या घुंगराच्या तालावर चालणाऱ्या बैलगाडीत आम्ही बसलो तेव्हा तर आम्हाला खूपच आनंद वाटला. दोन्ही बाजूला हिरवीगार शेते, त्यावर पडलेले धुके, त्यामुळे अंधुक दिसणाऱ्या वाटा - मुंबईच्या गजबजलेल्या रस्त्यापेक्षा हाच रस्ता खूप छान आहे असंच वाटत होतं. एवढ्यात गाव आलं सुद्धा. मामाचा हात धरून आम्ही खाली उड्या टाकल्या आणि नदीकाठी डुंबायचं म्हणून धावत सुटलो. पण नदीच्या सुंदर घाटाजवळ आलो मात्र, त्या प्रचंड पात्राकडे बघून क्षणभर चकितच झालो ! दूरवर नजरेत मावणार नाही एवढं प्रचंड पाणी, एका बाजूला बांधलेला सुंदर घाट तर दुसरीकडे हिरवीगार शेते; इतकं सुंदर दृश्य होतं ते ! त्यातच डोंगरापलीकडून सूर्य हळूहळू वर येत होता त्यामुळे त्याची छान कोवळी किरणे पाण्यावर पडली होती. साहजिकंच समोर छानसा चंदेरी प्रवाह वाहतो आहे असेच वाटत होते.

थंडीतर खूपच वाजत होती. तरीही मामाने कपडे काढताच, आम्हीही पोहायला उतरलो. क्षणभर अंग थरथरले, त्या तेवढ्या पाण्याची भीतीही वाटली. पण एक दोन डुबक्या मारल्यावर मात्र थंडीही पळाली आणि भीतीसुद्धा. मनसोक्त पोहून झाल्यावर नदीकाठी असलेल्या श्रीदत्तगुरूंचे आम्ही दर्शन घेतले. कंदी पेढे आणि कवठाची बर्फी या दोन्हीही गोष्टींसाठी हे गाव प्रसिद्ध. त्यामुळे त्या हातावर पडताच तर आम्ही क्षणात चट्टामट्टा करून टाकला.

त्यानंतर नावेत बसून आम्ही पैलतीर गाठला. पैलतीरावर मामाचा उसाचा मळा आहे. तिथे छान हुंदडलो. ऊस खाल्ला. कृष्णाकाठची प्रसिद्ध काकडी तोडली. दुपार होताच मस्तपैकी झाडाच्या सावलीत लसणाची चटणी, दही, भाकरी असे जेवण घेतले. सूरपारंब्याचा खेळ, लंगडी वगैरे खेळ खेळताना तर मामा - मामीही सामील झाले. पुन्हा एकदा नदीकाठी खेळायला गेलो. पाण्यात पाय बुडवून गावांच्या नावांच्या, गाण्यांच्या भेंड्या खेळलो. संध्याकाळ होऊ लागताच मात्र पुन्हा मंदिराजवळच्या घाटावर आलो. नदी मातेला प्रणाम केला. दत्तगुरूंनाही प्रणाम केला आणि दमून - थकून घराच्या वाटेला लागलो. ●●●

# बाहुलीचे लग्न

• "बरं का गं, आम्ही संध्याकाळ होताच घरी येऊ, तोपर्यंत कुणीही आपापसात भांडायच नाही." पुन:पुन्हा बजावून सांगत आई - बाबा एकदाचे बाहेर पडले. त्यांची रिक्षा दिसेनाशी होताच मी ताईला म्हटलं, "ए आता घरात फक्त आपण दोघीच आहोत, मी माझ्या मैत्रिणींना बोलावून आणते, म्हणजे आपणाला आपल्या बाहुलीचे लग्न करता येईल." "चालेल, तोपर्यंत मी ही आपल्या बाहुलीला नटवून तयार करते." ताई म्हणाली.

थोड्याच वेळात माझ्या साऱ्या मैत्रिणी नटून थटून जमल्या. समोरच्या घरातल्या सुमीचा बाहुला हा आमच्या पिंकीचा नवरा होता. त्यामुळे सुमी इतकी थाटात आली होती की बोलायची सोय नाही. शिवाय तिच्याबरोबर स्वाती, ज्योती आल्या होत्या, त्यामुळे त्याही आमचा वरपक्ष म्हणून अगदी ऐटीत बसून राहिल्या होत्या.

इकडे ताईने मात्र बाहुलीला छान नटवली होती. 'दृष्ट काढा हो तिची', आजीबाईच्या थाटात नलू म्हणाली, तशी सुमी खुदकन हसली. म्हणाली, "काही नाही दृष्ट लागायची, माझा 'चिंटूराजाच' कसा देखणा, रुबाबदार आहे. त्यालाच लागेल कुणाची तरी दृष्ट." मी काहीतरी उत्तर द्यायच्या विचारात होते, पण एवढ्यात ताईनेच अडवलं. म्हणाली, "बोलू दे गं - तिला, एवढं लग्न होऊ दे. मग बघच कशी गंमत करते तिची." ताईने कानात केलेली ही कुजबूज ऐकून मलाही खूप मजा वाटली.

सुमाची मोठी बहीण कमी आणि मी दोघींनी मिळून अंतरपाट धरला. शाळेत कविता एका सुरात म्हणावी तसे आम्ही मंगलष्टके म्हणू लागलो, त्यात भोंडल्याच्या गाण्यापासून हवं ते म्हणून टाकलं आणि शेवटी एकदाचं लग्न लागलं. नवरा नवरींना खुर्चीत बसवून आम्ही बाजूला झालो न झालो तोच, ताई म्हणाली, "जेवणाची तयारी होईपर्यंत सर्वांना पेढे दे बरं." ताईने सुचविताच मी सर्वांना पेढे दिले. प्रत्येकीनं पेढा तोंडात टाकला आणि दुसऱ्याच क्षणी थू. थू. करीत थुंकून तर टाकलाच, शिवाय जे सापडेल त्यानं ताईला व मला मारायला सुरवात केली. कारण पेढे म्हणून ताईने चक्क पिठात वाट्टेल तेवढं मीठ मिसळून ते गोळेच रंगीत कागदातून खायला दिले होते. आमचं इकडे भांडण जोरात सुरू होतं, तेव्हा बाहुला बाहुली - चुकले नवरा - नवरी मात्र मजेत होते. कारण नुकतंच त्यांचं लग्न झालं होतं ना.

●●●

# सूर्यास्त

एखादी गोष्ट आपण लहानपणापासून बघितलेली असली तरी तिचे सौंदर्य लक्षात यायला, आपण जाणीवपूर्वक तिच्याकडे बघावे लागते हेच खरे आहे. साधी सूर्योदयाची आणि सूर्यास्ताची बाब, पण तिकडे न्याहाळून कोण बघतो ? पण परवा मात्र अचानक ही संधी मिळाली आणि सूर्यास्ताचा अनोखा आनंद मी अनुभवला.

त्याचे काय झाले, आम्ही मुंबईहून एस्.टी. ने पुण्याला चाललो होतो. दिवस उन्हाळ्याचे नव्हते, पण वेळ दुपारची, पाच - साडेपाचची, त्यामुळे खिडकीतून आत येणाऱ्या उन्हाचे चटके बसत होते. कधी एकदा गाडी घाटात शिरतेय असे वाटत होते. एवढ्यात गाडीचे ब्रेक जोरात लागले. अचानक गाडी थांबली, सर्वांनीच कुतूहलाने डोके बाहेर काढले. गाड्यांच्या केवढ्या प्रचंड रांगा उभ्या होत्या. नुकताच एक ट्रक वळणावर समोरून येणाऱ्या बसवर आदळला होता. प्राणहानी झाली नव्हती, पण त्या गाड्या रस्त्यावरून हटवेपर्यंत कुणालाही जाता येणे शक्य नव्हते. हळूहळू मंडळी खाली उतरू लागली. कशीबशी आईची परवानगी घेऊन मीही खाली उतरलो.

खाली उतरून पाहतो तो रस्त्यावर सर्वत्र गाड्याच गाड्या. पण या गाड्यांमधील सर्व लोक मात्र रस्त्याच्या कडेला जो कठडा आहे तिथे गर्दी करून उभे होते. ''चल आपणही मावळतीचा सूर्य बघू.'' असं बाबा म्हणाले, तेव्हा – ''काय बघायचं त्यात ?'' असं म्हणून मी प्रथम कुरकूर केली. पण माझा हातही न सोडता, बाबा जेव्हा मला गर्दीतूनच पुढे घेऊन गेले. तेव्हा मात्र मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण थोड्या वेळापूर्वी खिडकीतून उन्हाचे चटके देणारा सूर्य आता एक छान लाल तांबूस गोळा झाला होता. आता त्याच्याकडे छान एकटक बघता येत होतं. शिवाय त्याच्याजवळचे निळं आभाळ, छान केशरी - पिवळसर रंगाच्या विविध छटांनी खूपच सुंदर दिसत होतं. तोच पिवळसर सोनेरी प्रकाश डोंगराच्या कड्यांवर, तिथल्या दाट हिरव्यागार झाडीवर पडला होता. जणू कुणीतरी एक तलम सोनेरी ओढणीच धरतीमातेच्या अंगावर पसरली होती.

पाहता - पाहता सूर्य आपल्या घराकडे परतू लागलाय याची पाखरांनाही जाणीव झाली असावी. मावळतीच्या शांत सोनेरी प्रकाशात पाखरेही घराकडे परतू लागली होती. ते थवेसुद्धा मोठे मोहक दिसत होते. बघता -बघता लाल -तांबूस रविराज डोंगराच्या कड्याखाली हळूहळू सरकू लागला. तो जसजसा एकेक पाऊल टाकत होता, तशी आकाशातली रंगपंचमी आणखीनच सुंदर भासत होती. त्याच्या त्या बदलत्या रंगछटांकडे बघता बघता तो कधी खाली गेला. लक्षातसुद्धा आले

नाही. पाठीमागे उरला होता केशरी - तांबूस रंग. प्रकाशाच्या, तेजाच्या खुणा मागे ठेवून रविराज मावळला. तशी रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या लोकांची गर्दीही ओसरू लागली. मला मात्र तेथून हलावसंच वाटत नव्हतं, इतकं सुंदर दृश्य अनपेक्षितपणे बघायला मिळाल्याने, मी खूप खूप भारावून गेलो होतो.

●●●

## 'आणि आम्ही हरलो!'

"लंगडीचा सामना असो किंवा क्रिकेटचा -" तो खेळणाऱ्या आणि बघणाऱ्या सर्वांच्याच अंगात उत्साह संचारेल असाच होऊ शकतो. याचे कारण दोन्हीही प्रकारच्या सामन्यात विजयाचे पारडे कधी आपल्या बाजूला झुकते तर कधी आपल्या विरुद्ध संघाच्या. प्रत्येक क्षण हा अशा वेळी कसोटीचा क्षण असतो. त्यातून तो सामना अंतिम फेरीतील असेल तर त्याची मजाच वेगळी असते.

अशाच एका सामन्याची मी स्वत: कर्णधार होते. सामना होता आंतरशालेय लंगडीचा. जवळजवळ बारा वेगवेगळ्या संघांचे पूर्वी सामने खेळून झाले होते. त्यातून जे अंतिम फेरीपर्यंत आले होते. त्यांपैकी एक संघ आमचा होता दुसरा पद्माराजे विद्यालयाचा. दोन्ही संघ तोडीस तोड, त्यामुळे सामना रंगणार याची आमच्यापेक्षा बघ्यांनाच जास्त खात्री होती.

नाणेफेक आम्ही जिंकली. तेव्हा तर ही सुरवात शुभ झाली असे समजून आम्ही आणखी उत्साही झालो. उत्साहाच्या भरात आम्ही आधी लंगडी घालणार असेही जाहीर केले. प्रतिस्पर्धी शाळेचा संघ खेळावयास मैदानात उतरला. तेव्हा एकट्या रंजनाने पहिले तीन महत्त्वाचे खेळाडू बाद केले. त्यानंतर टाळ्यांचा गजर होत असतानाच उरलेले खेळाडूही आम्ही पटकन बाद केले. आम्ही जसजशी त्यांच्यावर कुरघोडी करीत होतो, तसे प्रतिस्पर्धी संघाचे खेळाडू आणखी हतबल होत होते. त्यामुळे हा ही सामना आपण सहजच जिंकणार असा पूर्ण विश्वास आम्हा सर्वांना वाटत होता.

त्यानंतर आमचा संघ धावायला उतरला. सर्वांनीच टाळ्या वाजवून आमचे स्वागत केले. त्यामुळे तर आमची मान अभिमानाने आणखी ताठ झाली. पण प्रतिस्पर्धी संघ मात्र आता नाराज दिसत नव्हता. विशेषत: त्यांच्या कर्णधार असणाऱ्या मुलीच्या चेहेऱ्यावरही अढळ विश्वास दिसत होता. सर्वप्रथम ती स्वत:च लंगडी घालायला आली. एक क्षणभर सर्वांनीच श्वास रोखून धरले होते; अतिशय मंद वेगाने सुरवात करीत ती लंगडी घालू लागली, तेव्हा आमच्या शाळेच्या मुलींनी ओरडून आम्हाला खूप उत्तेजन दिले. पण आज नेमकं काय झालं कोणास माहीत? बघता बघता तिने वेग वाढवला. आणि आमच्या शाळेकडे विजयश्री

खेचून आणणाऱ्या आम्हा सर्व पटाईत खेळाडूंना तिने सहज बाद केले आणि आम्ही पराभूत झालो.

आता पद्माराजे शाळेच्या मुलींनी आमची खिल्ली उडवण्याची पाळी होती. पण तसे झाले नाही, सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आम्हीही तिला हस्तांदोलन केले आणि घरी निघालो. जाताना कुणीच कुणाशी फारसे बोलत नव्हते. कारण सामना म्हटला कि जय किंवा पराजय यापैकी एक काहीतरी होणार हे नक्की, पण आम्हाला थोडासा गर्व झाला आणि आम्ही चक्क हरलो होतो.

●●●

## *माझी पहिली चोरी*

'चोरी कधी करू नये, खोटं कधी बोलू नये' हे सारं रोज देवापुढे आईने सांजवात लावली की मी नेहेमी म्हटलं आहे. पण कसं कुणास ठाऊक त्या दिवशी मी खेळता खेळता आईला न सांगता आमराईकडे गेलो हिरव्यागार झाडांच्या सावलीत प्रथम आम्ही थोडावेळ खेळलो. वेळ दुपारची, त्यामुळे आमराईत पहारा करणारे सर्व माळी भाजी -भाकर खाऊन झोपी गेले होते. त्यांना झोप लागलेली पाहून माझ्या मित्रांनी हळूच आंब्याच्या झाडांवर चढायचे ठरवले. सर्वांचा उत्साह आणि वर लटकणाऱ्या मस्त कैऱ्या बघून मलाही खूपच उत्सुकता वाटली. मी म्हटलं, "सर्वांत आधी झाडावर मी चढेन". आणि कुणी काही म्हणायच्या आधी मी झाडावर चढलोदेखील. सहजासहजी हाताला येतील अशा कैऱ्या बघून मी आनंदाने नुसता वेडा झालो. पटापट कैऱ्या तोडून मी खाली टाकू लागलो तेव्हा नाही म्हटंले तरी खाली उभ्या असलेल्या दोस्तांनी थोडाफार आवाज केलाच आणि त्यांचा आवाज ऐकून असेल कदाचित एक भल्या - मोठ्या मिशा असलेला माळी हातात दंडुका घेऊनच आला. "काय रे, पोरांनो काय चाललंय तिकडे ?" त्याची खणखणीत हाक कानावर आली तसा मी घाबरून पानाआड कसाबसा लपून बसलो. बाकीच्या मित्रांनी आपण लपंडाव खेळतो आहोत असे नाटक केले. तरीही तो तिथल्या तिथेच फिरत राहिला.

असा जवळजवळ तास गेला तेव्हा कुठे कंटाळून पहिला माळी निघून गेला. मुलांनी मला हळूच खाली यायची खूण केली. एवढ्यात दुसरा माळी तिथे आला. त्यानेही झाडांवर पाळत ठेवलेली. त्यामुळे मला साधी हालचालसुद्धा करता येत नव्हती. असा संपूर्ण दिवस संपेपर्यंत त्यांनी पहारा केला. बरोबरीची मुलेही कंटाळली होती.

मलाही काय करावे कळत नव्हते, खाली उतरावे तर चोरी पकडली जाईल, ही भीती, न उतरावे तर खूप भूक लागली होती, आईला न सांगता आलो त्यामुळे

तिचा मार खावा लागेल ही भीती होती. शेवटी आमराईचे दरवाजे बंद करायचे म्हणून माझ्या मित्रांना त्या माळ्यांनी बाहेर काढले, तेव्हा मात्र माझ्या छातीचा ठोकाच चुकला! कारण आता सगळीकडे अंधार पसरू लागला होता आणि झाडावर मी एकटाच होतो. आता मिळेल तो मार खायचा या हेतूने मी खाली उडी टाकली. तेव्हा "मला वाटलंच वर कुणीतरी आहे म्हणून –" असे म्हणत त्या माळ्याने चांगले चार -पाच धपाटे पाठीत घातले. घरी येताच आईनेही भरपूर समाचार घेतला. तेव्हापासून खरंच सांगतो, मी चोरी म्हणून कधी केली नाही.

●●●

## शाळेचा पहिला दिवस

खरं सांगू, त्या दिवशी शाळेत मी प्रवेश केला तेव्हा सर्वांसमोर मी रडलो नव्हतो. पण मनातल्या मनात मला खूप वाईट वाटत होतं. शिशुविहार आणि प्राथमिक शाळेपेक्षा ही शाळा खूपच मोठी आहे. पण असं जरी असलं तरी आपल्या ओळखीचं इथे कुणीच नाही, आपण अगदी एकटे आहोत. असं काहीतरी मला वाटत होतं.

दादाने मला ५वी अ च्या वर्गाजवळ आणून सोडलं. माझा वर्ग खूपच मोठा आणि स्वच्छ होता. खिडकीजवळच्या एका बाकावर जाऊन मी बसलो. तेथून शाळेचे मोठे पटांगण दिसत होते. तिथे खूप मुले आपापसात खेळत होती. प्रार्थनेची घंटा होताच ती सगळी आपापल्या वर्गाकडे पळाली. प्रार्थना होताच पहिल्याच तासाला माणके बाई वर्गात आल्या.

त्यांनी वर्गात येताच हसत हसत आम्हा नवीन मुलांचे स्वागत केले. आमची ओळख करून घेतली. शाळेची, शाळेतल्या सर्व उपक्रमांची आम्हाला व्यवस्थित माहिती दिली आणि पहिलाच दिवस म्हणून छानपैकी गोष्टही सांगितली.

दुसऱ्या तासाला आलेल्या गुरुजींनी आम्हाला रांगेमध्ये उभे केले. आमची पाच मजली भव्य शाळा आम्हाला त्यांनी दाखवलीच, शिवाय भूगोलाचे दालन प्रयोग शाळा, ग्रंथालय, संचयिका बँक.... या साऱ्या विभागांची आम्हाला छान माहिती करून दिली. प्राथमिक शाळेपेक्षा ही शाळा नुसतीच मोठी आहे असे नाही तर इथे खूप खूप नवीन शिकायला मिळेल असे आम्हाला वाटू लागले. नंतर आम्हा मुलांना खेळायलाही मैदानावर पाठविले गेले. खेळता खेळता अजय,स्वरूप, विनय कितीतरी मित्र मला मिळून गेले. त्यांच्याबरोबर खेळता खेळता मी इतका रमून गेलो की मला कळलंही नाही, पहिल्याच दिवशी मी शाळेचा कसा होऊन गेलो ते!

●●●

# आमचा स्वातंत्र्यदिन

बरोबर दीडशे वर्षे जुलमी राज्य करणाऱ्या इंग्रजाच्या तावडीतून आपली भारतमाता स्वतंत्र झाली. मुक्त झाली, तो दिवस म्हणजे १५ ऑगस्ट १९४७. हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आपल्या देशातील लोकमान्य टिळक, गांधीजी, नेताजी सुभाषचंद्र, भगतसिंग यांसारख्या नेत्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. वेळप्रसंगी तुरुंगवासही भोगला. देशासाठी हसतहसत बलिदानही केले. त्यांच्या साऱ्यांच्या बलिदानामुळेच आपला देश १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. म्हणूनच दरवर्षी १५ ऑगस्ट हा दिवस 'आपला स्वातंत्र्यदिन' म्हणून आपण मोठ्या उत्साहाने साजरा करतो.

या दिवशी शाळा, कॉलेज कचेऱ्या सगळीकडे ध्वजवंदनाचे कार्यक्रम होतात. आपला सर्वांचा आवडता तिरंगा उंच आकाशात मोठ्या डौलाने फडकत राहतो. तेव्हा पावित्र्याचे, समृद्धीचे, एकतेचे आणि नेत्यांच्या बलिदानाचे स्मरण करून देणाऱ्या आपल्या ध्वजाचा सर्वांनाच अभिमान वाटतो.

आमच्या शाळेतसुद्धा या दिवशी आम्ही मुले सकाळी ७॥ वाजता जमतो. स्वच्छ गणवेशातील सारी मुले या दिवशी खूप उत्साहाने सर्व कार्यक्रमात भाग घेतात. मैदानाच्या मध्यभागी प्रथम आमचे मुख्याध्यापक ध्वजारोहण करतात. मग आम्ही सारे राष्ट्रगीत गाऊन झेंड्याला वंदन करतो. त्यानंतर शारीरिक शिक्षणाच्या निवडक तुकड्यांचे संचलन व खेळही होतात. नंतर गावातून निघणाऱ्या मिरवणुकीतही आम्ही मुले सामील होतो.

या दिवशी सगळीकडेच सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. अगदी आकाशवाणी आणि दूरचित्रवाणीवरूनही खास सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. रात्री तर गावाच्या मध्यभागी असणाऱ्या मैदानावर सुंदर आतषबाजी केली जाते. जणू सर्वांच्या मनातील आनंदाची चंदेरी फुलेच कुणीतरी उधळत आहे असेच आपणाला त्या वेळी वाटते.

●●●

# आमचा प्रजासत्ताक दिन

'२६ जानेवारी १९२९', भारत स्वतंत्र व्हावा म्हणून स्वातंत्र्ययज्ञात ज्या ज्या थोर, धडाडीच्या नेत्यांनी भाग घेतला, त्या साऱ्यांनीच भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा केली ती याच दिवशी. तेव्हापासून हा दिवस 'स्वातंत्र्य दिन' म्हणून आपले पूर्वज ओळखत. या प्रतिज्ञेचा विसर पडू नये म्हणून हा दिन साजरा करीत. पुढे '१५ ऑगस्ट १९४७' ला आपला देश स्वतंत्र झाला. पण स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यात आली, खऱ्या अर्थाने प्रजेचे राज्य आपल्या देशात सुरू करण्यात आले ते याच दिवशी. म्हणूनच हा मंगलदिन आपला प्रजासत्ताक दिन म्हणून आपल्या देशात आपण साजरा करतो.

१५ ऑगस्टप्रमाणेच २६ जानेवारी हाही आपला महत्त्वाचा राष्ट्रीय सण आहे. आपली सुजलां सुफलां भूमी किती संपन्न आहे, समृद्ध आहे, सुरक्षित आहे याचे दर्शन खऱ्या अर्थाने याच दिवशी घडते. या दिवशी सर्वत्र ध्वजवंदनाचे. संचलनाचे आकर्षक कार्यक्रम साजरे होतातच. पण सर्वांत महत्त्वाचा कार्यक्रम साजरा केला जातो तो आपल्या राजधानीत, दिल्लीत. 'भूदल'' वायुदल' आणि 'नौदल' आपल्या देशाच्या सरहद्दीवरून आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या या तीनही सैन्याचे अतिशय सुंदर संचलन या दिवशी दिल्लीच्या ध्वजारोहणाच्या वेळी केले जाते. या शिवाय अनेक भाषा, धर्म, जाती, परंपराच्या आपल्या या देशातील विविधतेचे दर्शन घडविणारी अनेक समूह - नृत्ये, समूह गीतेही या वेळी सादर केली जातात. नयनरम्य कवायती, कर्णमधुर गीते, रंगीबेरंगी पोशाख घालून फुलपाखरांसारखी बागडणारी मुले.... हे सारे बघून खरंच आपण स्वर्गात असल्यासारखे वाटते.

आमच्या शाळेतही हा दिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. शाळेच्या प्रवेशद्वारापाशी, ध्वजाजवळ शाळेतील मोठी मुले सुंदर रांगोळ्या काढतात. झेंडूच्या फुलांनी, रंगीबेरंगी पताकांनी शाळेचे आवार अतिशय सुंदर दिसते. शिस्तबद्ध संचलन, ध्वजारोहण, राष्ट्रगीत तसेच समूहगीतांचे गायन असे सारेच कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. छोट्याशा मेजवानीनंतर कार्यक्रम संपतो.

आमच्या गावातही सगळीकडे अशाच प्रकारचे लहानमोठे कार्यक्रम सर्वत्र साजरे केले जातात. शाळा, कचेऱ्या, रुग्णालये, सांस्कृतिक केंद्रे, सर्वत्र आपला तिरंगा आनंदाने उंच आकाशात फडकत असतो. सगळीकडे सर्व प्रकारचे लोक असे आनंदात वावरताना बघितले की मग म्हणावंसं वाटतं, ''सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा''

●●●

# महाराष्ट्र दिन

"बहु असोत सुंदर संपन्न की महा।
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।।"

एका सुरात निवडक मुलींचे गाणे झाले. त्या पाठोपाठ शाळेच्या मैदानाच्या मध्यभागी जिथे आपल्या महाराष्ट्र राज्याची छान रांगोळी काढली होती, तिथेच ध्वजारोहण झाले. हिंदवी स्वराज्याच्या विजयाची घोषणा देणारा भगवा झेंडाही मोठ्या डौलाने आकाशात फडकू लागला. आम्ही मुलांनी 'जय महाराष्ट्र' च्या घोषणा दिल्या आणि झेंड्यालाही वंदन केले. त्यानंतर मुख्याध्यापक श्री. ठाकूर गुरुजी यांनी आम्हाला "महाराष्ट्र दिनाविषयी", 'आपल्या परंपरेविषयी छान माहिती सांगितली. ते म्हणाले, "मुलांनो, एक मे हा आपण महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करतो. कारण याच दिवशी म्हणजे '१ मे १९६०' रोजी स्वतंत्र महाराष्ट्राची मुहूर्तमेढ आपले पहिले पंतप्रधान स्वर्गीय पंडित नेहरू यांच्या हस्ते रोवली गेली. आपल्या या महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र ह्यांचा समावेश आहे. मराठी ही आपली मातृभाषा आहे. जरी - पटक्याचा भगवा झेंडा हा तर आपल्याला आपल्या राज्याचा अभिमान वाटावा अशा अनेक ऐतिहासिक घटनांचे प्रतीक आहे." या माहितीपूर्ण भाषणानंतर आपल्या परंपरेनुसार शिवरायांच्या जीवनावर एक पोवाडा सादर केला गेला आणि मगच कार्यक्रम संपला.

आमच्या शाळेप्रमाणेच महाराष्ट्रात सर्वत्र, हा दिवस 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा केला जातो. ध्वजारोहण, मराठी परंपरा - त्यातील वेगवेगळ्या छटा दर्शविणारे करमणुकीचे कार्यक्रमही अनेक ठिकाणी सादर होतात. आमच्या गावातील मध्यवर्ती वाचनालयात तर आपल्या राज्यातील विविधतेचे, संपन्नतेचे दर्शन घडविणाऱ्या अनेक चित्रांचे सुंदर प्रदर्शन आयोजित केले जाते. १ मे १९६० पासून आपण केलेल्या प्रगतीचा तो आलेख बघून खरंच आपलीही छाती अभिमानाने ताठ होते.

●●●

# गुढीपाडवा

आपल्या हिंदूधर्मात अनेक सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरे करण्याची प्रथा आहे. हे सर्वच सण आपल्यावर छान संस्कार घडवितात. आपल्या पूर्वजांच्या काळातील काही मंगल क्षणांची आपणाला आठवण करून देतात. या सर्व सणांमध्ये अतिशय महत्त्वाचा सण म्हणजे गुढीपाडवा. एक तर हा दिवस म्हणजे साडे

तीन मुहुर्तांपैकी एक मुहूर्त. म्हणून तर कोणत्याही शुभकार्याची सुरुवात या दिवशी केली जाते.

प्रभू श्रीरामचंद्र चौदा वर्षांच्या वनवासातून रावणाचा, रावणासारख्या अनेक शक्तिमान राक्षसांचा पराभव करून अयोध्येत परतले ते याच दिवशी. त्यांच्या विजयी आगमनाची सूचना देणाऱ्या विजयपताका म्हणून घरोघरी गुढ्या उभ्या केल्या गेल्या. आजही आपण घराघरांवर गुढी उभी करतो ती त्या मंगल क्षणाचे, विजयाचे प्रतीक म्हणून. शिवाय याच मुहुर्तावर ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली. पैठणच्या शालिवाहन राजाने आपल्या नावाने याच दिवशी 'शक' सुरू केला. म्हणून तर हिंदू पंचागानुसार या दिवशी नवे वर्ष सुरू होते.

आमच्या घरीसुद्धा दरवर्षी बाबा उंच गुढी उभी करतात. एका मोठ्या बांबूवर छान जरीची वस्त्रे घालून त्यावर चंबू किंवा गडू ठेवतात. साखरेची माळ, फुलांचे हार, कडूलिंबाचे डहाळे यांनी गुढी सुशोभित केली जाते. गुढीभोवती छानशी रांगोळी काढली जाते. पंचपक्वानांचा नैवेद्यही गुढीला दाखविला जातो. पण ही पक्वान्ने खाण्याआधी बाबा मात्र कडूनिंबही खायला लावतात. एकतर तो रक्त शुद्ध करणारा आहे. शिवाय सुखाबरोबर, दुःख, गोडाबरोबर कडूही आपणाला स्वीकारावं लागतं हे सुचविणारा आहे. म्हणून त्याचे सेवन आवश्यक आहे असे बाबांचे मत आहे.

आमच्या गावातसुद्धा या दिवशी सर्वत्र गुढ्या उभ्या केल्या जातात. काही ठिकाणी सरस्वतीचे पूजन केले जाते. घरोघरी पंचागाचेही पूजन केले जाते. नवीन उपक्रमांना सुरुवात होते ती ही ह्याच दिवशी. शिवाय हा सण येतो तो दिवस म्हणजे चैत्र महिन्याचा पहिला दिवस. म्हणजे वसंतऋतूच्या आगमनाची फळाफुलांच्या बहराची आणि कोकिलगायनाची गोड सूचना देणारा हा दिवस. म्हणून तर हा सण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतो.

●●●

# नारळी पौर्णिमा

'श्रावणामासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे'

या ओळीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे कधी पाऊस तर कधी मस्त कोवळे ऊन - असा ऊनपावसाचा खेळ जेव्हा सुरू होतो तेव्हा सुरू होतो श्रावणमास. आषाढात भरपूर पाऊस पडून गेल्यामुळे राने, झाडे, वेली, कुरणे सारं काही हिरवंगार झालेलं असतं. श्रावणातल्या वेगवेगळ्या सणांनी घरांतही सतत मिष्टान्न तयार होत असतं.

पण श्रावणात येणाऱ्या वेगवेगळ्या सणांमध्ये नारळी पौर्णिमेचे महत्त्व काही वेगळेच आहे.

एकतर आपल्या देशाला समृद्ध अशी किनारपट्टी लाभली आहे. त्या जलसंपत्तीवर ज्यांची गुजराण होते, ते सारेच जण या दिवशी 'नारळ' समुद्राला अर्पण करतात. समुद्राची भक्तीभावे पूजा करतात. वाजत गाजत आणलेले श्रीफळ समुद्राला अर्पण करतात. गोडधोड पक्वान्नांचा नैवेद्य दाखवून सागरकिनारी मनमोहक नृत्ये करतात. जणू पुन्हा मासेमारीला आरंभ करण्याआधी ते सागराची हरतऱ्हेने उपासना करतात.

हाच सण राखी पौर्णिमा म्हणूनही ओळखला जातो. या दिवशी बहीण भावाला ओवाळते. आपल्या प्रेमाचे प्रतीक म्हणून त्याच्या हातावर राखी बांधते. तिचे रक्षण करण्याची जबाबदारी भाऊराया स्वीकारतो. म्हणूनच या सणाला 'रक्षाबंधन' म्हणूनही ओळखले जात असावे. चितौडची राणी कर्मवती जेव्हा संकटात सापडली तेव्हा तिने हुमायूनला राखी पाठवली, संरक्षणाची विनंती केली. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे धर्माने मुसलमान असूनही त्याने या हिंदू महाराणीचे संरक्षण केले. इतिहासातील ही घटना राखीचे महत्त्व सांगणारी आहेच. म्हणून दरवर्षी श्रावण महिन्यातील पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा; तसेच राखी पौर्णिमा म्हणून सर्वत्र साजरी केली जाते.

●●●

# होळी

वर्षभर जसे ऋतुचक्र बदलेल तसे सृष्टीचे रूपही बदलत जाते. पण या सर्व बदलांचा आनंद आपण दरवर्षी लुटू शकतो. कारण आपल्या हिंदू धर्मातील परंपरेनुसार आपण प्रत्येक ऋतूत वेगवेगळे सण साजरे करतो. या सर्व सणांमागे काही खास उद्देश आहेत. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, दसरा, दिवाळी, संक्रांत... यासारखे अनेक सण आपल्या या खंडप्राय देशात थोड्याफार फरकाने साजरे केले जातात. 'होळी' किंवा 'हुताशनी' पौर्णिमा हाही यातला एक अतिशय महत्त्वाचा. आम्हा मुलांचा आवडता सण आहे.

वसंतऋतूच्या आगमनाची चाहूल देणाऱ्या कोकिळा गात असतात. झाडांना नवी पालवी फुटलेली असते. तेव्हाच नेमका हा सण येतो. फाल्गुन महिन्याची पौर्णिमा हाच होळीचा दिवस. या दिवशी होळी पेटवून हा सण साजरा केला जातो. लहान मुले, तरुण हे सारेच या सणाची तयारी करून ठेवतात. घरोघरी जाऊन गोळा केलेल्या लाकडांचा, गोवऱ्यांचा मध्यभागी ढीग तयार केला जातो.

त्यातच मधोमध एरंड ठेवतात आणि होळी पेटवतात. मुले, गोर-गरीब सारे तोंडावर हात मारून बोंबा मारतात. होळीचा आनंद लुटतात.

या दिवशी घराघरांतून 'पुरणपोळी' केली जाते. पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून स्त्रिया मोठ्या भक्तीभावाने होळीची पूजाही करतात. बऱ्याच शहरांमध्ये लोकांना म्हणे आपले काही सण साजरे करायची लाज वाटते. पण खरं सांगू, आपण श्रद्धेने साजरा करतो म्हणूनच हा सण महत्त्वाचा आहे असं नाही; तर तो पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. शिवाय आपल्या संस्कृतीप्रमाणे आपण अग्नीची पूजा करणारे लोक आहोत. म्हणूनही मला त्याचे महत्त्व अधिक वाटते.

भारतात हा सण सर्वत्र साजरा केला जातो. 'होली आयी रे, होली आयी' असं म्हणत नाचत, गात लहान - मोठी, सारीच जण एकमेकांच्या अंगावर रंग उडवितात, चेहेरे रंगतात. तालासुरात नाचतात. समतेचे यापेक्षा वेगळे चित्र आणखी कुठे पाहायला मिळेल ?

अर्थात सर्वत्र साजरा केला जाणारा हा सण नेमका कधी सुरू झाला हे मात्र सांगणे कठीण आहे. असे म्हणतात की, हिरण्यकश्यपू नावाच्या एका नास्तिक राजाची होलिका नावाची बहीण होती. तिच्या साहाय्याने हिरण्यकश्यपूने भक्त प्रल्हादाला ठार मारायचे ठरवले. पण 'देव तारी त्याला कोण मारी' असं म्हणतात ना, अगदी तस्संच झालं. प्रल्हादाचा शेवट करायला म्हणून होलिका त्याला घेऊन अग्नीत शिरली. पण प्रल्हादाऐवजी अग्नीने तिलाच भस्मसात करून टाकले. अशा प्रकारे वाईटाचा, पापाचा कसा विनाश होतो, हे दाखविणारा हा सण आपल्या देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

●●●

# नाताळ

दिवाळीची चाहूल लागताच जशी आपल्याकडे घराघरातून धामधूम चालते तशी धावपळ 'नाताळ'जवळ येताच ख्रिस्ती बांधवाच्या घरीही सुरू होते. कारण 'नाताळ' हा त्यांचा सर्वांत महत्त्वाचा सण आहे.

नाताळचा हा सण मुळात वर्षाच्या शेवटी म्हणजे २५ डिसेंबर ते ६ जानेवारी पर्यंत साजरा केला जातो.येशू ख्रिस्ताचा जन्म २५ डिसेंबर रोजी झाला असल्याने, हा सण येशू ख्रिस्ताचा जन्मोत्सव या नात्यानेही साजरा केला जातो. साहजिकच चोवीस डिसेंबरची रात्र 'नाताळची रात्र' म्हणून साजरी केली जाते, नाताळच्या रात्री घरातील सर्व नातेवाईक एकत्र येऊन आनंदाने गाणी म्हणत, नाचत सगळी रात्र जागवतात. आनंदोत्सव साजरा करतात.

आपण दिवाळीची तयारी जशी फराळाचे पदार्थ तयार करून, आकाशदिवा लावून करतो. तशीच तयारी ख्रिस्ती बांधवही करतात. नाताळच्या निमित्ताने सर्वांच्या घरी छान सजावट केलेली असते. घराबाहेर सर्वांना नाताळच्या शुभेच्छा देणारी आकाश कंदिलाची चांदणी असते. घराघरांमध्ये नाताळवृक्षाची आकर्षक मांडणीही केली जाते. नाताळबाबा ऊर्फ मुलांचा संत - सांताक्लॉज हा नाताळच्या रात्री मुलांसाठी खाऊ व खेळणी घेऊन येतो आणि त्या नाताळवृक्षाला टांगलेल्या मोज्यात ठेवतो, अशी त्यांची कल्पना आहे. त्यामुळे मुलांच्या दृष्टीने 'नाताळबाबाची भेट' हेच सर्वात मोठे आकर्षण असते.

याच पद्धतीने प्रार्थना - मंदिरातही खूप छान सजावट केली जाते. येशूच्या जन्मोत्सवाची आठवण म्हणून तिथे काही दृश्ये मांडतात. त्यात एका गुहेमध्ये गवतावर बाल येशूची प्रतिमा असते. शेजारी माता मेरी असते. काहीजण तर घरातही अशाप्रकारची दृश्ये मांडतात.

अशा प्रकारे ख्रिस्ती बांधव नाताळ साजरा करतात. एकमेकांना शुभेच्छा कार्डे तसेच आकर्षक भेटी देऊन आपला आनंद व्यक्त करतात.

●●●

# रमजान ईद

इंद्रधनुष्य हे जसे वेगवेगळ्या रंगांचे एक सुंदर मिश्रण आहे. तसा आपला भारत देशसुद्धा वेगवेगळ्या धर्मांचे एक सुंदर मिश्रण आहे. त्यामुळेच इंद्रधनुष्यातील सारेच रंग जसे एकमेकांत मिसळून गेले आहेत, तसे आपल्या देशातील सर्व धर्मांचे नागरिकही एकमेकांच्या भिन्न चालीरिती, सण - परंपरा यांत भिन्नता असूनही, एकमेकांशी एकरूप झालेले आहेत. म्हणूनच एकमेकांचे महत्त्वाचे सण आपल्याकडे सर्वचजण मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

रमजान ईद हा असाच एक सण. खरेतर हा सण मुसलमानांचा एक मोठा सण आहे. पण सर्वचजण अलीकडे तो उत्साहाने साजरा करतात.

हा सण वर्षातून दोन वेळा येतो. त्यापैकी 'बकरीईद' म्हणजे मोठी ईद व 'रमझान ईद' म्हणजे लहान ईद, असे इस्लामधर्मीय मानतात. मुस्लीम वर्षाप्रमाणे जो नववा महिना येतो, त्या महिन्यात मुसलमान लोक तीस दिवसांचा उपवास करतात. यालाच 'रोजे' असे म्हणतात. हे उपवास करण्याने पापे जळून जातात अशी त्यांची धारणा आहे. चंद्रदर्शन हा उपवासाचा शेवटचा दिवस. याच्या बरोबर दुसऱ्या दिवशी 'रमझान ईद' हा सण साजरा केला जातो.

या दिवशी मुसलमान लोक नवीन कपडे घालून मशिदीत जाऊन प्रार्थना करतात.

मुख्य आचार्यांच्या उपदेशानंतर सर्वजण एकमेकांना आलिंगन देतात. शुभेच्छा देतात. त्यानंतर दहीभात व साखर यांचे जेवण घेतात. या दिवशी 'खीर' हे त्यांचे प्रमुख पक्वान्न असते.

अशा धार्मिक सणांच्या निमित्ताने सर्व लोक एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी परस्परांकडे जातात. आपापसातील भेदभाव विसरतात. मला वाटते लहान थोर, गोर - गरीब, हिंदू - मुस्लिम सर्वांनी एकत्र यावे. हाच या सणांमागील मूळ हेतू असला पाहिजे.

●●●

# चांगले संस्कार

श्रमदानाच्या निमित्ताने आम्हा मुलांना शाळेचे आवार स्वच्छ करायला सांगितले होते. शाळेच्या आवारातील दगड एका बाजूला करणे, नको असलेले गवत काढून टाकणे, एकत्र केलेला कचरा भरून टाकणे, ही सारी कामे आम्हा मुलांना वाटून दिलेली होती. आम्ही गुरूजींच्या सूचनेप्रमाणे ती कामे करीत होतो. माझ्या गटाला कचरा गोळा करून आवाराच्या पूर्वेला जी कचरापेटी आहे, तिकडे नेऊन टाकण्याचे काम दिले होते. कचरा भरता भरता आमच्या आपापसात गप्पागोष्टीही चालू होत्या. एवढ्यात मातीच्या ढिगाऱ्यात काहीतरी चमकते आहे असे मला वाटले. लक्षपूर्वक पाहिले तर ती 'सोन्याची रिंग' होती. कोणाच्या तरी कानातून ती बहुधा पडली असावी. म्हणून ती मिळताच आम्ही चौघेही समाजसेवेच्या गुरूजींकडे गेलो. आमचा प्रामाणिकपणा बघून त्यांनी आमचे कौतुक केले. शिवाय ते म्हणाले, ''याचे सारे श्रेय तुमच्यावर चांगले संस्कार करणाऱ्या आई -वडिलांकडे जाते.''

खरंच, चांगले संस्कार ही जीवनात आपणाला पावलोपावली उपयोगी पडणारी शिदोरी होय. अर्थात हे संस्कार काही कुठे, हवे तेव्हा, हवे तितके खरेदी करता येत नाहीत; तर ते लहानपणीच व्हावे लागतात. कारण बालपण हे मुळात अतिशय संस्कारक्षम वय असतं. मोठ्याचं अनुकरण करण्याचं वय असतं. त्यामुळे ज्या घरातील वडील माणसे एकमेकांशी हसत - खेळत बोलतात, एकमेकांचा मान राखतात, नीटनेटकी राहातात; त्या घरातील मुलेही तशीच शिस्तप्रिय, प्रेमळ व व्यवस्थित होतात. याउलट ज्या घरात नेहेमी आदळ - आपट, रुसणे, भांडणे, वादावादी होते; त्या घरातील मुलेही तशीच होतात. त्यांच्या नकळत त्यांना त्या सवयी जडतात. मोठेपणी अशी माणसे चांगलं काहीच करू शकत नाहीत. कारण चांगल्या आचारांचा, विचारांचा ठेवा त्यांना त्यांच्या माता - पित्यांकडून, भावा -बहिणींकडून, शिक्षकांकडून मिळालेला नसतो.

म्हणूनच चांगले संस्कार हे लहान वयात झाले पाहिजेत. उत्तम नागरिक घडविण्याची क्षमता या संस्कारांमध्ये आहे. म्हणून तर कवी मोरोपंत म्हणतात,

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो।
कलंक मतिचा झडो।
वियोग घडता रडो। मन भवच्चरित्री जडो।।

शाखा.
विभाग.
वा. क्र. २८०७९
दिनांक ३/३/०७
विषय

# सहकाराचे महत्व

रावणानेच सीतेला पळवून लंकेस नेऊन ठेवले आहे, हे समजताच प्रभू श्रीरामचंद्र आणि हनुमान, सारी वानरसेना - लंकेकडे जायला तयार झाले. पण मध्ये प्रचंड समुद्र पसरला होता. प्रश्न होता हा सागर तरून जायचे कसे? पण बघता बघता सारी वानरसेना सेतू बांधायला तयार झाली आणि प्रचंड अंतराच्या त्या सागरावर 'सेतू बांधारे सागरी, सेतू बांधा रे' असं म्हणत हसत खेळत त्या वानरसेनेने 'सेतू' बांधला सुद्धा. रामायणातील ही गोष्ट खरी आहे की नाही मला माहीत नाही पण या गोष्टीचे तात्पर्य निश्चितच खरे आहे आणि ते म्हणजे "सहकार हा एक महत्त्वाचा मूलमंत्र आहे. तो जोपासल्यास आपणाला असाध्य गोष्टीही सहज साध्य करता येतील." आपल्या मनातील सारे बेत प्रत्यक्षात पार पाडता येतील. त्यामुळे प्रत्येकाने हा सहकाराचा धर्म आचरणात आणला पाहिजे.

या सहकारी तत्त्वावर मावळे एकत्र आले, म्हणून तर शिवाजी राजांना बलाढ्य शत्रूला नमवता आले. हेच जनतेचे सहकार्य आपणाला ब्रिटिशांची हकालपट्टी करायला उपयोगी पडले.म्हणून तर आजच्या युगात सहकारी चळवळीची वाढ मोठ्या प्रमाणावर होत आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी भांडारे, सहकारी गृहनिर्माण संस्था -ही सारी अलीकडच्या काळात सहकाराचा मूलमंत्र राबविणाऱ्या संस्थांचीच नावे आहेत.

आता प्रश्न असा येईल की सहकाराचा धर्म आचरणात आणायचा म्हणजे नेमके काय करायचे? उत्तर अगदी सोपे आहे, ज्यांचा उद्देश समान आहे, अशा वेगवेगळ्या लोकांनी एकत्र यायचे. प्रत्येकाची जबाबदारी, प्रत्येकाची भूमिका ठरवायची. आणि सर्वांच्या हितासाठी म्हणून प्रामाणिकपणे ती संस्था चालवायची होणारा लाभ किंवा नुकसान यांतही प्रत्येकाचा वाटा आहेच. त्यामुळेच तर सर्वांचे हित राखले जाईल. नाहीतरी भातुकलीच्या खेळात असो किंवा क्रिकेटच्या सामन्यात याच तत्त्वावर आपण समूहबळाने आपली कामगिरी पार पाडतो ना. मग जे लहानपणी अवलंबिले. तेच तंत्र मोठेपणीही स्वीकारायचे, म्हणजे प्रगतीचा टप्पा फार दूर राहाणार नाही.

●●●

# खेळ - एक महत्त्वाची गरज

**"चला मुलांनो या, सुट्टी झाली या,**
**नदीकाठी खेळण्याला दौडत दौडत या!"**

लहानपणी आजीच्या तोंडून या ओळी ऐकल्या, त्यातल्या शब्दांचा अर्थ कळण्याआधीपासून आम्हा मुलांना खेळायला खूप आवडते. अन्न, वस्त्र, निवारा या तीन गरजांइतकीच, खेळ हीसुद्धा जीवनातील महत्त्वाची एक गरज आहे असे माझे ठाम मत आहे.

खेळांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे खेळामुळे होणारे मनोरंजन, मनाला मिळणारा आनंद. खेळ खेळणारी व्यक्ती लहान - असो किंवा मोठी, गरीब असो किंवा श्रीमंत, खेळ खेळताना प्रत्येकाच्या मनाची मरगळ निघून जाते. आळस दूर पळून जातो. शरीर आणि मन दोन्हीही ताजेतवाने होते. अर्थात हे सर्व फायदे खेळ खेळणाऱ्यालाच मिळतात असं नाही; तर खेळ बघणाऱ्यालाही मनाचा उत्साह मिळवून देण्याची क्षमता खेळांमध्ये नक्कीच आहे. म्हणून तर क्रिकेटचे, हॉकीचे, फुटबॉलचे सामने एवढे रंगताना आपणाला दिसून येतात.

खेळांचा -मग ते वैयक्तिक असोत किंवा सांघिक, त्यांचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यामुळे मजबूत होणारे शरीर. सतत किंवा नियमित खेळ खेळणाऱ्यांचा नियमित व्यायाम होत जातो. त्यांना भूकही छान लागते. शिस्त, सहकार्य, खिलाडू वृत्ती यांसारखे गुणही खेळात भाग घेण्यानेच वाढीस लागतात.

आजकाल तर काही खेळांडूंना, काही खेळांना इतके प्रचंड मानधन दिले जाते. की खेळ हाच त्यांचा व्यवसाय बनला आहे. राज्याराज्यांमध्ये किंवा वेगवेगळ्या देशांमध्ये घेतल्या जाणाऱ्या स्पर्धांना खूप वाईट स्वरूप प्राप्त झाले आहे, असेही काहीजण म्हणतात. पण या खेळांच्या निमित्ताने हे लोक एकत्र येतात, त्यांच्या आचार -विचारांचा परिचय करून घेतात, हे काय कमी महत्त्वाचे आहे?

खेळांचे हे महत्त्व जाणूनच यमुनेकाठी भगवान श्रीकृष्णाने गोपक्रीडा केल्या. पूर्वीच्या बायका नागपंचमी व मंगळागौरीच्या निमित्ताने झिम्मा -फुगडी खेळल्या. आज खेळ कदाचित वेगळे असतील, पण खेळांचे महत्त्व मात्र तेच आणि तसेच टिकून आहे, म्हणून तर म्हणावेसे वाटते, "चला मुलांनो या, सुट्टी झाली या.

●●●

# बचतीचे महत्त्व

अगदी अचानक पाहुणे येऊन टपले तेव्हा बाबा थोडेसे घाबरूनच गेले. आईला हळूच म्हणाले, "अगं, हा महिन्यातला शेवटचा आठवडा" तशी आई पटकन म्हणाली, "अहो, घाबरू नका माझी गृहलक्ष्मी बँक आहे ना!" असं म्हणून कधी हिंगाच्या रिकाम्या डबीत, तर कधी धान्याच्या डब्यात तिने बाजूला करून ठेवलेले पैसे तिने बाबांच्या हाती दिले. तसे पटकन खूश होऊन बाबा म्हणाले, "अरे वा, 'थेंबे थेंबे तळे साचे' ही म्हण सार्थ करून दाखविलीस हं तू आज."

खरंच, वरील म्हणीप्रमाणे आपणसुद्धा आपणाला मिळणारा सर्व पैसा एकदम खर्च करून टाकण्याऐवजी थोडा थोडा संचय करीत गेलो तर किती छान होईल नाही? एकतर पैशाचा नियमित संचय करण्याने, बचत करण्याने जेव्हा नेमका तो हवाय तेव्हा तो आपणाला सहज मिळू शकेल. अचानक येणारे आजार, ताई - दादाचं शिक्षण, कुणाचं लग्न, आपल्या शाळेच्या सहली - कित्ती प्रसंग असे असतात, की अचानक आपणाला नेहेमीपेक्षा जास्त पैशांची गरज असते. वेळेवर ते मिळू शकले नाहीत तर अनेकदा आपण अडचणीत तरी येतो किंवा छोटासा सहलीचा आनंदही आपण लुटू शकत नाही.

पण याउलट नियमित बचत केलेली असेल तर हे पैसे हव्या त्या वेळी, हव्या त्या कारणासाठी वापरता येतात. शिवाय नियमित शिल्लक टाकावयाची एकदा सवय लागली, की त्यांचा दुरुपयोगही आपण टाळू शकतो. बाबा म्हणतात, "हेचं पैसे दरमहा बँकेत नेऊन ठेवावेत; म्हणजे आपल्याला व्याजही मिळते. शिवाय पैसेही सुरक्षित राहतात." आहे की नाही गंमत.

माझी आई तर म्हणते, बचत करण्याची सवय ही एक अतिशय चांगली सवय आहे. आणि ही बचत फक्त पैशाचीच करणे फायद्याचे आहे असे नाही. आजच्या जगात वेळही तितकाच महत्त्वाचा आहे. आपली शक्तीही तितकीच महत्त्वाची आहे. आपल्याजवळ असणारे धनधान्यही तितकेच महत्त्वाचे आहे. या सर्वच गोष्टींची नियमित बचत आपण केली पाहिजे. त्यामुळेच आपण पैशाचा, वेळेचा, शक्तीचा दुरुपयोग टाळू शकू.

•

•••

# एकीचे बळ

हाताची बोटे जरी पाच असली तरी तो स्वतंत्रपणे कुणालाच फारसा विरोध करू शकत नाही. पण आकाराने लहान - मोठ्या असणाऱ्या या बोटांची मूठ वळली की मात्र आपणावर कुणी हल्ला केल्यास आपण त्याला चोख उत्तर देऊ शकतो. याचे कारण एकजूट करण्याने आपली ताकद वाढू शकते. आपण अनेक असाध्य गोष्टी एकीच्या बळावरच साध्य करू शकतो.

साधे मधमाशांचे उदाहरण घ्या, त्यांनी सतत कष्ट करून गोळा केलेला मध काढून घ्यायला कुणी त्यांच्याजवळ गेला रे गेला, की त्या सगळ्या मिळून त्याच्यावर हल्ला करतात. कडकडून चावा घेतात आणि त्यांच्या गोड संपत्तीचे रक्षण करतात.

अहो, त्यांच्यासारखेच आपण एक झालो, म्हणून तर आपल्या देशातून आपण इंग्रजांना हाकलून देऊ शकलो, दीडशे वर्षे जुलमी राज्य करणाऱ्या इंग्रजांच्या ताब्यातून आपली भारता माता आपल्या नेत्यांनी मुक्त केली, ती एकजुटीच्या जोरावरच. या एकीच्या बळाचा वापर करूनच आपण आजवर अनेक लढाया जिंकलो आहोत. याचा अर्थ असा मात्र नक्कीच नाही की केवळ युद्धाच्या वेळीच आपण एक झाले पाहिजे.

आपला देश हा अनेक जाती - धर्मांचा, वेगवेगळ्या रूढी - परंपराचा आहे. पण म्हणून जाती धर्मानुसार आपण एक वेळ रूढी परंपराचे पालन वेगवेगळ्या पद्धतीचे केले तरी चालेल पण म्हणून आपण परस्परांत भांडणे निर्माण करता कामा नये. एकत्र येऊन, गुण्या गोविंदाने अनेक वेळा आपण अनेक कामे पूर्ण केली पाहिजेत. याउलट आपण परस्परांत भांडत बसलो तर सतत आपल्या देशात अशांतता निर्माण होईल. पुन्हा कोणीतरी येऊन 'दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ' या म्हणीप्रमाणे स्वत:चा फायदा करून घेईल. आपल्यावर राज्य करेल तसे होऊ नये म्हणूनच आपण सारे एक आहोत, एक दिलाने, एकजुटीने काम करू या' असे म्हणत आपण आनंदाने राहिले पाहिजे.

एक काठी कुणीही सहज तोडू किंवा मोडू शकतो. पण या काठ्यांची एकदा मोळी तयार केली की मात्र ती मोडणे अशक्य होते. याचे कारण 'एकीचे बळ' हे नेहेमीच प्रचंड असते. माझी आजी काय म्हणते माहीत आहे?'' पोरांनो, तुमच्या श्रीकृष्णाने करंगळीवर तो गोवर्धन पर्वत उचलला हे खराय, पण त्याला सगळ्या गोप - गोपिकांनी हातभार लावला म्हणूनच त्यांना स्वत:चे रक्षण करता आले. संकटाला सामोरे जाता आले.''

●●●

# शिस्तीची आवश्यकता

आमच्या शाळेचा पंचविसावा वाढदिवस म्हणून यावर्षी अनेक कार्यक्रम शाळेत साजरे केले गेले. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणूनच आम्हाला जादूचे कार्यक्रम दाखवले गेले. तेही चक्क अडीच तास आणि संध्याकाळच्या वेळी, मध्येच चक्क पंधरा मिनिटे वीजही गेली. प्रथम आम्ही थोडे घाबरलो, कुणीकुणी तर भितीने पळायचा प्रयत्न करू लागले. पण आमच्या मुख्याध्यापकांनी मुलांना थोडं समजावून सांगताच, सगळी मुले शांत झाली. वीज आल्यानंतर जादूगार श्रीनाथने आम्हा मुलांचे, आम्हाला शिस्तीत वागायला शिकवणाऱ्या सर्व गुरुजींचे खूपच कौतुक केले. शिवाय खूश होऊन जादूचे कार्यक्रम चक्क आणखी अर्धा तास दाखवले.

अर्थात ही शिस्त केवळ शाळेतल्या मुलांनीच पाळायची गोष्ट आहे असे मात्र नाही. कारण शिस्त ही गोष्टच अशी आहे की तिचे पालन करण्याने आपल्याला सहज यश मिळविता येते. आपल्या कोणत्याही कार्यक्रमात किंवा कामात नीटनेटकेपणा येतो, कामाला लागणारा वेळही वाचू शकतो.

पण बऱ्याचदा मोठी माणसे बेशिस्तपणे वागतात. वाचलेले पेपर कुठेही, कसेही फेकणे, भेळ किंवा आइस्क्रीम खाऊन झाल्यानंतर कागदाचे कपटे बागेत किंवा तळ्याकाठी कुठेही फेकणे, गर्दीच्या वेळी रांगेत उभे न राहता धक्काबुक्की करून गाडीत चढणे. अशा अनेक वाईट सवयी नकळत मोठ्या माणसांच्या वागण्यातून आपल्याला दिसून येतात. त्यामुळेच त्यांना सहजपणे कोणतेच काम करता येत नाही.

याउलट आमच्या शाळेत आम्ही केवळ कवायत करतानाच नव्हे तर भूगोलाच्या दालनात किंवा प्रयोगशाळेत ही सतत शिस्तीचे पालन करतो. त्यामुळे धक्काबुक्की होऊन कुणालाही कसलाही त्रास होत नाही. शिवाय प्रत्येक वस्तू जिथून घेतली तिथेच ठेवण्याची आम्ही सारेच काळजी घेतो. त्यामुळे आमची प्रयोगशाळा, ग्रंथालय सारे काही स्वच्छ रहाते. हवी ती वस्तू जेव्हा गरज असेल तेव्हा सहजपणे मिळू शकते.

म्हणूनच या शिस्तीचे पालन लहान मुलांप्रमाणे, सैनिकांप्रमाणे साऱ्यांनीच केलं पाहिजे; तरच आपल्या देशाची प्रगती होऊ शकेल.

●●●

## ग्रंथ हेच गुरू

जीवनात पदोपदी आपल्याला शिक्षकांच्या शिकवणुकीची खरी गरज भासते. कारण अत्यंत बिकट वाटेतूनही वाटचाल कशी करायची ह्याचे खरे शिक्षण तेच आपणाला देतात. या सर्व वाटचालीत आपणाला सतत ज्ञानदान करणारे गुरू शिक्षक म्हणजे ग्रंथ होय. म्हणूनच ग्रंथ हे सर्वश्रेष्ठ गुरू म्हणून ओळखले जातात.

हे ग्रंथरूपी गुरू ग्रंथालयात सतत उपलब्ध असतात. ऐतिहासिक पुस्तकांच्या रूपाने ते आपणाला आपल्या भूतकाळाचे दर्शन घडवितात.

कथा - काव्य - ओव्या - अभंग यातून आपल्या संस्कृतीची ओळख आपणाला करून देतात. भूगोलाच्या रूपाने जगाची, जगातल्या वेगवेगळ्या प्रदेशांची माहिती करून देतात. तर विज्ञानाच्या रूपाने जगाचा विकास कसा झाला आहे हेही सोप्या भाषेत समजावून सांगतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सारे करताना ते कधीही थकत नाहीत, रागावत नाहीत. आपणाला मार्गदर्शन करताना कोणत्याही मोबदल्याची त्यांची अपेक्षा नसते. शिवाय विद्यार्थी - मग तो लहान असो वा मोठा, गरीब असो किंवा श्रीमंत, हिंदू असो वा मुस्लिम .... कोणताही भेदभाव न करता ते ज्ञान द्यायला सतत तयार असतात. म्हणूनच ग्रंथाना श्रेष्ठ गुरू मानले आहे.

●●●

## प्रयत्नान्ती परमेश्वर

युद्धात पराभव झाल्याने एक राजा जंगलातील एका गुहेत लपून बसला होता. अतिशय निराश होऊन तो गुहेत बसला असताना त्याला एक कोळी दिसला. स्वत:च विणलेल्या जाळ्यात चढायचा तो प्रयत्न करीत होता. पण जसा जसा तो वर चढायचा प्रयत्न करीत होता, तसा तसा तो पुन्हा पुन्हा खाली पडत होता. असे पाच-सहा वेळा झाले. तरीही कोळी - किड्याने माघार घेतली नाही. तो प्रयत्न करीतच राहिला. शेवटी एकदाचा तो वर चढण्यात यशस्वी झाला. हे बघून पराभूत झालेल्या राजाला कळून चुकले की आपणही पराभवाने खचून जाता कामा नये. कारण "प्रयत्नांतीच परमेश्वर प्राप्ती म्हणजे यशप्राप्ती शक्य."

अर्थात प्रयत्न मग ते कोणत्याही कारणासाठी केले जावोत. आपला उद्देश लवकर साध्य व्हावा असे प्रत्येकालाच वाटत असते. पण अनेक वेळा प्रयत्न

करूनही वाट्याला अपयशच येते. पण म्हणून अपयशाने खचून जाता कामा नये. कारण प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास कठीण कातळ फोडून स्वच्छ पाणी पुरविणाऱ्या विहिरींची निर्मिती करता येते. प्रचंड डोंगरातून सुंदर नागमोडी घाट तयार करता येतात. खोल खाणीतील खनिजे, खनिज तेले मिळविता येतात. या प्रयत्नांची कास धरूनच शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. टिळक, गांधीजी सारख्या महान नेत्यांनी पारतंत्र्यातून भारतमातेची मुक्तता केली. म्हणूनच आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे.

●●●

## *केल्याने देशाटन*

मनुष्यप्राणी हा सतत नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करीत असतो. अर्थात शिक्षण जरी आपणास विद्यामंदिरातून घेता येत असले, तरीही आपल्या अंवतीभोवतीच्या जगाकडून आपणाला खूप काही शिकता येते. आपल्या आजूबाजूच्या प्रदेशात असणारे लोक, त्यांची भाषा, त्यांच्या चालीरीती, तेथील पर्यावरण यांची आपणाला ओळख करून घ्यायची असेल तर संतत प्रवास केला पाहिजे. प्रवासामुळेच आपणाला नित्य नव्या गोष्टींची माहिती मिळते. म्हणून तर म्हटले जाते, "केल्याने देशाटन, मनुजा चातुर्य येतसे फार."

आपल्या आयुष्याला योग्य दिशा दाखवणाऱ्या सर्वच थोर संत महात्म्यांनी सुद्धा प्रचंड प्रवास केला, त्याचमुळे लोकांच्या चालीरीतींची, धर्मविषयक कल्पनांची त्यांना नेमकी माहिती मिळविता आली. तिच्याच आधारे त्यांनी लोकांना साध्या सोप्या भाषेत लोकशिक्षण दिले. आजकाल तर प्रवासी कंपन्यांच्या मदतीने देशाच्या कानाकोपऱ्यातून सतत हिंडून यायचे लोकांना वेडच लागले आहे पण याच गोष्टींमुळे त्यांना आपल्या देशाची किनारपट्टी, समृद्ध फळबागा, उत्कृष्ट कोरीव लेणी, पुरातन देवळे, ऐतिहासिक स्थळे यांच्याविषयी भरपूर माहिती मिळते. आणि म्हणूनच म्हटले आहे की देशाटनाने 'मनुजा चातुर्य येतसे फार.'

●●●

## *कठिण समय येता कोण कामास येतो*

आपले सारे आप्त, बांधव, मित्र आणि हितचिंतक हे नेहेमी सुखाचे सोबती असतात. 'असतील शिते तर जमतील भुते' या म्हणीप्रमाणे जोपर्यंत आपणाजवळ धनधान्य, संपत्ती आहे तोपर्यंतच सर्वजण आपली विचारपूस करतात. आपल्या

आयुष्यातील आनंदाच्या सुखाच्या प्रसंगी ते हजर राहतात. पण ह्या उलट परिस्थिती येते, जेव्हा खरंच आपणाला कोणाची तरी गरज भासते, तेव्हा मात्र कोणीही आपल्याला मदत करीत नाही. जेव्हा आपण खूप अडचणीत किंवा संकटात सापडतो. तेव्हा कोणी आपल्याजवळ फिरकत सुद्धा नाही. थोड्या फार फरकाने हा अनुभव प्रत्येकालाच येतो.

रामायणाची निर्मिती करणाऱ्या वाल्मीकींना हा पेच पडला होताच. मुलाबाळांसाठी, बायकोसाठी लूटमारी करणाऱ्या ह्या वाल्या कोळ्याची लूट सारेजण आनंदाने स्वीकारतात. पण त्याच्या पापात सहभागी व्हायला मात्र कुणीही तयार होत नाही. म्हणजे सारे सोबती हे केवळ सुखाचे सोबती असतात. आपण अडचणीत सापडलो की सारी नाती खोटी ठरतात. आयुष्यातले हेच कटू सत्य रघुनाथ पंडित यांनी अतिशय छान शब्दात सांगितले आहे "कठिण समय येता कोण कामास येतो."

●●●

## जे का रंजले गांजले

आपल्या हिंदू धर्मात देवपूजेला खूप महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. अर्थात वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या जातीचे लोक देवाची पूजा अगदी मनोभावे करतात. देवासाठी व्रते करतात, उपास करतात. हवा तेवढा वेळ, पैसा खर्च करून ईश्वरसेवा करायचा प्रयत्न करतात. पण साधुसंताचे मात्र असे नसते. ते 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' मानतात. दीन - दुबळ्यांची सेवा हाच खरा धर्म मानतात. दगडाच्या देवाची पूजा करण्याऐवजी ते आपल्याजवळील वेळ, पैसा गरजू लोकांची सेवा करण्याकरिता वापरतात. भुकेल्याला अन्न व तहानलेल्याला पाणी मिळावे म्हणून ते प्रयत्न करतात. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, "जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा !"

त्यांच्या मते तोच खरा साधू, जो दीन - दुबळे, दलित, अपंग, कुष्ठरोगी यांची सेवा करतो. त्यांचा आधारस्तंभ होतो. आणि म्हणून संत एकनाथ, महात्मा गांधी, बाबा आमटे हे खरेखुरे साधू, सत्पुरुष होत.

●●●

## जया अंगी मोठेपण

'सोने' म्हणजे सर्व धातूंचा राजा. पण आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी त्यालाही अग्निदिव्य करावेच लागते. ज्या मूर्तीची देव म्हणून आपण पूजा करतो, त्या देवानेही देवपण येण्याआधी टाकीचे घाव सोसलेले असतात. याचप्रमाणे माणसालाही मोठेपण मिळविताना, कोणतेही एखादे पद मिळवताना किंवा ध्येय गाठताना खूप कष्ट करावे लागतात. वेळप्रसंगी अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागतात अनेक अडचणींना तोंड द्यावेच लागते. तेव्हाच त्यांना मोठेपण मिळते. म्हणूनच म्हणतात, "जया अंगी मोठेपण; तया यातना कठीण."

स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र झगडणाऱ्या महात्मा फुल्यांना, सावित्रीबाई फुल्यांना अनेक प्रकारच्या निंदेला, हालअपेष्टांना सामोरे जावे लागले. तर वर्षांनुवर्षे अस्पृश्यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी झगडणाऱ्या डॉ. आंबेडकरांना सुद्धा धर्मवेड्या दांभिक समाजाशी सतत लढा द्यावा लागला. तर वयाच्या १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरीसारख्या महान ग्रंथाची निर्मिती करणाऱ्या संत ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या भावंडांना, समाजाने वाळीत टाकले. संत तुकारामाचे अभंग तर इंद्रायणीत बुडविले गेले. ह्या साऱ्या संतानी, नेत्यांनी अनेक अडचणीतून, हालअपेष्टांतूनही त्यांचे वेगळेपण सिद्ध केलेच. शिवाय माघार न घेता आपले ध्येयही पूर्ण केले. तेव्हाच त्यांना श्रेष्ठत्व प्राप्त झाले आणि म्हणूनच म्हणतात "जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण."

●●●

## उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी

आळस हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. हा आळस झटकून सतत काम केल्यानेच आपण भरपूर धनधान्य, संपत्ती, समृद्धी मिळवू शकतो. एवढीशी मधमाशी पण सकाळी उठल्यापासून सतत या फुलावरून त्या फुलावर मधाचा शोध घेत फिरत राहते. म्हणूनच मधाचा भरपूर साठा करणे तिला शक्य होते. शेतकऱ्याचे सुद्धा तसेच आहे. आपणा सर्वांना अन्नधान्य पुरविणारा हा शेतकरी देखील ऊन - पावसाची पर्वा न करता शेतात सतत राबतो. तेव्हाच त्याला भरघोस पिके घेता येतात. कापसापासून तलम वस्त्रे विणणारा विणकर काय किंवा मातीच्या गोळ्याला आकार देऊन कलाकुसरीची मातीची भांडी तयार करणारा कुंभार काय ? हे सारे कारागीर सतत घाम गाळून श्रमदेवाची पूजा करतात. म्हणूनच त्यांना हव्या त्या वस्तूंची निर्मिती करता येते. त्या वस्तू विकून भरपूर संपत्ती मिळवता येते. जगातील

सर्व श्रीमंत देश हे मुळात उद्योगाची, श्रमाची, प्रयत्नांची कास धरूनच मोठे झाले आहेत. मग आपला भारत देश तर नद्या, समुद्र, खाणी, जंगले... या सर्व निसर्गाच्या अनमोल देणग्यांनी नटलेला देश आहे. हा देश आणखी संपन्न करावयाचा असेल तर आपण सतत उद्योगी राहिले पाहिजे. भरपूर कष्ट केले पाहिजेत.

●●●

## वृक्षवल्ली आम्ही सोयरे.....

आपल्या अंवतीभोवतीचा निसर्ग हा सतत आपल्यावर उपकार करीत असतो. जलाशय, जंगले, खाणी ह्या सगळ्या रूपांतून निसर्ग आपल्याला सतत काही ना काही देत असतो. वृक्षवेली तर आपल्याला जितके देता येईल तितके देण्याचा प्रयत्न करतात. झाडे स्वत: उन्हात उभी राहतात. पण आपणाला मात्र सावली देतात; आपली फुले आणि फळे इतरांना देण्यासाठीच म्हणून त्यांनी धारण केलेली असतात. यातील कित्येक झाडे - वेली अशा प्रकारच्या आहेत की त्यांच्या फळाफुलांचा औषध म्हणून उपयोग होतो. कित्येक झाडांची फळे जीवनसत्त्वे पुरविणारी आहेत. या झाडांचे खोड, फांद्या यांचा उपयोग इंधन म्हणून होतो. तर झाडांचे संवर्धन जमिनीची धूप थांबविते. थोडक्यात या वृक्षवेलींच्या मुळापासून फळांपर्यंत प्रत्येक गोष्ट वेळोवेळी आपल्याला उपयोगी पडत असल्याने त्यांनाच आजच्या जगात 'आपले सोयरे' आपले आप्त म्हणून ओळखले पाहिजे. कारण इतकं सारं काही देऊनही ही वनराजी आपल्याकडून मात्र काहीही मागत नाही म्हणूनच म्हणतात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे.'

●●●

## कथालेखन

# मुद्यावरून गोष्ट

एक शेतकरी — पाच मुलगे — आपापसात सतत भांडत — शेतकऱ्याने खूप समजावले. पण व्यर्थ — शेतकरी आजारी — मरण्यापूर्वी मुलांना बोलवितो — काठ्यांची एक मोळी — प्रत्येकाला मोडायला सांगतो — कुणालाच जमत नाही — थोड्या वेळाने मुलांना एकच काठी देतो — मुले सहज तोडू शकतात — मुलांना त्यांची चूक कळते.

### एकी हेच बळ

गणपत हा रांजणगावातला एक कष्टाळू पण सधन शेतकरी होता. दिवसरात्र कष्ट करून त्याने भरपूर धनधान्याची निर्मिती केली होती. रांजणगावातल्या श्रीमंत लोकांमध्ये त्याची नेहेमी गणना केली जायची. गावातील लोक मोठ्या कौतुकाने गणूदादाच्या शेतीचे सुंदर वर्णन करीत.

पण अशा या कष्टाळू शेतकऱ्याच्या आयुष्यात मात्र एक कमतरता होती. तसे त्याला राजा, सर्जा, संजू, विजू आणि जयंत अशी पाच मुलेही होती. ती सर्वच मुले दिसायला अतिशय छान होती. धष्टपुष्टही होती. पण ह्या सगळ्या मुलांमध्ये एक महत्त्वाचा दोष होता. तो म्हणजे ती सर्वचजण सतत आपापसात भांडत. बाब एखाद्या छोट्याशा संधीची असो किंवा खाण्यापिण्याची - प्रत्येक बाबतीत त्यांचे भांडण हे ठरलेलेच. विशेषत: वय झाल्याने गणूदादा आजकाल नेहेमीसारखे कामही करू शकत नसे. पण त्याचमुळे या पाचांपैकी कोणालाही एकाला काम सांगितले. तरीही यांचे आपले भांडण चालूच. एकही काम न करता ते सतत भांडत राहातात, हे पाहून गणूदादाला खूप वाईट वाटे.

उद्या आपले डोळे मिटल्यावरही हे जर असेच भांडत राहिले. तर कष्टाने, घामाने फुलविलेल्या आपल्या शेतीचे, संपत्तीचे काय होणार ? अशी त्याला सारखी काळजी वाटू लागली. विचार करता करता त्याला एक युक्ती सुचली.

त्याने आपल्या सर्व मुलांना जवळ बोलविले. त्यांना जवळ घेऊन तो म्हणाला, मुलांनो, माझे हातपाय थकले. मला साधी ही समोर काठ्यांची एक मोळी पडलीय ना, ती ही मोडता येत नाही. तुमच्यापैकी जर मला कुणी ही मोडून दाखवेल तर त्याला मी खूप मोठे बक्षीस द्यायला तयार आहे.

बक्षिसाची गोष्ट ऐकताच पुन्हा सर्वचजण आपापसात भांडू लागले. तसा गणूदादा जोरात ओरडला, "मूर्खांनो, भांडताय काय असे ? मी प्रत्येकाला संधी द्यायला तयार आहे. चल घे रे राजा ही मोळी आणि करून दाखव तिचे दोन तुकडे."
राजा हा सर्वात मोठा मुलगा. त्याने आनंदाने जुडी हातात घेतली. सर्व शक्ती पणाला लावून ती मोळी मोडायचा प्रयत्न करू लागला. पण खूप काठ्या एकत्र असल्यामुळे त्यालाच काय, कोणालाही हे काम करणे शक्य झाले नाही.

तसा गणूदादा स्वत:शी थोडासा हसला. त्याने ती मोळी सोडली. एकेक काठी प्रत्येकाच्या हाती देऊन त्यांना ती मोडायला सांगितली. मुलांनी एका क्षणात त्या काठ्या मोडून टाकल्या. तसा गणूदादा पटकन म्हणाला, "पाहिलंत ना, एक काठी मोडणं सोप आहे. पण अशा अनेक काठ्या एकत्र आणल्यावर त्यांचे तुकडे करणे कठीण आहे. याला कारण एकीचे बळ. तव्हा तुम्ही सुद्धा आपापसात न भांडता, न रागावता, एकमताने, सहकार्याने कामे कराल, तर तुमचे भले होईल."

●●●

एक गरूड आणि घुबड — नेहेमी भांडत — पण एकदा त्यांनी मैत्री करायचे ठरविले — एकमेकांची पिल्ले खाऊ नये, असेही ठरवले — माझी पिल्ले खूपच सुंदर — घुबडाचे हे बोलणे गरुडाने ऐकले — गरुडाला एके दिवशी कुरूप पिले सापडली — सर्वच खाऊन टाकली — घुबड खूप रागावले — गरुडाचे शांतपणे उत्तर — ही तुझ्या खोटे बोलण्याची शिक्षा.

## खोटे कधी बोलू नये

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. एका घनदाट जंगलात सर्वच लहानमोठे पशुपक्षी आनंदाने राहात होते. याच जंगलातल्या एका मोठ्या झाडाच्या ढोलीत एक घुबड राहात असे. आणि नेमक्या त्याच झाडावर एक सुंदर गरूड पक्षी येऊन बसत असे, या घुबडाचे आणि गरुडाचे आपापसात नेहेमी भांडण होत असे.

पण एके दिवशी अचानक गरुड घुबडाला म्हणाला, "मला वाटते आता आपण एकमेकाशी भांडायचे बंद केले पाहिजे. माणसे आजकाल सतत झाडे तोडतात त्यामुळे आपल्या जंगलातले सर्वचजण आता अडचणीत सापडले आहेत, तेव्हा आपणही एकमेकाशी न भांडता मैत्रीचा करार करू या. कबूल ?"

नाहीतरी या रोजच्या भांडणाचा घुबडालाही कंटाळाच आला होता. त्यामुळे ते पटकन म्हणाले, "ठीक आहे कबूल. पण माझी एक अट आहे. आपण एकमेकांचे मित्र झाल्यावर. आपण एकमेकांची पिल्ले खायची नाहीत. उलट ती

सुरक्षित राहातील याची काळजी घ्यायची. हे ऐकून गरूड म्हणाला, "मान्य, पण तुझी पिल्ले कशी असतात हे मला ठाऊक नाहीय. तेव्हा तू त्यांचे छानपैकी वर्णन कर पाहू."

घुबड म्हणाले, "सोप्पं आहे त्यांना ओळखणं. माझी पिल्लं खूप सुंदर आहेत. त्यांचे डोळे, चोच, पिसं सगळंच खूप सुंदर आहे. आता येईल ना तुला ओळखता ?" 'हो,' असं म्हणून गरूड उंच आकाशात उडून गेला. असेच काही दिवस गेले. आणि मग एके दिवशी जंगलातून फेरफटका मारत गरूड पुन्हा त्याच झाडावर येऊन बसला. भर दुपारची वेळ, त्याला खूप भूकही लागली होती. म्हणून त्याने झाडाच्या ढोलीचा शोध घ्यायला सुरुवात केली. तेव्हा त्या ढोलीत त्याला घुबडाची पिल्ले सापडली. ती खूपच कुरूप आणि घाणेरडी होती. गरुडाने विचार केला, ज्या अर्थी ही इतकी घाणेरडी पिल्ले आहेत त्याअर्थी नक्कीच ती घुबडाची नसणार, असे म्हणून त्याने ती सगळी पिल्ले खाऊन टाकली. समाधानाने तो ढेकर देत बाहेर आला. तोपर्यंत घुबडही तेथे आले. गरुडाला ढोलीतून बाहेर येताना पाहून घुबड घाबरले. त्याने ढोलीत जाऊन पाहिले तर एकही पिल्लू नाही. तेव्हा तो गरुडावर खूप खूप रागावला.

गरूड म्हणाला, "होय रे मी कबूल करतो, मी सगळी पिल्ले खाली. पण तू तर म्हणाला होतास तुझी पिल्ले खूप सुंदर आहेत. मग मला काय माहीत की ती कुरूप, घाणेरडी पिल्ले तुझी आहेत म्हणून. तू माझ्याशी खोटं बोललास ह्यात माझी काय चूक ?"

●●●

दोघे मित्र — रोज संध्याकाळी फिरायला जात — एके दिवशी फिरता फिरता वरून नारळ पडला — तो कोणी घ्यायचा — तिसरा माणूस — त्याला दोघेही कहाणी सांगतात — ऐकता ऐकता खोबरे फस्त — दोन करवंट्या दोघांच्या हाती.

## दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ

प्रभाकर आणि सुधाकर दोघे एकमेकांचे मित्र होते. रोज संध्याकाळी ते समुद्राकाठी फिरायला जात. गप्पागोष्टी करत आणि हसत खेळत परत येत. असेच एके दिवशी संध्याकाळी ते फिरत जात असताना एका नारळाच्या झाडावरून एक नारळ खाली पडला. अचानक आलेल्या त्या आवाजाने ते प्रथम घाबरले. पण मग समोर नारळ दिसताच दोघेही धावत गेले. दोघांनाही तो नारळ ताब्यात घ्यायचा होता

म्हणून ते परस्परांना ढकलू लागले. एकमेकांशी खूप वाद घालू लागले. एवढ्यात त्यांना समोरून एक अनोळखी माणूस येताना दिसला. त्याला पाहाताच दोघेही त्याच्याकडे धावत गेले. त्यांनी आपली सगळी कहाणी त्याला ऐकवली. पण पुन्हा नारळ कुणी घ्यायचा याबाबत त्यांची समजूत पटेना. त्यावर आपलाच कसा हक्क आहे, हे ते पुन्हा पुन्हा पटवून देऊ लागले.

ते बोलण्यात दंग आहेत हे पाहून त्या तिसऱ्या माणसाने प्रथम नारळ ताब्यात घेतला. जवळच्याच दगडावर तो फोडून तो त्यातील गोड पाणी प्याला. सर्व खोबरेही त्याने खाऊन टाकले. तो खोबरे संपवू लागला तसे प्रभाकरने विचारले. "तुम्ही हे काय करता आहात"? त्या दोघांच्याही हाती नारळाच्या करवंट्या देऊन तो म्हणाला. "या नारळावर तुम्हा दोघांचाही हक्क आहे. तसाच तुम्हाला उपदेश केल्याबद्दल माझाही, म्हणून तर मी नारळाचे तीन भाग केले. ह्या दोन करवंट्या तुम्हाला. आणि खोबरे अर्थात मला समजलं ?"

'समजलं.' दोघेही शांतपणे म्हणाले आणि घराकडे परतू लागले.

●●●

एक छान तळे — तळ्याकाठी झाडे, पशुपक्षी — झाडांवर पोपट — पाण्यात मुंगी पडते — पोपटाला मदतीची हाक — पोपटाला मदत करायचे वचन — पोपट पाण्यात पान टाकतो — मुंगीची सुटका — एक शिकारी — पोपटावर नेम — मुंगीचे लक्ष — मुंगी त्याला कडकडून चावते — शिकाऱ्याचा नेम चुकतो — पोपटाची सुटका.

## मुंगीची करामत

एक छोटेसे गाव होते. त्या गावाच्या पूर्वेला एक छान तळे होते. त्या तळ्याशेजारी मोठी डेरेदार झाडे होती. त्या झाडांवर रोज संध्याकाळी अनेक पक्षी येऊन बसत. विश्रांती घेत असत.

असाच एके दिवशी एक पोपट एका झाडावर येऊन बसला. गार वारा सुटला होता. त्यामुळे तो मजेत शीळ घालत होता. एवढ्यात त्याला कुणीतरी हाक मारीत आहे, हे त्याच्या लक्षात आले. त्याने नीट लक्ष देऊन पाहिले तर एक लहानशी मुंगी पाण्यात गटांगळ्या खात होती. आणि तिला पोहता येत नसल्याने अर्थातच ती घाबरून पोपटाकडे मदत मागत होती. पोपटाचे लक्ष जाताच ती म्हणाली, "पोपटदादा, जरा तुम्ही बसलात त्या झाडावरचे एक पान टाका बघू. अहो, मी या तळ्याकाठी खेळत होते. खेळता खेळता पाण्यात पडले. तुम्ही

पान टाकलंत तर त्याचा आधार घेऊन मी काठावर येऊ शकेन. तुम्ही माझ्यावर खरंच दया करा. माझा जीव वाचवा. मला संधी मिळेल तेव्हा मी ही तुम्हाला नक्कीच मदत करेन.''

पोपटाला तिच्या बोलण्याची गंमत वाटली. तो हसत हसत म्हणाला, उंच आकाशात भरारी घेणारा, झाडावर मजेत शीळ घालणार, पोपट आहे मी. मी कुठे आणि तू कुठे ? तू एवढीशी मुंगी, तू काय मला मदत करणार. पण थांब हं, हे पान मात्र मी तुझ्याजवळ टाकतो म्हणजे तुला हळूच वर येता येईल. आणि खरंच पोपटाने पान खाली टाकले. लगेचच मुंगी त्या पानावर बसून हळूच वर आली.

असेच काही दिवस गेले. नेहेमीप्रमाणे संध्याकाळी पोपट झाडावर बसला होता. मजेत शीळ घालत होता. मुंगीही तलावाकाठी खेळत होती. एवढ्यात तिला एक शिकारी दिसला. तो नेम धरून पोपटाला ठार करायच्या विचारात आहे हे, लक्षात येताच ती धावत धावत त्या माणसाजवळ गेली. भराभर त्याच्या अंगावर चढली. त्याच्या हातावरून ती पटकन त्याच्या कानाजवळ गेली. शिकाऱ्याचा नेम चुकावा म्हणून तिने त्याच्या कानाचा जोरात कडकडून चावा घेतला. साहजिकच शिकाऱ्याने नेम धरून गोळी झाडली. पण त्याचा नेम चुकला. गोळी भलतीकडेच गेली पण गोळीच्या आवाजाने झाडावरचा पोपट मात्र पटकन उडून गेला हे बघून त्या इवल्याशा मुंगीला खूपखूप आनंद वाटला.

●●●

बादशहाचा दरबार — जगात सर्वात प्रिय गोष्ट कोणती ? — प्रत्येकजण उत्तर देतो — बादशहा नाराज — बिरबलाचे उत्तर — सर्वात प्रिय आपला जीव — सर्वजण गोंधळतात — पाण्याच्या हौदात माकडीण व पिलू — पाणी वाढताच ती पिल्लाला वर घेते — पाणी आणखी वाढताच पिलावर उभी रहाते.

## सर्वात प्रिय गोष्ट

''या सर्व जगात मनुष्याला सर्वात जास्त काय आवडते, त्याला सर्वात जास्त काय प्रिय आहे. सांगा बघू ?'' बादशहाने विचारले. तसा दरबारातला प्रत्येक जण आपापल्या परीने उत्तर देऊ लागला. कोणी म्हणाले, आपली आई, कोणी म्हणाले आपली मुले, तर कुणी सांगितले, या जगात आपण सर्वांत जास्त प्रेम आपल्या देशावर करतो. अनेकांनी अनेक उत्तरे दिली. पण बादशहाचे समाधान काही झाले नाही. एवढ्यात बिरबल उठून उभा राहिला, म्हणाला, ''सरकार

या जगात माणसाचे सर्वात जास्त प्रेम हे स्वत:वरच असते. स्वत:चा जीवच त्याला सर्वात अधिक प्रिय आहे."

बिरबल मोठा हुशार, विद्वान आहे हे सर्वांना माहित होते. तरीही त्याचे आजचे उत्तर मात्र कोणालाच पटले नाही. अगदी बादशहाने सुद्धा विचारले, तुला खात्री आहे बिरबल. कारण आपली मुलेबाळे, संपत्ती, आई-वडील ह्या सर्वांपेक्षा आपले स्वत:वर जास्त प्रेम आहे हे तुझे म्हणणेच मला पटत नाही.

बिरबल म्हणाला, "सरकार आपण माझ्याबरोबर चौकात या. तिथे जो पाण्याचा हौद आहे ना, तिथे गेल्यावर मी तुम्हाला हे सिद्ध करून दाखवेन." त्याचे बोलणे ऐकून सर्व दरबारी, तसेच प्रत्यक्ष बादशहासुद्धा पाण्याच्या चौकाजवळ आले. बिरबलाने एका सेवकाकडून एक माकडीण व तिचे पिल्लू चौकातील हौदात सोडले. हौदात अगदी थोडेसे पाणी होते त्यात ते पिल्लू खेळत राहिले. बादशहा मात्र हे बघून रागावला, अरे माझ्या प्रश्नाचा या माकडिणीचा काय संबंध ?

'तेच दाखवतोय सरकार,' असे म्हणून बिरबलाने त्या हौदातले पाणी वाढवायला सांगितले. सेवक जसजसा पाणी वाढवत होता, तशी ती माकडीण पिल्लाला वाचवायचा प्रयत्न करत होती. प्रथम तिने त्याला कडेवर घेतले. मग खांद्यावर घेतले. पाणी जास्तच वाढू लागले तसे तिने त्याला डोक्यावर घेतले. पण पाण्याची पातळी अजूनही वाढतच होती. शेवटी तिच्या नाकातोंडात पाणी जाऊ लागले. तेव्हा मात्र तिने डोक्यावरचे पिल्लू पाण्यात आपल्या पायाखाली ठेवले. त्याच्यावर पाय देऊन ती उभी राहिली. अर्थात हे बघून सगळेच म्हणाले, "खरंच या जगात आपणाला सर्वात प्रिय आपला जीवच आहे."

●●●

एक तहानलेला कावळा – पाण्याचा खूप शोध घेतो - पाणी कुठेच नाही - भटक भटक भटकतो - एका घराच्या अंगणात हंडा - हंड्यात पाणी - चोचीने पिता येत नाही - एकेक खडा उचलून हंड्यात टाकतो - पाणी वर येते - कावळा पाणी पितो.

## चतुर कावळ्याची गोष्ट

कडक उन्हाळ्याचे दिवस होते ते. सारे कसे तापले हाते. त्यामुळे रस्त्यावर एक चिटपाखरूसुद्धा नव्हते. पण अशा कडक उन्हात एक कावळा मात्र पाण्याच्या शोधात खूप भटकत होता. तहानेने त्याच्या घशाला नुसती कोरड पडली होती. नद्या, विहिरी, तलाव कुठेही पाण्याचा थेंब म्हणून नव्हता. त्यात भर दुपारच्या

उन्हाचे चटके. त्यामुळे तर खूप थकल्यासारखे वाटत होते. तरीही बिचारा पाण्याच्या शोधात भटकतच होता. शेवटी अगदी कंटाळून तो एका झाडावर जाऊन बसला. पाणी नाही तर नाही, आता थोडीशी विश्रांती घ्यावी म्हणून तो डोळे मिटणार, एवढ्यात त्याला एका घराच्या अंगणात एक पाण्याचा हंडा दिसला. आता आपल्याला नक्की पाणी मिळणार या आशेने तशाही अवस्थेत कावळा त्या घरापर्यंत गेला. खरोखर त्या हंड्यात पाणीसुद्धा आहे हे बघून त्याला खूप आनंद वाटला. पण हाय ! पाणी तर खूप तळाशी होते. त्याने खूप खूप प्रयत्न केला तरी त्याला पाणी पिता येत नव्हते. त्यामुळे तर तो जास्तच हैराण झाला.

शेवटी त्याने थकून पुन्हा एका झाडाची फांदी पकडली. आता तर समोर पाणी असूनही आपण तहान भागवू शकत नाही, याचे त्याला खूप वाईट वाटत होते. एवढ्यात त्याला एक युक्ती सुचली. तो ज्या अंगणातल्या झाडावर बसला होता. तिथेच लहान लहान दगडांचा त्याला एक ढीग दिसला. त्याने त्यातला एक खडा उचलला, पाण्यात टाकला. त्यापाठोपाठ दुसरा, तिसरा. असे करता करता पाणी वर येऊ लागले. ते त्याला सहज पिता येईल इतके वर येईपर्यंत तो खडे टाकतच राहिला. शेवटी त्याच्या अपेक्षेप्रमाणे पाणी वर येताच, तो पाणी पिऊन समाधानी झाला. तहान भागल्याच्या आनंदात भुर्रकन उडून गेला.

●●●

श्री चक्रधरस्वामी - त्यांचे बरेच शिष्य - काहींना खूप गर्व - स्वामी एक रूपक कथा सांगतात - एका गावात हत्ती येतो -जात्यांध त्याचे वर्णन आपल्या आपल्या कल्पनेप्रमाणे करतात - एक डोळस येतो - जात्यांधांना त्याची चूक समजावून सांगतो - शिष्यांनाही धडा मिळतो.

## आंधळे आणि हत्ती

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. श्री चक्रधरस्वामींची शिकवण लोकांना जसजशी आवडत होती तशी त्यांच्या शिष्यांची संख्या हळूहळू वाढत गेली. पण त्यांचे काही जुने शिष्य होते, ते मात्र नव्या शिष्यांना नेहेमी टाकून बोलत. त्यांना स्वत:च्या मोठेपणाचा हळूहळू गर्व होऊ लागला होता. त्यामुळे स्वामींजीनी त्यांचे गर्वहरण करायचे ठरविले.

नेहेमीप्रमाणे संध्याकाळी स्वामीजींच्या भोवती त्यांचे सर्व शिष्य जमले होते. त्यांच्याकडे शांत,हसऱ्या चेहेऱ्याने बघत स्वामीजी म्हणाले, "आज मी तुम्हाला एका गावात घडलेली एक हकीकत सांगणार आहे." त्या गावात एकदा एक

हत्ती आला. ही बातमी समजताच मोठ्या उत्साहाने सारी मुले त्या हत्तीभोवती जमा झाली. त्याच गावात काही आंधळे होते. त्यांनाही मुलांची धावपळ कानावर येताच हत्ती बघण्याची खूप इच्छा झाली. पण बिचारे जन्मापासून आंधळे! ते तर हत्ती पाहूच शकत नव्हते.

पण शेवटी त्यांनी हाताने स्पर्श करून का होईना हत्ती कसा आहे हे पहायचे ठरवले. म्हणून तेही मुलांच्या घोळक्यात सामील झाले. हत्ती तर आकाराने मोठ्ठा. त्यामुळे त्यांच्या हातात काही तो मावेना. शिवाय हत्ती जाणून घ्यायचा त्या सर्वांनाच उत्साह होता त्यामुळे प्रत्येकाने एकाच वेळी हत्तीला स्पर्श करायचे ठरविले. तर प्रत्येकाच्या हातात फक्त एकेकच अवयव आला. तरीही हाती जो अवयव आला तोच चाचपडून ते हत्तीचे वर्णन आपापसात करू लागले.

ज्याच्या हाती हत्तीची सोंड आली तो म्हणाला "हत्ती मुसळासारखा आहे." ज्याने पायाला स्पर्श केला तो म्हणाला "हत्ती हा खांबासारखा आहे" ज्याने शेपूट पकडली तो म्हणाला, "हत्ती एखाद्या झाडूसारखा आहे." तर ज्याने कानाला स्पर्श केला तो म्हणाला हत्ती म्हणजे सुपासारखा आहे."…. अशा प्रकारे प्रत्येक जण आपापल्या परीने हत्तीचे वर्णन करू लागले. आपलेच म्हणणे बरोबर आहे असे समजून आपापसात वादही घालू लागले. त्यांचा हा गोंधळ चालू असतानाच एक डोळस माणूस तिथे आला. तो हसून त्यांना म्हणाला, "अरे वेड्यांनो, तुमच्यापैकी प्रत्येकजण बरोबर आहे. पण तुमच्यापैकी कुणालाही हत्तीचे बरोबर वर्णन मात्र करता आलेले नाही. कारण तुम्ही प्रत्येकजण ज्याचे वर्णन करीत आहात, तो केवळ हत्तीचा एकेक अवयव आहे. पूर्ण हत्ती नव्हे. तुम्ही सर्वांनी वर्णन केलेल्या सर्व अवयवांनी युक्त असा संपूर्ण हत्ती आहे."

त्याचे हे बोलणे ऐकताच सर्वच अंधांना आपली चूक समजली. तसेच स्वामीजींची ही गोष्ट ऐकून 'स्वत:लाच श्रेष्ठ' समजणाऱ्या त्यांच्या शिष्यांनाही त्यांची चूक कळाली. आपण सर्वज्ञानी झालो आहोत अशी जी आपली समजूत आहे. ती पूर्ण चुकीची आहे. त्या सात आंधळ्यांप्रमाणेच आपणही आपल्या मिळालेल्या थोड्याशा ज्ञानाला पूर्ण ज्ञान समजतो आहोत, हे त्यांच्या लक्षात आले.

●●●

एक व्यापारी - व्यापारात नुकसान - कोंबडी खरेदी केली - कोंबडी रोज सोन्याचे अंडे देऊ लागली - व्यापाऱ्यास हाव सुटली - त्याने कोंबडीला मारले -पोटात एकही अंडे नव्हते.

## अति लोभ केव्हाही वाईट

दिनू नावाचा एक व्यापारी होता. दुकानात बसून व्यापार करून पैसे मिळवणे त्याला फार कष्टाचे वाटत होते. शिवाय तो आळशी पण खूप होता. त्यामुळे त्याचे कामाकडे सतत दुर्लक्ष होत असे. या साऱ्याचा परिणाम अर्थातच त्याच्या व्यापारावर झाला. त्याला सतत नुकसान होऊ लागले. शेवटी कंटाळून त्याने दुसरा एखादा उद्योग करावयाचा ठरवले. ज्या उद्योगात 'श्रम कमी पण पैसे भरपूर मिळतील' असा कोणता तरी उद्योग आपण करायचा असे त्याने ठरवले. असा विचार करीत असतानाच त्याच्या दुकानासमोर एक कोंबड्या विकणारा माणूस आला. त्याच्याकडे एक अतिशय सुंदर कोंबडी होती. ती त्याने खरेदी करावयाची ठरवली. मनात विचार येताक्षणी त्याने ती कोंबडी खरेदी केली आणि तो तिला घरी घेऊन आला. तिची खूप छान काळजी घेऊ लागला.

असेच दोन -तीन दिवस गेले आणि अचानक त्याला कोंबडीच्या खुराड्यात एक सोन्याचे अंडे आढळले. ते पाहाताच दिनूला खूप खूप आनंद झाला. त्याने आता कोंबडीची खूप काळजी घ्यायला सुरुवात केली. दुसऱ्या दिवशीही त्याने लक्षपूर्वक बघितले, तर खरंच कोंबडीने सोन्याचे अंडे दिले होते. अशा प्रकारे रोज ती कोंबडी एकेक सोन्याचे अंडे देऊ लागली. तशी रोज दिनूच्या श्रीमंतीत वाढ होत गेली.

आता दुकानात न जाता, घरबसल्या आपण श्रीमंत होऊ शकतो हे त्याच्या ध्यानात आले. असाच तो कोंबडीविषयी विचार करीत बसला असताना, त्याला वाटले, कोंबडी आपल्याला रोज एकच अंडे देते. त्यापेक्षा सर्वच सोन्याची अंडी एकदम मिळाली तर किती छान होईल ? मनात विचार येताक्षणीच त्याने सुरी घेतली व कोंबडीचे पोट फाडले. पण हाय ! तिच्या पोटात एकही अंडे नव्हते. मात्र सर्व अंडी एकदम मिळवावीत म्हणून त्याने कोंबडीचे पोट फाडले त्यामुळे ती बिचारी तडफडून मरून गेली. अतिशय लोभ धरला की कसे नुकसान होते याचा धडा दिनूला आपोआप मिळाला.

●●●

# पत्रलेखन

## मैत्रिणीस वाढदिवसासाठी आमंत्रण देणारे पत्र

॥ श्री ॥

समाधान / १४५ / डी /
महाद्वार रोड,
कोल्हापूर.
दि. ५ ऑगस्ट १९९२

प्रिय मैत्रीण तृप्तीस,

सप्रेम नमस्कार.

तुझे पत्र मिळाले. तुला मिडल स्कूल स्कॉलरशिप मिळाली ही बातमी वाचून खूप खूप आनंद झाला. तुझ्या यशाची ही बातमी कळल्यावर आई - बाबांनाही खूप खूप आनंद झाला. त्यांनाही तुझे कौतुक करावेसे खूप वाटते. तशी संधीही आता त्यांना मिळेल. कारण आजचे पत्र मी तुला खास आमंत्रण देण्यासाठीच लिहीत आहे.

येत्या शनिवारी, १५ ऑगस्टला माझा वाढदिवस आहे. बाबांची बदली झाल्यामुळे जून महिन्यातच जरी आम्ही सांगलीहून येथे आलो असलो, तरी इथेही मला खूप छान छान मैत्रिणी मिळाल्या आहेत. त्या सर्वांना मी तुझ्याबद्दल सतत सांगत असते ना, त्यामुळे त्यांनाही सर्वांना तुला भेटावेसे वाटते. तरी तू अवश्य ये. आणि हो ! रविवारीही सुट्टीच असल्याने मला तुला महालक्ष्मी मंदिर, येथील सुप्रसिद्ध रंकाळा तलाव सारे काही दाखवता येईल.

शिवाय वाढदिवसादिवशी आमच्या घराच्या गच्चीवर आई सर्वांना छान पार्टी देणार आहे. तेव्हा आपण गाण्याच्या भेंड्या खेळू. आइस्क्रीम खाऊ. खूपखूप मजा करू तरी तू अवश्य ये.

तुझ्या आई बाबांना सा. नमस्कार. छोट्या मिटूला गोड पप्पी. अच्छा.

तुझी मैत्रीण
नेहा

## सहलीला जाण्यास वडिलांची परवानगी मिळविण्यासाठी वडिलांना पत्र

॥ श्री ॥

कुमार विद्यामंदिर
विद्यार्थी वसतिगृह, सातारा.
दि. ६ - १२ - १९९२

ति.रा.रा. बाबा यांना,
शि. सा. नमस्कार, विनंती विशेष.

तुमचे पत्र मिळाले, तुम्ही आणि आई नाताळच्या सुट्टीकरिता माझी वाट पाहात आहात हे वाचून खूपच आनंद वाटला. मलाही सुट्टी मिळाली की घरी अगदी धावत धावत यावेसे वाटते. याही सुट्टीत मी तिकडे यायचा बेत खूप दिवसांपासून आखला होता. पण आता त्यात थोडासा बदल करावा लागणार आहे. कारण या सुट्टीत आमच्या वर्गाची सहल चालली आहे.
आमची नाताळची सुट्टी दहा दिवसांची आहे. त्यावेळीच ही सहल आयोजित केली आहे. ही सहल एकूण तीन दिवसांची आहे. आम्ही २५ ता.ला सकाळी निघून २८ डिसेंबरला रात्री परत येऊ.

या सहलीत आम्हाला प्रतापगड, महाबळेश्वर, सिंहगड, रायगड अशी ऐतिहासिक ठिकाणे दाखवली जाणार आहेत. या सहलीसाठी एकूण १००/- रुपये खर्च येणार आहे. बरीचशी कामे आम्ही मुलांनीच करावयाची आहेत. त्यामुळे येणारा खर्चही कमी होईल. शिवाय तुम्हा मुलांना एकजुटीने काम करावयाची संधी मिळेल असे गुरुजी म्हणतात.

माझे बरेच मित्र या सहलीला जाणार आहेत. शिवाय शिवाजी राजांचा पदस्पर्श ज्यांना झाला त्या सह्याद्रीच्या कुशीतल्या गडांचे दर्शन आपणही घ्यावे असे मला वाटते. तरी आपण मला या सहलीला जाण्याची परवानगी द्यावी असे मला वाटते. आपण मला परवानगी दिलीत तर पाठांतर - लेखनाचे १०० रुपये मला बक्षीस म्हणून मिळाले आहेत ते मी भरेन. मलाही सर्वांबरोबर सहलीला जावेसे खूप वाटते. तेव्हा आपण परवानगी दिलीत तर बरे होईल.

सौ. आई कशी आहे ? तिला माझा नमस्कार. छोट्या रमेशला प्रेमळ आशीर्वाद.
कळावे,

आपला
श्रीधर

## आपल्या अभ्यासाविषयी वडिलांना पत्र

॥ श्री ॥

कुमार विद्यामंदिर वसतिगृह,
राजारामपुरी, कोल्हापूर.
दि. १२ मार्च १९९२

ती. बाबांना

कृ.शि.सा.न.वि.वि.

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही दोघेही माझ्या अभ्यासाची सतत काळजी करीत असता. त्यातच चौथ्या चाचणी परीक्षेत मला गणित विषयात, तसेच इतिहास भूगोलामध्ये कमी गुण मिळाले आहेत. त्यामुळे तर आई खूपच काळजी करत असेल.

पण बाबा, चौथ्या चाचणी परीक्षेच्या वेळी मी अचानक आजारी पडलो. बरे वाटू लागल्यानंतर, मी मन लावून अभ्यास करावयाचा प्रयत्न केला. पण अशक्तपणा इतका आला होता की मला त्यावेळी नियमित अभ्यास करणे जमले नाही. पण आता मात्र माझी तब्येत खूपच सुधारली आहे.

शिवाय माझ्या खोलीत ९ वी क चा चंद्रकात सप्रे रहातो. तो रोज सकाळी अभ्यासाला उठतो. त्यावेळी मलाही उठवतो. मला गणिते सोडविण्यास मदत करतो. माझ्या सर्व विषयांच्या तयारीसाठी त्याने मला एक छानसे वेळापत्रकच करून दिले आहे आणि बाबा, सोप्या पण सुंदर शब्दांत मोठ्या प्रश्नांची उत्तरे कशी लिहायची हे ही त्याने छान समजावून सांगितले आहे. त्यामुळे तर माझा आत्मविश्वास खूपच वाढला आहे. हे फक्त मी तुम्हाला बरे वाटावे म्हणून नाही सांगत. वरील पद्धतीने तयारी केल्याने तोंडी परीक्षेत मी सर्वच विषयांची बिनचूक उत्तरे देऊ शकलो आहे. त्यामुळे तुम्ही खूप काळजी करू नका. मी व्यवस्थित अभ्यास करून चांगल्या गुणांनी नक्की पास होईन.

सध्या सतत अभ्यासच करीत असतो, त्यामुळे वेळ कसा संपतो हे कळत देखील नाही. पण संध्याकाळ झाली की मला आईची, तुमची खूप आठवण येते. आपले अंगण, संध्याकाळच्या वेळी तेथील मित्रांबरोबर केलेली दंगामस्ती सारे काही आठवते. तेव्हा माझी परीक्षा संपताच तुम्ही मला न्यायला लवकर या. याल ना ?

ती. सौ. आईस सा. नमस्कार. छोट्या मनीषाला गोड पापी.

कळावे.

तुमचा लाडका रोहन

## गुरुजींस – सुट्टीसाठी अनुमती मागणारे पत्र

॥ श्री ॥

गौरी अनंत कुलकर्णी,
सरंजामे वाडा, डी वॉर्ड
सोमवार पेठ,
नाशिक
दि. २८ डिसें., १९९२

आदरणीय बापट गुरुजी यांना,
शि. सा. नमस्कार वि.वि.,

पत्र लिहिण्याचे कारण, पुढील आठवड्यात म्हणजे सोमवार दिनांक २ जानेवारीपासून ७ जानेवारीपर्यंत मी शाळेत उपस्थित राहू शकणार नाही. कारण ५ जानेवारीस माझ्या दादाचे लग्न असल्यामुळे आम्ही सर्वजण पुण्यास जाणार आहोत. तरी मला अनुपस्थित राहाण्याविषयी परवानगी द्यावी, ही विनंती.

वरील आठवड्यात शाळेत होणारा अभ्यास मी नंतर नक्की पूर्ण करीन.

कळावे, लोभ असावा.

आपली नम्र विद्यार्थिनी
गौरी कुलकर्णी,
७ वी क

## पुस्तक विक्रेत्यास पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा

॥ श्री ॥

इयत्ता ७ वी, वर्ग प्रतिनिधी
कुमार विद्यामंदिर
४०/शनिवार पेठ,
सातारा.
दि. २१ ऑगस्ट, १९९२

व्यवस्थापक,
दिपाली प्रकाशन
पाटे - वाडा, टिळक चौक,
कल्याण

माननीय महोदय,

विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासाचा उपक्रम म्हणून आमच्या शाळेने यावर्षी खालील पुस्तकांची खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी कृपया वरील पत्त्यावर खालील पुस्तके पाठवावीत.

| | पुस्तके | प्रती |
|---|---|---|
| १) | पंचतंत्रातील प्रभावी कथा | ५ प्रती |
| २) | १४ थोर पुरुषांच्या अद्भुत कथा | ५ प्रती |
| ३) | १५१ चातुर्य कथा | ५ प्रती |
| ४) | निवडक बिरबल | १० प्रती |
| ५) | कुमारांच्या विज्ञानकथा | १० प्रती |

वरील पुस्तकांसोबत बिलही पाठवावे. याशिवाय आपण नवीन काही पुस्तके प्रकाशित केली असल्यास त्यांचीही एक यादी पाठवावी. तसेच ही विकास योजना मुख्यत्वे गरीब मुलांसाठी असल्याने आम्हाला योग्य ती सवलतही द्यावी, ही विनंती.

कळावे, लोभ असावा

आपला कृपाभिलाषी
विद्यार्थी प्रतिनिधी

## मित्रास स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र

॥ श्री ॥

स्नेहधारा, ५ / ब / १९,
श्रीराम टॉकीजजवळ,
महात्मा गांधी मार्ग,
पुणे ३०.
दि. २० जुलै ९२.

प्रिय मित्र सुशांत,

मिडलस्कूल स्कॉलरशिपच्या परीक्षेत तुझा जिल्ह्यात दुसरा क्रमांक आला हे समजले आणि खूपखूप आनंद वाटला. तुझे मन:पूर्वक अभिनंदन. या तुझ्या यशात तुझ्या शिक्षकांचा जितका वाटा आहे, तितकाच तुझ्या मेहनतीचाही आहे. कारण शिक्षणासाठी म्हणून तू काका - काकूकडे राहात असल्याने, तुला काकूला घरकामात किती मदत करावी लागते हे ही मी स्वत: अहमदनगर येथे असताना पाहिले आहे. शिवाय त्यांचे घरही खूप लहान असल्याने तुला अभ्यासासाठी पुरेशी जागाही मिळत नव्हती. असे असूनही सर्व अडचणींवर मात करून तू हे जे यश मिळवले आहेस, ते खरोखरच कौतुकास्पद आहे. असेच तुला नेहेमी यश मिळत जावो ही सदिच्छा. तुझ्या या यशाने तू आपल्या शाळेचीही मान उंचावली आहेस. त्यामुळे आपल्या बापट गुरूजींनी तुला छानपैकी बक्षिसही दिले असेल.

अरे बक्षिसावरून आठवलं. तुझा नंबर आला आहे हे कळताच माझ्या बाबांनीही, 'साहस - कथा भाग १ व २' तुला देण्यासाठी म्हणून घेऊन ठेवले आहेत. ते नगरला आले की तुला भेटतील, त्यावेळी तुला ते बक्षीस देतील.

तुझ्या काका -काकूंना प्रणाम. तुझ्या आईसही हे सारे कळविले असशीलच. तिला लवकरच भेटून ये. तिलाही माझा सा.नमस्कार सांग.

तुझ्या छान पत्राची वाट पाहात आहे.

कळावे,

तुझा मित्र
रणजित

**शाळेजवळ असणारी उघडी गटारे हानीकारक आहेत अशी तक्रार करणारे पत्र नगरपालिकेच्या आरोग्याधिकाऱ्याकडे**

॥ श्री ॥

वर्गप्रतिनिधी,
इयत्ता ६ वी,
नूतन विद्या मंदिर,
मंगळवार पेठ, कोल्हापूर,
दि. २४ सप्टें. १९९२.

माननीय आरोग्याधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

माननीय महोदय,
सा.न.वि.वि.

शहराच्या मध्यवस्तीत जिथे आमची शाळा आहे, तिच्या प्रवेशद्वाराजवळची दोन्ही गटारे उघडी आहेत. शिवाय त्यातून सांडपाण्याचा निचरा नीट होत नाही. ही बाब आपल्या लक्षात आणून देण्यासाठी मी ६ वी, अ चा वर्गप्रतिनिधी या नात्याने हे पत्र लिहीत आहे.

आमच्या शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दोनही बाजूला असणारी गटारे ही आकाराने खूप मोठी आहेत. शिवाय तशी खोलही आहेत. या गटारांमध्ये टाकला जाणारा कचरा, पालापाचोळा साफ करायला दोन -दोन, तीन -तीन दिवस इकडे कुणी फिरकत नाही. त्यातच सगळीकडून येणारे सांडपाणी तिथे खूप कचरा साठलेला असल्याने वाहून न जाता तिथेच अडून राहाते. त्यामुळे कचराही कुजतो, शिवाय त्याची सगळीकडे दुर्गंधी पसरते. त्यामुळे डासांचा उपद्रव तर होतोच. शिवाय तिथे शाळेच्या मुलांसाठी खाद्यपदार्थ विकणाऱ्या हातगाड्या आहेत, त्यावरही माशा बसतात. तेच पदार्थ बरीच मुले खातात. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका पोहोचतो.

तरी याबाबत आपण स्वत: लक्ष घालावे. शाळेजवळ असणारे उघडे गटार बंद करण्याची, तेथील कचरा नेहेमी साफ केला जाईल याची काळजी घ्यावी, ही विनंती. आपणास थोडी तसदी दिली याबद्दल क्षमस्व.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,
विद्यार्थी प्रतिनिधी.

## सहकार भांडारास मालाबद्दलची चौकशी करणारे पत्र

॥ श्री ॥

विद्यार्थी सहकार भांडार,
नूतन विद्यामंदिर,
मंगळवार पेठ, कोल्हापूर.
दि. १५ जाने. १९९२.

महिला उद्योग, सहकार भांडार,
लक्ष्मीपुरी, ३री गल्ली,
कोल्हापूर.

माननीय महाशय,

आमच्या शाळेच्या विद्यार्थी सहकार भांडारासाठी आम्हाला खालील माल हवा आहे. हा माल आपणाकडे उपलब्ध आहे का? असल्यास त्याच्या किंमती व त्यांवर आपण आम्हाला किती सूट देऊ शकता, हे सर्व लवकरात लवकार कळवावे.

| | |
|---|---|
| पांढरे खडू | २० पेट्या. |
| रंगीत खडू | १० पेट्या. |
| रंगपेट्या | १ डझन. |
| खोडरबर | २० नग. |
| फूटपट्ट्या | १ डझन. |
| २०० पानी वह्या | २ डझन. |
| १०० पानी वह्या | २ डझन. |
| शोभेच्या / कागदी फुलांचे हार | अर्धा डझन. |

कळावे, लोभ असावा.

आपला कृपाभिलाषी
सचिव,
विद्यार्थी सहकार भांडार

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २०७१ दिनांक ३१/३/९४
विभाग ८
BVBK-0402971